

# महाभारत

## खंड ३१ : कर्णपर्व १

मराठी अनुवाद :

**श्री. अशोक कोठारे**

# महाभारत

## महाभारत खंड एक तिसावा

## कर्ण पर्व पहिले

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.

http://www.esahity.com/23092343238123512366234023812350.html

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० ऑगस्ट २०२०**

# अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा एकतिसावा खंड, कर्ण पर्व भाग पहिला आपण आता वाचणार अहात.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –

ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories
I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy
Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/2309234323812351236623402381235‌0.html

## - कर्ण पर्व एक (सुरू) –

## भाग एक

नारायणाला वंदन करून सरस्वतीचे स्मरण करून आणि नराला अभिवादन करत जय असे बोलून वैशंपायन ऋषी सांगतात,

द्रोणांच्या वधा नंतर राजा दुर्योधन त्याचे दुःख व्यक्त करण्यासाठी अश्वत्थामाला इतर कौरव योद्ध्यासह भेटावयाला जातो. अश्वत्थामाच्या ठिकाणी त्यांची शोकसभा होते. त्यानंतर तेथे वेदातील संबोधना प्रमाणे. ते एकमेकांचे सांत्वन करतात व नंतर ते आपापल्या तंबूत जातात. तो सतरावा दिवस संपला होता. त्यांना तो भयंकर नरसंहार आठवतो व ते झोपू शकत नाहीत. कर्ण, दुर्योधन, दुःशासन आणि शकूनी मात्र कांही केल्या झोपू शकत नाहीत. ते चौघे दुर्योधनाच्या तंबूत रहातात. पांडवांना त्यांने जो त्रास दिला त्याबद्दल ते विचार करत असतात. त्यांचा विनाकारण केलेला अपमान, द्रौपदीचा उपमर्द, द्युतात केलेली बनवाबनवी असें सगळे त्यांना आठवत असते व त्याच्यातील अपराधीपणाची भावना त्यातून वृद्धिंगत होत होती. त्या आठवणी त्यांना त्रास देऊ लागतात. त्यामुळे त्यांचे नैतिक बळ कमी होत जाते. ते पांडवांना दिलेल्या त्रासा बद्दल स्वताला दोषी समजू लागतात. त्यांची रात्र तशीच पश्चात्ताप करण्यात जाते. ती रात्र त्यांना शंभर वर्षा सारखी दीर्घ असावी असें वाटते. अठरावा दिवस उगवतो तसे ते सगळे सकाळचे विधी उरकतात नेहमी प्रमाणे. त्यांच्या सैन्याला रणभूमीत हजर रहावयाच्या आज्ञा देतात. त्या दिवसासाठी कर्णाची नेमणूक सरसेनापती म्हणून केली जाते. त्यासाठी जो विधी करावयाचा तो केला जातो. त्यासाठी वेदसंपन्न शास्त्री ब्राह्मण तो विधी संपन्न करतात. त्यात ब्राह्मणांना दही, तूप व कलश दान केले जाते. सोन्याची नाणी उधळली जातात, गाईगुरं व दागिन्यांचे दान ब्राह्मणांना केल जाते. मौल्यवान कपडे वाटले जातात. वाजंत्री त्यांची शुभदर्शक वाद्ये वाजवतात. यशाची ग्वाही देणारी कवन भाट गातात.

ते होत असतांना पांडव त्यांचे प्रातर्विधी उरकून युद्धाच्या तयारीला लागलेले असतात. त्यानंतर सूर्य उदयात असतांना ते अठराव्या दिवशीचे युद्ध प्रारंभ होते. लवकरच ते

भीषण रुप धारण करते. दोनही बाजूचे प्रतिस्पर्ध्याचा पराभव करण्यासाठी लढत होते. परंतु, आता सैनिकांची संख्या खूप कमी झालेली दिसत होती. कौरवांचे असंख्य राजे व त्यांचे लष्कर युद्ध सोडून गेले होते व कांहीं जाण्याच्या तयारीत होते. कारण त्यांना समजून चुकले होते कीं, दुर्योधनाचा पराभव निश्चित होणार आहे. त्याच प्रमाणे पांचाल व पांडव आणि श्रींजय ह्यांचे बहुतेक योद्धे भिष्म, द्रोण, अश्वत्थामा आणि कर्णाने मोठ्या संख्यने आधीच मारलेले होते. त्यामुळे युद्धभूमी गजबजलेली दिसत नव्हती. आजच्या युद्धात प्रमुख योद्ध्यांच्या द्वंद्वावर जास्त भर होता. त्यांचे सैनिक नुसते बघ्याची भूमिका करणार असे दिसत होते कारण सामान्य सैनिकांना आता त्या युद्धात लढण्याची इच्छा दिसत नव्हती. कर्णाने त्या दिवशी पांडव, पांचाल आणि श्रींजयाच्या सैनिकांचा मोठ्या प्रमाणात संहार केला व अखेरीस तो अर्जुना कडून स्वतः मारला गेला.
त्यानंतर संजय हस्तिनापुरी जातो व धृतराष्ट्राला तो वृतांत सांगतो जे कुरुजंगलात झाले.
जनमेजय बोलतो, "भिष्म व द्रोणांच्या वधामुळे अंबिकापुत्र धृतराष्ट्र फार दुःखी झाले असतील. त्यानंतर कर्णाच्या मृत्यूची वार्ता त्याने कशी स्वीकारली"? कर्णाच्या मृत्यूनंतर तो कशाप्रकारे वागला ते सांगा. फार मोठ्या दुःखात सुद्धा कोणी जीव देण्याचा विचार सहसा करत नाही. अहो ब्राह्मणा, त्याचे सगळे आप्त जसे, वल्हीक, द्रोण, सोमदत्त, भुरिश्रव मेल्याचे ऐकून ते मरण्याच्या विचारात गेले नाहीत. त्यांचे अनेक पुत्र मारले जात असल्याच्या वार्ता संजय सांगत होता त्या ते (धृतराष्ट्र) ऐकत होते तरी त्यांची जगण्याची वासना कमी झाली नव्हती. त्याबद्दल मला सगळे इतंभूत आपण सांगावे. माझ्या पूर्वजांच्या हिम्मतीच्या गोष्टी ऐकण्यास मला फार आवडते.
कर्ण पर्व भाग एक संपला.

# कर्ण पर्व
## भाग दोन

वैशंपायन पुढे सांगता, कर्णाचा वध झाल्या नंतर सजय दुःखी अंतःकरणाने नागपुराला निघतो. त्याचे घोडे वार्याच्या वेगांने धावणारे होते. तो हस्तिनापुराला पहोचतो. त्यावेळी त्याच्या मनात फार चिंता होती. तो धृतराष्ट्राच्या निवासस्थानी जातो. तेथे स्मशान शांतता होती. तो पहातो कीं, राजा पूर्णपणे शक्तिहीन झालेला होता. संजय त्याचे हात जोडून खाली मान घालून त्यांच्या पुढे उभा रहातो. त्यांच्या पाया पडतो. स्वताचा परिचय करून मग तो बोलतो मी संजय आलो आहे, "अहो महाराज, आपण कष्टी झालेले दिसता अहात. आपल्या लोभीपणाचा परिणाम स्वरुप हे सगळे घडले त्यामुळे आपल्याला कांहीं पस्तावा वाटतो कां"? "आपल्या सगळ्यांच्या भल्याचा सल्ला देणारे विदूर, भिष्म होते पण त्यांचे तुम्ही ऐकले नाही. शेवटी कृष्ण शिष्टाई करण्यासाठी आला पण त्यालासुद्धा तुम्ही धुटकारले. त्या सगळ्याचा परिणाम आपण पहात अहात. जे घडले ते आपल्या लोभीपणामुळे झाले आहे, त्यात आपण कोणा दुसर्यालासुद्धा दोष देऊ शकत नाही. भिष्माचा व द्रोणाचा वध आपल्या कुकर्माचा परिणाम आहे. त्याबद्दल दुःख आपण कसे करता"? त्यावेळी नारद, भार्गव असे मोठे आसामी आपल्याला समजावत होते पण त्यांचीसुद्धा तुम्ही कदर केली नाही". संजय त्याचे हात जोडून धृतराष्ट्राशी बोलत होता. राजा खोल श्वास घेत ते ऐकत होता. नंतर तो बोलतो, "भिष्माचा वध झाला ते ऐकल्यावर व द्रोणांचा वध ऐकल्यावर मला फार दुःख झाले हे मी मान्य करतो. भिष्म साक्षात वसू होते ते अशारितीने मरावेत ह्याचा मला पश्चात्ताप झाला आहे. त्याने स्वताच्या हिम्मतीने दहा हजार यमाकडे पाठवले होते. दुसरे भार्गवाने तयार केलेले माझ्या मुलांचे गुरू होते. त्याला विधीलिखीताप्रमाणे धृष्टद्युम्नाने मारले आहे. एकाला शिखंडीने व दुसर्याला प्रिशताच्या मुलांने मारले जे विधीलिखीत होते. हे माझ्या चुकीच्या निर्णयामुळे घडले ह्याचे मला फार वाईट वाटते. त्या दोघांच्या बरोबरीचे जगात कोणी नव्हते. पंडुच्या उच्चप्रतीच्या मुलाने, धनंजयाने संसप्तकांचा नाश केला तसेंच अश्वत्थामाचे नारायण अस्त्र विफल केले कृष्णाने, त्यावेळी माझी मुलं काय करत

होती"? "द्रोणांच्या मृत्यूनंतर माझे सैन्य पळून जात होते ते मला असे वाटले कीं, बुडत्या जहाजातील खलाशी जसे त्यांचा प्राण वाचवण्यासाठी धडपड करतात तसे होते. दुर्योधनाचा चेहरा पडला होता. कर्ण, कृतवर्मन भोजांचे मुख्य, मद्रचे राजे सल्य, माझी उरलेली मुलं त्याशिवाय इतर त्यांचे साथी रणांगण सोडून पळत होते हे मला समजले. त्याची माहीती मला तुझ्याकडून ऐकावयाची आहे कारण, संजया, तुझे सांगणे रोचक असते. पांडवांच्या शौर्याच्या गोष्टी मला ऐकावयाला आवडतात. ते निष्पाप आहेत, त्यांच्यावर अनन्वीत अत्याचार माझ्या मुलांनी केले आहेत त्याचेसुद्धा मला फार वाईट वाटते. माझ्या अंध असण्यामुळे ते झाले असे मी समजतो. मला माझ्या मुलावर अवलंबून रहावे लागत असल्याने ते सगळे घडले".

संजय सांगतो, "अहो महाराज, आपल्या चुकीमुळे जे कौरवांबाबत घडले ते ऐकून आपल्याला खंत करण्याचे कारण नाही. जे सूज्ञ असतात ते दैवाबद्दल दुःख करत नाहीत. सूज्ञ लोक जे घडते ते समजून घेत त्याप्रमाणे त्यांची धोरणं आखत असतात".

धृतराष्ट्र बोलतात, "अरें संजया, मला तसे वाईट वाटत नाही कारण, जे घडले ते घडले, त्याचा विचार मी करणार नाही. मी ह्या सगळ्याला माझे दैव समजतो. आता मला ते सगळे सांग".

कर्ण पर्व भाग दोन संपला.

# कर्ण पर्व
## भाग तीन

संजय सांगू लागतो, द्रोणांचा वध झाल्या नंतर, तुमचे शूर योद्धे पुत्र निस्तेज होतात. ते एकमेकांडे पहाण्याचे सुद्धा टाळत असतात. ते खाली मान घालून बसलेले होते. कोणी कोणाशी बोलत नव्हते. त्यांची ती अवस्था झालेली पाहून तुमचे सैन्य जास्त खच्ची झालेले दिसत होते. अनेकांची रक्ताने माखलेली शस्त्रं त्यांच्या हातातून गळून पडली होती. ते पाहून राजा दुर्योधन त्यांना उद्देशून बोलतो, "अहो मर्दानो, तुमच्या हिम्मतीवर हे युद्ध मी पांडवांशी पुकारले आहे, द्रोणांच्या जाण्याने जरी आपल्याला मोठा धक्का बसला असला तरी त्यावरून आपण आपले युद्ध थांबवू शकत नाही. युद्धात सगळे मरतात व मारतात. त्याने एवढे नाराज होण्यासारखे काय आहे"? "द्रोणांची जागा कर्ण घेणार आहे. तो सर्व दृष्टीने त्या पदासाठी योग्य आहे. आपण त्याच्या नेतृत्वाखाली ह्या पुढे लढणार आहोत. तो त्याची दैवी आयुध वापरणार आहे. म्हणून तुम्ही सर्व सुरक्षितपणे लढू शकाल. त्या भित्र्या धनंजयाची भिती बाळगण्याची कांहीं आवश्यकता नाही. तसेंच भिमालासुद्धा घाबरण्याचे कारण नाही. कर्णाने त्या दोघांचा मुकाबला समर्थपणे केला आहे. त्या शूरवीर घटोत्कचाला ज्याच्याकडे हजार भ्रमसिद्धी होत्या त्याचा वध कर्णाने केला हे आपण सगळे जाणता अहातच. त्याशिवाय अश्वत्थामा आहे जो सगळ्या पांडवांना पुरून उरणारा आहे. आपले कर्ण इंद्रासारखे तेजस्वी आहेत. त्यांच्या संरक्षणाखाली तुम्ही सगळे एकेकटे सुद्धा पांडवांच्या सेनेचा पराभव करू शकाल ह्याबद्दल मला खात्री आहे".

संजय पुढे सांगतो, असे दुर्योधन त्याच्या लष्कराला भाषण देतो. त्यानंतर तुझे मुलगे कर्णाला कौरवांच्या सैन्याचे सरसेनापती म्हणून नेमणूक करतात. ते झाल्यावर कर्ण मोठ्याने आव्हानात्मक गर्जना करतो. त्यानंतर जे युद्ध होते त्यात तो श्रींजयांचा संहार करतो. त्या प्रमाणे पांचाल व केकया आणि विदेही ह्यांच्या सैनिकांना कंठस्नान घालतो. ते यमाकडे जातात. ते करत असतांना अखेरीस तो सुद्धा अर्जुनाच्या बाणाला बळी पडतोच. कर्ण पर्व भाग तीन संपला.

# कर्ण पर्व
## भाग चार
वैशंपायन बोलतात, दुर्योधनाचे ते ऐकून व कर्णाचे संहार कृत्य पाहून अंबिका पुत्र धृतराष्ट्र समजतो कीं, त्याचा मुलगा दुर्योधन आधीच मेला आहे. ते अस्वस्थ होतात. ते त्या धक्क्याने बेशुद्ध होतात. त्यांच्या पडण्यामुळे राणी वासातून मोठ्याने रडण्याचे आवाज येऊ लागतात. त्या राण्यांच्या रडण्याच्या आवाजाने तो आसमंत भरून गेला होता. त्यांना शांत करण्याचे काम संजयाला करावे लागत होते परंतु, त्यांचे हंबरडा फोडणे कांहीं केल्या थांबत नाही. त्या राण्या बेशुद्ध झाल्या होत्या त्या कल्पनेने कीं, त्यांचे पति धारातीर्थी पडले आहेत. त्या बायका भविष्याच्या कल्पनेने थरथरत होत्या.त्यांचे भवितव्य पूर्णतया अंधःकारमय झाले होते. त्यांना धीर देण्यासाठी विदूर पुढे आले होते. ते धृतराष्टाराच्या चेहर्यावर पाणी शिपडतात. ते त्यांच्या अंध भावाला सावरण्याचा प्रयत्न करतात. कारण तोच त्याचे डोळे होता. थोड्या वेळांनी शांत होतात सगळे कारण जे घडणार ते घडणारच ह्याची कल्पना त्याना आली होती. धृतराष्ट्र थोड्या वेळांनी बोलू लागतो, तो त्याच्या मुलांना दोष देत व पांडवांना कौतुकाची शाब्बासकी देत बोलतो, त्यात तो दुर्योधना बरोबर शकूनी, दुःशासन अशा सगळ्या कुटूंबातील लोकांना दोष देत असतो. त्याचे दुःखाने व भविष्यात काय वाढून ठेवले आहे त्या विचाराने अंगाचे कंप पावणे चालू असते. थोड्यावेळांनी तो संजयाला विचारतो, "तू जे सांगितले ते सगळे माझ्या लक्षात आले आहे, पण मला सांग माझा मुलगा दुर्योधन जीवंत आहे कां मेला आहे? मी पुनः पुन्हा ते विचारत आहे. त्याचे उत्तर दे".

वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकल्यावर अरे जनमेजया, तो सुत बोलतो, महारथी कर्ण आता सरसेनापती झाला आहे. त्याची नेमणूक तुमच्या मुलांनी केली आहे व त्याच्या नेतृत्वाखाली युद्ध होत होते परंतु, आता कर्णाचा वध अर्जुनाने केला आहे. त्याच प्रमाणे त्याच्या मुलाचासुद्धा वध झाला आहे. दुःशासन सुद्धा भिमाकडून मारला गेला आहे. रागाच्या भरात भिम त्याचे रक्त पित होता ते दिसत होते.

कर्ण पर्व भाग चार संपला.

# कर्ण पर्व

## भाग पांचवा

वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकून अंबिकेचा मुलगा पुन्हा दुःखाच्या आवेगात जातो व बोलतो संजयाला, "माझ्या नालायक मुलाच्या चुकीच्या धोरणामुळे आणखीन एक चांगला माणूस मारला गेला आहे. त्याचे मला फार दुःख होत आहे. ही माणसं विनाकारण मारली जात आहेत. ह्या दुःखाच्या दरीतून मला तू बाहेर काढ, त्यासाठी मला सांग आणखीन कोण कोण मेले आहेत व कोण अजून जीवंत आहेत पांडवांतील व कौरवांतील"?

संजय त्यांना उत्तर देतो, शंतनु पुत्र भिष्म ज्याने कांहीं अक्षौहिणी पांडव व पांचाल, श्रींजय ह्यांचे लष्कर ठार मारले ते युद्ध सुरू झाल्यानंतरच्या दहाव्या दिवशी शिखंडीने मारले. त्यानंतर अतिरथी द्रोण ज्यांचा रथ सोन्याचा असें, ते पांचालांचे संहारक ठरले व ते सुद्धा त्यानंतरच्या पाचव्या दिवशी धृष्टद्युम्नाने ठार मारले. भिष्माने मारल्यानंतर जे लष्कर उरलेले होते त्यातील अर्धे त्यांनी मारले होते. त्यांच्या संहारात दोनही बाजूचे सैनिक मरत होते. त्यानंतर जे उरलेले होते त्यांची कत्तल कर्णाने केली जसा तो सरसेनापती झाला. आपला राजपुत्र विविंगसती अनार्त लोकांच्या फौजांचा नाश करतो. तो त्यानंतर मारला जातो. तुमचा आणखीन एक मुलगा, विकर्ण त्याचे रथ व घोडे गेल्यांमुळें भिमसेनाच्या हातून मारला गेला आहे. भिमसेनाने त्याचा दुर्योधनावरील राग त्याच्यावर काढला. अवंतीचे महा प्रतापी विंद व अनुविंद चांगले लढले व अखेरीस यमाकडे गेले. आपले जावई, जे दहा राज्याचे धनी होते व आपल्याला फार प्रिय होते ते जयद्रथ अर्जुनाकडून मारले गेले. त्या सुमारास अर्जुनाने आपले अकरा अक्षौहिणी सैन्य एकट्याने नष्ट केले होते. दुर्योधनाचा प्रिय पुत्र जो त्याच्या पित्याच्या आज्ञेत असे मारला गेला. त्याला अभिमन्यूने ठार मारले. दुःशासनाचा पुत्र द्रौपदीच्या मुलानी यमाकडे पाठवला. किराटांचा राजा जो इंद्राचा मित्र होता त्या भागादत्तला धनंजयाने यमाकडे धाडले. सोमदत्ताचा मुलगा भुरिश्रव, त्याला सत्यकीने मारले. अम्वस्थचा राजा श्रुतायू ज्याच्या धाडसाची सगळे स्तुती करत, त्याला अर्जुनाने ठार मारले.

दुःशासनाचा आणखीन एक पुत्र त्याला भिमाने ठार मारले. सुदक्षिणा ज्याच्याकडे मोठे हत्तीदल होते त्याला अर्जुनाने ठार मारले आहे. कोसलाचा पराक्रमी राजा त्याला अभिमन्यूनी यमाकडे धाडले आहे. तुमचा मुलगा चित्रसेनाला भिमाने मारले. सल्यच्या धाकट्या भावाला अभिमन्यूने ठार मारले आहे. कर्णाचा पुत्र वृषसेन जो त्याच्या पित्याइतकांच शूर होता, त्याला धनंजयाने यमाकडे पाठवले आहे. अभिमन्यूच्या वधाचा सूड उगवण्यासाठी अर्जुन ते करतो. जगाचा राजा श्रृतायू जो पांडवांचा द्वेष करत असें, त्याचा नाश पार्थाने केला. सल्याचा पराक्रमी मुलगा, रुकमराठा सहदेवाकडून मारला गेला. जरी ते दोघे मावस भाऊ होते तरी ते झाले. भगिरथ व वृहत्क्षत्र केकयाचा राजा मारल गेले आहेत. भागादत्ताचा मुलगा नकूला कडून मारला गेला आहे. आपले वृद्ध मित्र वल्हीक भिमाकडून मारले गेले आहेत. महाबली जयत्सेन जरासंधाचा मुलगा मगध देशांचा राजा, अभिमन्यूने मारला आहे. भिमसेनाने त्याच्या गदेने आपले पुत्र दुर्मुख आणि दुःसह मारले आहेत. दुर्जय, दुर्मर्शन, दुर्विश, यमाकडे गेले आहेत. कलिंगचे वृषक त्यांची कमाल दाखवून अखेरीस यमाकडे गेले आहेत. तुमचे सभासद वृशवर्मन भिमाकडून मारले गेले आहेत. राजा पौरव त्याची अफाट सेना घेऊन आपल्या करता लढत होता तो अर्जुनाकडून मारला गेला आहे. वसत, सुरसेना, अभिशाब मोठे सूर योद्धे त्याच प्रमाणे कलिंगचे शिवी, मारले गेले आहेत. इतर योद्धे जे गोकूळात रहातात, त्यांचा नाश अर्जुनाने केला आहे. संसप्तक दुर्योधनासाठी लढणारे पार्थाने यमाकडे धाडले आहेत. तुमचे दोन मेहूणे वृषल आणि अचल सव्यसाचीने मारले आहेत. राजान सल्व भिमाकडून मारला गेला आहे. ओघवत आणि वृशांत जे आपल्यासाठी लढत होते ते मारले गेले आहेत. क्षेमधूर्ती भिमाकडून मारले गेले आहेत, गदायुद्धात ते गेले. महान धनुर्धारी जलासंध ज्यांने पांडवांच्या सैन्याचा विध्वंस केला होता त्याला सत्यकीने मारले आहे. राक्षस राजपुत्र अलयुध पांडवांच्या घटोत्कचा कडून मारला गेला आहे. कर्णाचा वध सव्यसाचीने केला आहे. त्याशिवाय कैकेया, मालव, मद्रक, द्रविड, यौधेय, ललित्य क्षूद्रक, उशिनर, तुंडीकर, सावित्रीपुत्र, पूर्वेकडील व पश्चिमेकडील, दाक्षिणात्य, असें सगळे सव्यसाचीने मारले आहेत. असंख्य पायदळ, असंख्य घोडेस्वार, हत्तीस्वार युद्धात मारले गेले आहेत. पार्थाने अनेक विध प्रकारचे

योद्धे ह्या युद्धात ठार मारले आहेत. त्याची गणती नाही करता येणार. अनेक उच्चकुलीन राजे त्या लढाईत सव्यसाचीने व भिमाने ठार मारले आहेत. पार्थ व दुसरे पांडव थकत नसल्याने ते सतत जिंकत आहेत. इतर योद्धे शूर असले तरी कांही काळानंतर ते थकतात व थकल्यामुळे हरतात अथवा मारले जातात. पांडवांच्या यशाचे गमक त्यांच्या न थकण्यात आहे. आपण विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर मी देत आहे. अर्जुन व कर्णाची लढाई राम रावणाच्या किंवा इंद्र वृत्राच्या लढाई सारखी होती. भार्गव कार्तवीर्याचा वध करू शकला कारण तो थकला नव्हता. कर्णावर कौरवांची मोठी भिस्त होती. तसेंच कौरव पांडव वैरात त्याची अहंभूमिका होती. तरी तो अर्जुनाकडून मारला गेला. त्याला मारून मोठे साध्य केले आहे पांडवांने कीं, त्यांच्यात व कौरवांत वीष पेरणारा मेला आहे. आता त्याच्यापेक्षा मोठे संकट येणार आहे, तुमचे राज्यसुद्धा पांडवांच्या ताब्यात जाणार आहे. तुमची गादी व सत्ता सगळे जाणार आहे. थोड्याच काळात त्याचा अनुभव आपल्या सगळ्यांना येणार आहे.

कर्ण पर्व भाग पांचवा संपला.

# कर्ण पर्व

## भाग सहावा

धृतराष्ट्र बोलतात, तू मला माझ्या लोकांची नांव सांगितली आहेस जे पांडवांनी मारले आहेत. आता मला पांडवांची नांव सांग जे त्या युद्धात मारले गेले व कोणी मारले. पांडवांचे मोठे सामर्थ्यवान योद्धे जसें नारायण, बलभद्र, त्यांचे शेकडो वीर पुरूष भिष्माने ठार मारले. सत्यजित, जो अर्जुनाच्या सारखा होता, त्याचा वध द्रोणांने केला आहे. त्याशिवाय अनेक सामर्थ्यवान योद्धे पांचालांतील व श्रींजयांतील द्रोणांनी ठार मारले आहेत. त्याचप्रमाणे द्रुपद व विराट त्यांची मुलं जी पांडवांशी प्रामाणिक होती ते सगळे द्रोणांनी मारले आहेत. अजिंक्य अभिमन्यू, सुभद्रा व धनंजय ह्यांचा मुलगा, लहान असून अर्जुनासारखा लढत होता, त्याला त्याने प्रचंड प्रमाणात कौरवांचा संहार केल्यानंतर कुट कारस्थान करून, ज्यात द्रोण सामील होते, कट करून दुःशासनाच्या मुलांने मारले. ते अर्जुनाला सहन झाले नाही. अमवस्थाचा देखणा मुलगा त्याने कौरवांचा संहार केल्यानंतर दुर्योधनाच्या मुलाने लक्ष्मण ह्यांने ठार मारले. महान धनुर्धारी वृहंत दुःशासनाशी लढताना मारला गेला. दोन राजे मनिमत व दंडधर, द्रोणाच्या बाणाला बळी पडले. अंशूमत भोजांचा प्रमुख, द्रोणांच्या बाणाने यमाकडे गेला. चित्रसेन जो समुद्र किनार्याच्या देशाचा राजा होता व त्याचा मुलगा, समुद्रसेनाने यमाकडे पाठवले. दुसरा किनारपट्टीचा राजा नील आणि व्याग्रदत्त ह्यांना अश्वत्थामाने मारले. चित्रयुध, चिरायूधीन कौरवांचा संहार केल्यानंतर विकर्णाच्या हातून मारले गेले. कैकेय राजा जो वृकोदरा सारखा बलवान होता, त्यांच्या भावाच्या हाती मारला गेला जो भाऊ आपल्यासाठी लढत होता. भावांने भावाला मारले. जनतनेजय पहाडी भागाचा राजा, मोठा शक्तीमान दुर्मुखाच्या हाती मारला गेला. दोन भाऊ, रोचमन द्रोणांनी यमाकडे पाठवले. पांडवांसाठी लढणारे बरेच राजे कौरवांचा संहार करत करत यमाकडे गेले आहेत. पुरूजित व कुंतीभोज सव्यसाचीचे मामा द्रोणांने मारले . अभिभू काशीसचा राजा कृष्णासाठी लढत होता त्याच्या सैन्यानिशा, तो मारला गेला. युधमन्यू, उत्तमौजस त्यांचे क्षत्रिय कार्य करून वीरगतीस गेले. पांचाल युवराज

मित्रवर्मन द्रोणाच्या बाणाने मारला गेला. शिखंडीचा मुलगा, क्षेत्रदेव महारथी, दुर्योधनाच्या मुलाच्या लक्ष्मणाच्या बाणांने मारला गेला. पांडवांचे दोन योद्धे सुचित्र आणि चित्रवर्मन जे पिता पुत्र होते, जे बेडरपणे लढत होते, द्रोणांनी मारले. वर्धक्षेमी, त्याची सगळी शस्त्रं संपेपर्यंत लढत होता. अखेरीस वीरगती प्राप्त करतो. सुत योद्धा सेनाविंदू, वल्हीकाच्या हातून मारला जातो. छेड्डींचा महारथी योद्धा धृष्टकेतू त्याचे शौर्य गाजवून अखेरीस यमाकडे गेला. त्याच प्रमाणे सत्याधींती मोठा पराक्रमी ज्याने कौरवांचा संहार केला पांडवांसाठी अखेरीस मेला. सुकेतू शिशुपालाचा मुलगा, द्रोणांच्या बाणांना बळी गेला. विराटाचा मुलगा सुनिच आणि उत्तरा मोठी कामगिरी करून यमाकडे गेले. त्याचप्रमाणे सत्यधृती मत्स्यचा राजपुत्र, मदिरास्व, आणि सूर्यदत्त द्रोणांच्या बाणांना बळी गेले. श्रेनिमत तसांच यमाकडे गेला. मगध देशाचा राजा, भिष्माच्या बाणांना बळी गेला. वासुदन ज्याने कौरवांचे मोठे नुकसान केले त्यानंतर तो थकल्याने द्रोणाच्या बाणांना बळी गेला. असे पांडवांचे कित्येक योद्धे द्रोणाच्या बाणांनी मारले गेले आहेत. मला जेवढे लक्षात राहीले तेवढे आपल्याला सांगितले.

कर्ण पर्व भाग सहावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग सातवा

धृतराष्ट्र पुढे विचारतात, "माझे प्रमुख योद्धे मेल्यानंतर माझे उरलेले सैन्यसुद्धा नष्ट होणार असेंच मला वाटते. ते दोन महाबली भिष्म व द्रोण मारले गेले आहेत. मला आता माझ्या आयुष्यात कांहीं अर्थ दिसत नाही. कर्णाच्या मृत्यूचे मला दुःख वाटत नाही. आता मला सांगा संजया, माझ्या सैन्यात आता कोणते मोठे योद्धे उरलेले आहेत ज्यांच्या जोरावर दुर्योधन युद्ध जिंकू शकेल"? कारण जे हयात आहेत ते मेल्यातच जमा आहेत असे मी समजतो.

संजय त्यावर बोलतो, "ते राजे ज्यांना द्रोणांनी ती चार प्रकारची दैवी शस्त्रं शिकवली तो अश्वत्थामा अजून हयात आहे व तुमच्यासाठी अजून लढत आहे. ते अनर्त देशाचे योद्धे, हृदिकाचा मुलगा कृतवर्मन, त्या सतवत अर्तयेनाचा मुलगा ज्यांने त्याच्या भगिनीच्या मुलांची साथ न देता तुम्हाला मिळाला तो सल्य कर्णाची जिरवण्यासाठी त्याच्यावर डूग धरून बसला आहे तो, असे कांहीं आहेत ज्यांच्या मदतीने कांही साध्य करता येण्याची शक्यता आहे. त्याच्या बरोबर त्याचे अजनेय, सैंधव्य, पहाडी लोक, नदीकाठी रहाणारे, कबोज, वनायू, गांधार, असे अजून तुमच्या करतां युद्ध करण्यासाठी सज्ज आहेत. गौतम ज्याचे शस्त्रविद्येचे ज्ञान पूर्ण आहे, तुमच्यासाठी लढण्यास तयार आहे. कैकेयांचा राजा त्याच्या देखण्या घोडे असलेल्या रथाने कौरवांसाठी लढण्यास तयार आहे. आपले मुलगे आहेत, त्यात पुरुमित्र, त्याच्या तेजस्वी रथातून लढण्यासाठी सज्ज आहे तुमच्यासाठी. दुर्योधन त्याच्या सगळ्या शक्तिने लढण्याचे नेतृत्व करत आहे. त्याच प्रमाणे तुमचा मुलगा सुशेना, सत्यसेना, चित्रसेना, आणखीन इतर तुमचे उरलेले मुलगे मोठ्या आनंदाने लढण्यासाठी उत्सूक आहेत. चित्रायुध, श्रृतवर्मन, जय, दल, सत्यव्रत, दुस्सला, असे सगळे आहेत तुमच्या साठी लढण्यास तयार. कैतव्यचा राजा त्याचे पायदल, हत्तीदल, रथ, तुमच्यासाठी रणांगणात उभे आहेत तुमच्यासाठी. शूरवीर श्रृतायू, श्रृतयुध, चित्रांगद, चित्रवर्मन, ज्यांच्या नेमबाजीची सर्वत्र चर्चा होते ते आपल्यासाठी तयार आहेत लढण्याकरता.

प्रतिष्ठीत सत्यासंध, कर्णाच मुलगे, आपल्यासाठी मरण्यास तयार आहेत. कर्णाचे आणखीन दोन मुलगे लढणार आहेत. त्या शिवाय आपले सैन्य अफाट आहे जे हरवणे कोणालाही सहज शक्य नाही. आपला मुलगा दुर्योधन दुसरा इंद्र आहे त्याच्या भल्या मोठ्या हत्तीदलानिशी सज्ज आहे लढण्यासाठी. एवढे सगळे असल्यानंतर विजय आपलाच होणार ह्याबद्दल शंका कां करावी"?

धृतराष्ट्र बोलतात, "तू संजया मला दोनही बाजूच्या मृत व जीवंत योद्ध्यांची माहिती दिली आहेस. ते पहाता मला समजले कीं, जय कोणत्या बाजूचा असेल".

वैशंपायन पुढे सांगतात, त्या माहितीवरून राजाला समजते कीं, कौरवांचे फार थोडे लष्कर आता उरलेले आहे. त्यांचे सगळे प्रमुख लढवय्ये मेलेले आहेत. त्याचे दुःख सहन न झाल्यामुळें ते लक्षात आल्यावर राजा पुन्हा भोवळ येऊन खाली पडतो. थोड्या समयानंतर ते शुद्धीवर येतात. संजयाला बोलतात, "प्राप्त परिस्थितीचे स्वरुप समजल्यामुळे मी फार अस्वस्थ झालो आहे. माझी बुद्धी नाठाळ झाली आहे. माझे हात पाय कांपत आहेत. कदाचित मला पक्षघाताचा फटका पडेल असें वाटत आहे". एवढे बोलून तो अंध राजा पुन्हा बेहोष होतो.

कर्ण पर्व भाग सातवा संपला.

# कर्ण पर्व

## भाग आठवा

जनमेजय बोलतो, "कर्णाचा वध झाला आहे व त्याच्या मुलांचीसुद्धा कत्तल झाली आहे हे समजल्यावर धृतराष्ट्र काय बोलले? त्याचे दुःख इतके मोठे होते कीं, त्यांच्या मुलावर आलेले संकट जे त्यांनी स्वताहून ओढवलेले होते त्या परिस्थितीत राजा काय करतो ते मला सांगा".

वैशंपायन सांगतात, कर्णाचा वध इतका भयंकर होता कीं, त्याची नुसती कल्पना केली तरी एकाद्याला भोवळ येईल. राजा धृतराष्ट्र थोडा विचार करतात व समजतात कीं त्यांच्या सगळ्या खानदानीचा आता नाश होणार आहे. कर्णानंतर त्याचे सगळे पुत्र मारले जाणार आहेत. त्या नुसत्या कल्पनेनी ते फार बेचैन झाले होते. त्या दुःखात तो राजा रडू लागतो. दुर्योधनाच्या चुकीची शिक्षा त्याच्या सगळ्या परिवाराला आता भोगावी लागणार असते ते त्याच्या लक्षात येते व त्याला ब्रह्मांड आठवते. कर्ण त्याच्या हिम्मतीचा इतका अभिमानी होता कीं, तो केशवाला सुद्धा दाद देत नव्हता. त्या खोट्या हिम्मतीच्या जोरावर तो दुर्योधनाला वेळोवेळी मोठी आश्वासनं देत असे. ज्याच्यावर भरवसा करून तो कौरव पांडवांशी वैर वाढवत होता. कर्णाने कांहीं राज्ये खालसा केली होती त्या विजयाचा दाखला देत तो कौरवांना पांडवांशी वैर करण्यास उद्युक्त करत असें. कर्णाने खालसा केलेल्या राज्यांकडून दुर्योधनाला मोठी रक्कम खंडणीच्या रुपात मिळत होती त्यामुळे तो कर्णावर विश्वास ठेवून त्याचे निर्णय घेत होता. असा बलशाली योद्धा अर्जुनाने मारला होता त्यावर त्यांचा विश्वास बसत नव्हता. घोड्यात उच्चैश्रव श्रेष्ठ तसें यक्षात वैश्रावण आणि माणसांत कर्ण समजला जात होता. दुर्योधनाला सगळ्या पृथ्वीस त्याच्या पायाखाली आणण्याची कामना होती त्यासाठी तो कर्णाला सांभाळत होता. मगधचा राजा कर्णाशी दोस्ती करतो त्याच्या मतलबासाठी. तो कौरव व यादव सोडून इतर सगळ्या क्षत्रियांना आव्हान देतो. त्याला जेव्हां समजते कीं सव्यसाचीने कर्णाचा वध केला आहे, त्याला वाटते कीं, तो खोल समुद्रात बुडत आहे.

धृतराष्ट्र संजयाला बोलतात, "मला हे दुःख सहन होत नाही. माझ्या लोकांचे अपयश व अपमान मला सहन होत नाहीत. तरी मला मृत्यू येत नाही. मी जहर खाण्याचा विचार करत आहे. किंवा अग्नीकाष्ठ भक्षण करू इच्छितो. किंवा एकाद्या दरीत स्वताला झोकून देतो. अरे संजया, हे दुःख मला आता सहन होत नाही.

कर्ण पर्व भाग आठवा संपला.

# कर्ण पर्व

## भाग नववा

संजय पुढे त्याना बोलतो, आपल्याला ययाति, नहूष ह्यांच्या बरोबराचा मानत होते. तेव्हां असे दुःख करत बसणे आपल्याला शोभत नाही. त्यांच्या सारखे धैर्य आपण दाखवले पाहिजे अशा परिस्थितीत.

धृतराष्ट्र बोलतात कीं, "माझ्या मते दैव सर्वश्रेष्ठ आहे. जे आपल्याच गत कर्माचा परिणाम असते. त्या विरूद्ध वागणे व्यर्थ असते. तो कर्ण पहा कसा मारला गेला त्याची सगळी शक्ती त्याला मदत करू शकली नाही. त्याने पांचालांच्या सैन्याचा नाश केला, पांडवाच्या सैन्याचा नाश केला परंतु, स्वताला वाचवू शकला नाही. ह्यालाच दैवगती म्हणतात. माझ्या दुःखाला अंत नाही. माझ्या काळजीत सतत वाढ होत आहे. मला आता जगण्याची इच्छा नाही. अजून माझा विश्वास बसत नाही कीं तो योद्धात मारला गेला आहे. माझे हे हृदय कसे जालिम आहे पहा, मला मरू देत नाही. खरोखरच देवाने मला दीर्घायुष्य दिले आहे त्याचा हा परिणाम आहे. मित्र नसलेला मी असा कसा जगत राहू? सगळ्यांच्या दयेचा विषय मी बनणार आहे. एके काळी राजा असलेला मी आता एक आश्रिताचे जीवन जगणार आहे कां? मी माझ्या शत्रूंचा आश्रित बनणार आहे कां? दुःखातून आणखीन मोठ्या दुःखात मी जाणार आहे. अरे संजया, भिष्म व द्रोण आणि आता कर्णाच्या देहांतानंतर माझे सैन्य फार काळ लढत राहील असे संभवत नाही. कर्ण मोठी मदत होता आम्हाला पण तोसुद्धा राहिलेला नाही. कर्ण अर्जुनाच्या असंख्य बाणाने भरल्यावर एकाद्या हत्तीसारखा कोसळला असेल. तो धृतराष्ट्रांचा एकमेव आधार होता. पण सगळे संपले असे वाटते. त्याच्या आधाराने माझे पुत्र मोठ्या मोठ्या योजना आखत होते व कर्ण त्या पुर्या करत असें. ते दिवस गेले आता. तहानलेल्याला पाणी तसा कर्ण दुर्योधनासाठी होता. आम्ही योजतो एक व होते दुसरेच. दैव सर्वशक्तीमान तिला कोण बाद करू शकत नाही".

"मला सांग संजया, दुःशासन रणांगणांतून पळून जात असतांना मारला गेला कां? त्याने कांही चुकीचे काम केले होते कां? इतर क्षत्रियांप्रमाणे तो उगाचच मेला कां"? मूर्ख

दुर्योधनाने युधिष्ठीराचा संदेश स्वीकारला असता तर बरे झाले असते. भिष्माने अर्जुनाकडे शेवटचे पाणी मागितले. त्याने जमिनीला छेद करून पाणी काढले व ते थेट पितामहांच्या तोंडात गेले. ते झाल्यावर ते दुर्योधनाला बोलले, "अरे राजा, आता तरी पांडवांबरोबर समझौता कर". पण तेसुद्धा त्याने मानले नाही. आता न बोलता तो त्याबद्दल पश्चात्ताप करत असेल पण त्याचा आता काय उपयोग? संजया, मी कोणाकडे सल्ला मागू? त्या द्युताच्या खेळाने माझेच वाटोळे केले आहे अखेरीस. पंख छाटलेल्या पक्षासारखी माझी गत झाली आहे. आता माझे कोणी नाही. मी माझ्या शत्रूच्या ताब्यात रहाणार आहे. त्यांचा कैदी म्हणून मला रहावे लागते कीं काय, कोण जाणे"? ज्याने कंबोजाना, अम्वस्थाना, कैकेयांना, हरवले, ज्याने गांधारांना हरवले, विदेहीना हरवले ज्याने सगळी पृथ्वी जिंकली, दुर्योधना साठी त्याचा पराभव अर्जुनाने केला. खरोखरच पांडव जास्त चांगले योद्धे शाबीत झाले आहेत".

"संजया मला सांग, त्या मुकूटधारी अर्जुनाने कर्णाला मारले तेव्हां इतर कोण योद्धे तेथे होते"? कर्णाला कोणी कां मदत केली नाही? ह्या आधीसुद्धा तू मला सांगितले आहेस माझे योद्धे पांडवांकडून कसे मारले जात होते. जेव्हां शिखंडीचे बाण भिष्माला लागत होते तेव्हां पितामहानी कांहींच विरोध केला नाही असे तू मला सांगितले आहेस. तसेंच जेव्हां द्रुपदाचा मुलगा धृष्टद्युम्न द्रोणांना तलवारीचे घाव घालत होता तेव्हां तेथे कोणी त्याला आवरायला आले नाही ते तू मला सांगितले आहेस. असे दोघे त्यांच्या विलक्षण स्थितीत असतांना त्यांचा वध झाला होते. त्याला फसवणूक म्हणता येईल. जर ते लढण्याच्या मनस्थितीत असते तर त्यांना कोणी कधीही मारू शकणार नव्हते. हे सत्य आहे. कर्णाच्या बाबत काय झाले, त्याच्याकडे भात्यात नागबाण होता जो सोन्याचा होता, त्याच्याकडे जमदाग्नीने दिलेली अस्त्र होती, त्याच्याकडे ब्रह्मास्त्र होती, त्याने अभिमन्यूचे बाण उडवून लावले होते, भिमाला तिनदा हरवले होते, सहदेवाला हरवले होते, केवळ दया म्हणून त्याने इतर पांडवांना मारले नाही. त्यांने इंद्राने दिलेला शलाक वापरून घटोत्कचाचा वध केला केवळ नाईलाज म्हणून, त्या कर्णाने अर्जुनाशी कधीच द्वंद्व केले नव्हते, तो त्या द्वंद्वात कसा मारला गेला ते मला समजत नाही. असे काय झाले म्हणून तो मारला गेला ते मला सांग. त्याचा रथ बिघडला होता कां? त्याचे धनुष्य

तुटले होते कां? त्याच्या कडची शस्त्रं सामुग्री संपली होती कां? असे कांही झाले नाही तर मग काय झाले कीं, तो मारला गेला? मला वाटते त्याचे धनुष्य तुटले असावे किंवा त्याच्या रथाचे चाक मोडले असावे. तू मला सांगतोस कीं तो मेला पण कसा मेला ते सांगत नाहीस, असें कां? कर्ण मला बोलला होता कीं, जोवर तो फाल्गुनीचा वध करत नाही तोवर तो माझे पाय धुणार नाही. त्याच्या भितीने युधिष्ठीराला तेरा वर्षे झोप लागत नव्हती तशा योद्ध्याचा मृत्यू असा कसा झाला ते समजत नाही. त्या सभेत तो सगळ्या पांडवांची तुलना तीळाच्या दाण्याशी करत होता तो कसा मारला गेला. कर्णाचा अभिमान मला आठवतो, तो दुर्योधनाला बोलला होता कीं, जर भिष्म सरसेनापती असतील तर तो त्या युद्धात लढणार नाही, म्हणून तो पहिले दहा दिवस लढत नव्हता. भिष्मांच्या नंतर द्रोणांच्या अधिकारात तो युद्धात सामील झाला होता. कर्णाने आरोप केले होते कीं भिष्म व द्रोण त्यांच्या पांडवांबद्दलच्या प्रेमामुळे त्यांना मारत नाहीत व तो बोलला होता कीं, त्याच्या अधिकारात सरसेनापती पद आले कीं तो सगळ्या पांडवांचा नाश करेल. गर्वाने तो बोलत होता कीं, अर्जुनाच्या गांडीवापेक्षा व न संपणार्या भात्या पेक्षा त्याचे बाण जास्त प्रभावी आहेत. अशा वल्गना करणारा अशारितीने मरतो ते पटत नाही माझ्या मनाला. अधिरथाच्या मुलाच्या बरोबरीचे कोणाही नव्हते. त्याची खरी कुवत माझ्या मूर्ख मुलाला कधीच समजली नाही. तो कर्ण व दुःशासनांच्या बातावर विसंबून होता त्याने वासुदेवाचे ऐकले नाही, म्हणून आज माझ्यावर हे दिवस आले आहेत. कर्णाचा द्वंद्वांत मृत्यू व पांडवांचे जिंकणे ह्याबद्दल दुर्योधन काय बोलत होता ते मला सांग. धर्मर्सन, वृषसेन व त्यांचे सैन्य मारले गेले त्यामुळे सगळ्यांचे चेहरे पहाण्यासारखे झाले होते. माझा मुलगा केवळ दुःख करण्याशिवाय दुसरे काय करणार? सर्व संपत आले आहे हे पाहून तो दुराभिमानी मूर्ख दुर्योधन ज्याचा स्वतावर ताबा नाही, ज्याचे मित्र त्याला सोडून गेले आहेत, काय सांगत होता ते मला सांग. भिमसेन त्याच्या भावांची कत्तल करत होता ते पाहून तो काय बोलत होता ते मला सांग. कर्ण मेला ते पाहून तो काय बोलला ते मला सांग. माझा मुलगा व शकूनी मला सांगत होते कीं कर्ण अर्जुनाचा वध करणार आहे. त्यांचे काय झाले. मला आठवते जेव्हां ते द्युतात जिंकले तेव्हां खूप मजेत होते. पांडवाना वनात पाठवतांना ते सगळे फार आनंदात होते

तो शकूनी आता कर्णाच्या मृत्यूनंतर काय बोलत होता ते मला सांग. कर्णाला मेलेला पाहून कृतवर्मन काय बोलला ते मला सांग. अश्वत्थामा काय बोलला ते मला सांग. कृप काय बोलले? मद्रदेशाचा राजा सल्य काय बोलला ते मला सांग. जेव्हां ते झाले तेव्हां सल्य कर्णाचे सारथ्य करत होता म्हणजे त्यांने तो प्रसंग प्रत्यक्ष पाहिला आहे. द्रोणांच्या जाण्यानंतर आपल्या सैन्याच्या विविध फौजांचे काम कोण पहात होते"?

मला सांग संजया, मला सांग तो महान योद्धा कर्णाचा सारथी कसा बनला? त्या रथाचे उजव्या बाजूचे संरक्षण कोण करत होते. कोण डाव्या बाजूचे संरक्षण करत होते. कोण मागून होते, ते कोण योद्धे जे कर्णाचे पाठराखण करत होते. कोण कर्णाला सोडून गेले, ते सगळे असतांना तो एकटा कसा मारला गेला? काय पाडव त्यांचा बाणांचा वर्षाव करत होते जेव्हा ते घडले. कर्णाकडील नागबाणाचे काय झाले? तो बाण असतांना तो कसा मारला गेला"?

भिष्म व द्रोणांच्या मृत्यूनंतरच मला जगणे असहय्य झाले आहे. त्यात कर्णाच्या मृत्यूने भर घातली आहे. पांडवांनी शेवटी ते केलेच जे ते बोलत होते. अरे संजया, मला ते सगळे सांग जे त्या शूर योद्ध्यात घडले कर्णाच्या मृत्यूनंतर. कर्णाच्या मृत्यूची सगळी खबर मला सविस्तर समजून घ्यावयाची आहे.

कर्ण पर्व भाग नववा संपला.

# कर्ण पर्व

## भाग दहावा

संजय पुढे सांगतो, द्रोणांचा वध झाल्यावर त्याचा मुलगा नारायण अस्त्राचा प्रयोग करतो जो फसतो कृष्णाच्या हुशारीने त्यानंतर तुमचे सैन्य रणभूमी सोडून पळून जाऊ लागते. त्यावेळी अर्जुन त्याच्या पलटणीची आघाडी उभी करतो व त्याचे बंधू त्याच्या बरोबर असतात. अर्जुनाला त्या तयारीत असलेले पाहून तुमचा मुलगा दुर्योधन त्याचे सैन्य पळत असलेले सुद्धा पहातो, तो त्यांना पुन्हा एकत्र करतो, अखेरीस त्याचे सैन्य युद्धासाठी तयार होते. दुर्योधन त्याच्या हिम्मतीने पांडवांशी लढत होता. पांडव मात्र त्यांच्या होणार्या सरशीमुळे बेहद्द खूष होते. त्यांच्या आनंदाला पारावार नव्हता. त्यांचे नैतिक बळ बरेच वाढलेले होते. तरी दुर्योधन त्याच्या जमवलेल्या फौजांच्या मदतीने पांडवांशी बराच काळ लढत होता. तोपर्यंत तिन्ही सांजा झाल्या होत्या. दुर्योधन त्याच्या फौजांना त्या दिवशीचे युद्ध बंद करण्याचे आदेश देतो. ते आपापल्या तंबूत गेल्यावर कौरव त्यांच्या बैठका घेऊ लागतात. ते त्यांच्या श्रीमती बैठकांवर बसून त्या बद्दल चर्चा करत होते. त्या सभेत दुर्योधन बोलतो त्यांना उद्देशून, "अहो बुद्धिमंतानो, आत्ता ठरवा ह्यापुढे आपण काय केले पाहिजे"?

संजय पुढे सांगतो, ते त्याचे बोलणे ऐकल्यावर तेथे बसलेले त्याचे साथी विविध सल्ले देऊ लागतात. त्याच्या साथींचा उत्साह पाहून तुमच्या मुलाला धीर मिळतो. त्याचा चेहरा उजळतो. त्या सभेत अश्वत्थामा बोलतो, "सूज्ञ सांगतात कीं कोणतेही कार्य सिद्ध होण्यासाठी उत्साह, संधी, कुवत, धोरण असे सगळे योग्य असले पाहिजे. जेथे ते जमले तेथे कामयाबी मिळते परंतु, दैव त्यात फेरफार करू शकते. आपल्या बाजूला जे आहेत ते देवांपेक्षा कांहीं कमी नाहीत. त्यांचे कुवत धोरणं सदैव योग्य असतात, ते संधीचा फायदा उठवण्यात तरबेज आहेत. ते आपल्यासाठी प्राण देण्यास तयार आहेत. म्हणून आपण विजयाची अपेक्षा करावयाला हरकत नाही. जर ते सगळे योग्य प्रकारे हाताळले तर दैवसुद्धा आपल्या बाजूला होऊ शकते. त्यासाठी आपण कर्णाला आपला सरसेनापती करून त्याच्या नेतृत्वाखाली पुढची लढाई केली पाहिजे.

त्याच्या नेतृतवाखाली आम्ही शत्रूचा निःपात करू". अश्वत्थामाचे ते ऐकून दुर्योधनाचा कर्णावरील विश्वास आणखीन बलवत्तर होतो. कर्ण त्यासाठी योग्य आहे असे सगळे जमलेले मान्य करतात. भिष्म व द्रोणानंतर आता कर्ण नेतृत्व करणार आहे हे सगळे समजतात. नव्या उत्साहात तो कर्णाला बोलतो, "अरे मित्रा, मी तुझी हिम्मत ओळखतो, त्यावर मी विसंबून राहू शकतो. तरी कांहीं बाबी मी तुला सांगणार आहे ज्यात माझा मतलब आहे. ते समजल्यावर त्यातील जे तुला करता येईल ते तू कर. तू खूप हूशार आहेस व मला मोठा आधारसुद्धा आहेस. ते दोन अतिरथी गेले आता तू आमचा सेनानी हो. ते दोघे वृद्ध होते. त्याशिवाय ते पांडवांच्या बाबत प्रेम असणारे होते. तरी मी त्यांचा आदर करत होतो. त्यांच्या प्रेमामुळे ते त्याना स्पर्श करत नव्हते. तू सुद्धा भिष्माच्या काळात युद्धात भाग घेतला नव्हतास. त्यांच्या निधनानंतर तुझ्या सांगण्या वरून द्रोणांना मी सरसेनापती म्हणून नेमले होते. त्यानीसुद्धा पांडवांना स्पर्श केला नाही. कारण ते त्यांचे शिष्य होते. त्यांचा वध धृष्टद्युम्नाने केला. मला दुसरा कोणी त्या योग्यतेचा योद्धा दिसत नाही तुझ्याशिवाय ह्या युद्धाच नेतृत्व करण्यासाठी. तू सदैव आमच्या भल्याचाच विचार करत आला आहेस. म्हणून तू आता ही जबाबदारी घे. तू सरसेनानी झाल्याचे समजल्यावर पांडव आणि पांचाल, श्रींजय सगळे पळून जातील रणांगण सोडून अशी माझी अपेक्षा आहे. तू त्यांचा नाश करशिल असे मला वाटते.

संजय पुढे बोलतो, दुर्योधनाच्या आशा पल्लवित होतात. तो बोलतो, "पार्थाला तुझ्याशी एकेरीत लढण्याची हिम्मत नाही. त्याला तू आता आव्हान दे तुझी हिम्मत दाखव".

कर्ण बोलतो, "अरे गांधारीच्या मुला, मी आधीसुद्धा ते बाललो होतो व पुन्हा सांगतो कीं, मी पांडवांचा नाश करणार आहे. विशेषकरून अर्जुनाचा नाश करण्याचे मी ठरवले आहे. त्यांच्या बरोबर कृष्णाचासुद्धा मी विनाश करणार आहे. ते माझे तुला वचन आहे. मी सेनापती झाल्याने तुला बरे वाटणार हे मी समजू शकतो. असे समज कीं, पांडव मेले आहेत".

पुढे संजय सांगतो, असे त्यांचे बोलणे झाल्यावर दुर्योधन सगळ्या राजांना एकत्र बोलावतो. कर्णाची नेमणूक सगळ्यांना सांगतो. त्या करतां ज्या विधी करावयाच्या त्या संपन्न होतात. सोन्याचे व मातीचे हंडे पवित्र पाण्याने भरलेले व मंत्राने सिद्ध केलेले त्यासाठी हस्तीदंत आणि गेंड्याचे शिंग वापरले जाते. सुगंधी द्रव्य आणि जवाहीरं असे सगळे ब्राह्मणांना दान केले जाते जे त्या विधीत भाग घेतात. औदुंबराच्या लाकडाचे आसन कर्णाला बसण्यासाठी असते. त्यावर तो रुबाबात बसलेला होता. वैदीक विधी संपन्न होत होते व त्यासाठी ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य, शुद्र असे सगळे तो विधी करण्यात भाग घेतात. त्याला स्नान घातले जाते. त्या सगळ्याना भरपूर दानं केली जातात जशी कर्णाची इच्छा होती. ब्राह्मण त्याला आशिर्वाद देतात. सगळे त्याला दुवा देतात कीं तो पार्थ व जनार्दनाला ठार मारून यश कौरवांसाठी प्राप्त करील. त्यावर सगळे जयघोष करतात. भाट कर्णाची स्तुती करतात त्यांत अर्जुन व कृष्णाची निंदा असते. त्या अवस्थेत कर्ण फारच सुंदर व तेजस्वी दिसत होता, जणू दुसरा सूर्य असावा. त्यानंतर तो कौरवांच्या सैन्याची जुळवणी करू लागतो. जीवावर उदार होऊन लढण्याच्या शपथा घेतल्या जातात. तुझी मुलं त्याच्या भोवती जमली होती त्यात तो स्कंध देवांत कसा चमकत होता तसा चमकत होता.

कर्ण पर्व भाग दहावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग अकरावा

धृतराष्ट्र बोलतात, "सरसेनापती पदाचे ग्रहण केल्यानंतर, दुर्योधनाकडून उत्तेजनार्थ गौरवोद्‌गार ऐकल्यानंतर आणि सैन्याची व्यवस्था केल्यानंतर पुढे कर्ण काय करतो"? संजय बोलतो, कर्णाची इच्छा समजल्यावर कौरवांचे सैन्य मोठ्या दिमाखात सज्ज केले जाते. ती अठराव्या दिवसाची पहाट होती. सैन्याच्या हालचालीचा मोठा आवाज ऐकू येत होता. त्यात अचानकपणे तुमच्या सैन्यात मोठा गोंधळ ऐकू येऊ लागला त्या गोंधळाचा आवाज आकाशाला भिडला होता. त्यात कर्ण त्याची चिलखते घालून त्याच्या सोनेरी रथात उभा होता. तो सूर्यासारखा चमकत होता. त्याच्या रथात सर्व शस्त्र सामुग्री सज्ज होती. त्यात शत्रूघ्न, शलाक, गदा, लाकडी सोटे, विविध प्रकारचे धनुष्य व अनेक प्रकारचे बाणांने भरलेले भाते असे सगळे तयार होते. कर्ण त्याचे शंखू मोठ्याने वाजवून त्याचे आव्हान देतो. त्याला पाहिल्यावर भिष्मांचे व द्रोणांचे जाणे, त्यामुळे जे नैराश्य कौरवांत आले होते ते निघून जाते. मोठ्या उत्साहाने ते लढण्याच्या तयारीला लागतात. कर्ण मकर व्युह रचना करतो सैन्याची. त्या रचने अनुसार तो पांडवांवर चालून जातो. यश मिळवणे हा एकमेव उद्देश त्यात होता. त्या मकराच्या मुखाकडे स्वतः कर्ण होता. त्याचे दोन डोळे होते शकूनी व त्याचा मुलगा उलूक. डोक्याच्या ठिकाणी अश्वत्थामा होता. मध्ये पोटाच्या ठिकाणी दुर्योधन होता. डाव्या बाजूला कृतवर्मन होता, त्याला मदत करण्यासाठी नारायण सैन्य होते. त्यांच्या बरोबर गोपाल जातीचे योद्धे होते. उजव्या बाजूला कृप होते. त्यांची फौज त्यांच्या बरोबर होती.

टीपः गोपाल लोकांना आज अहिर म्हणून ओळखले जाते. ते व नारायण लोक भाडोत्री सैनिकांचे काम करत असतं. नारायण लोकांना आज गुर्जर म्हणतात. त्या दोनही लोकांचा मुख्य व्यवसाय पाळीव जनावरं राखणे असा होता. त्यात सगळी पाळीव जनावरं येतात. पाळीव जनावरांच्या उद्योगाला अहिरी उद्योग समजतात. त्या दोन लोकांना कृष्णाचे सैन्य असं समजले जात असें. ते कृष्णाने दुर्योधनाला दिले होते.

त्याना मदत म्हणून त्रिगर्त, दाक्षिणात्य होते. शेवटी डावीकडे सल्य त्याचे सैन्य घेऊन होता. उजवीकडे सुशेना होता. त्याच्या भोवती घोडेस्वार व हत्तीदल होते. शेपटाकडे दोन सच्चे भाऊ होते, चित्र आणि चित्रसेना. त्या व्युह रचनेची तो पहाणी करतो. ती रचना पाहून युधिष्ठीर अर्जुनाला बोलतो, "ते पहा कर्णाचे सैन्य, त्याची रचना चांगली आहे. कौरवांचे बहुतेक मोठे योद्धे मारले गेले आहेत जे उरले आहेत ते मामुली आहेत. त्यांच्यात फक्त एकच कर्ण आहे. त्याला मारणे तिन्ही जगाला शक्य नाही. जर तू त्याला ठार मारलेस तर विजय आपला होईल. गेली तेरा वर्षे जो कांटा मी उरात घेऊन आहे तो निपटून काढणे आता तुझ्या हातात आहे. ते लक्षात घेऊन तुझी व्युह रचना तयार कर. ते ऐकल्यावर अर्जुन त्याच्या प्रतिकाराची व्युहरचना करतो. त्या रचनेला अर्धचंद्र असे नांव होते. त्याच्या डाव्या बाजूला भिम होते. उजव्या बाजूला धृष्टद्युम्न होता. मधोमध धनंजय स्वतः होता. नकूल व सहदेव युधिष्ठीराच्या मागे होते. दोन पांचाल पुत्र युधमन्यू आणि उत्तमौजस अर्जुनाचे संरक्षक झाले. त्यांना अर्जुनाचे संरक्षण होते. ते अर्जुनाची साथ अजिबात सोडणार नसतात. बाकीचे दोस्त राजे त्यांच्या तयारीने लढण्यासाठी सज्ज होते. त्यातील प्रत्येकाला कांहीं विशिष्ट कार्य त्यांच्या कुवतीनुसार दिलेले होते. अशी रचना पांडवांची होती. त्यांच्यात युद्ध सुरू झाले. कर्णाची रचना पाहून दुर्योधन समजतो कीं, पांडव आता हरणार निश्चित. त्या कल्पनेत तो खूष होऊन राहीला होता. त्याच प्रमाणे युधिष्ठीर त्यांची रचना पाहून समजत असतो कीं, कौरव आज हरणार. दोघे खूष होते. त्यानंतर युद्ध प्रारंभाचे वाद्य वादन सुरू होते. त्यामध्ये शंखू, मोठे नगारे, ढोलकी, झांजा, असे सगळे वाजवले जात होते. त्यांचा मोठा आवाज होत होता. त्यात शूरवीर योध्यांचे ओरडणे सामील होते. त्याबरोबर घोड्यांचे खिंकाळणे व हत्तींचे चित्कार भर घालत होते. रथांच्या चाकांचा गडगडाट होत होता तो वेगळा त्यात भर घालत होता. त्या उत्साहात कौरवांचे द्रोणाला विसरले होते. नवा दिवस नवा सूर्य असे ते होते. एकमेकांचे जीव घेण्यासाठी ते उत्सूक होते. दोन नायक, कर्ण व अर्जुन एकमेकांवर तुटून पडणार होते. त्यांची सैन्ये जणू काय आनंदात असावी अशी नाचतच एकमेकांच्या सैन्यात घूसणार होती. त्यानंतर माणसे, घोडेस्वार व हत्तीस्वार असे लढू लागले. कर्ण पर्व भाग अकरावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग बारावा

संजय पुढे सांगतो, त्यानंतर तेथे भीषण युद्ध सुरू होते. मृत्यूचे तांडव सुरू होते. अनेक शूर योद्ध्यांची मुंडकी त्या रणांगणात पडत होती. धारदार शस्त्राने ते एकमेकांना कापत होते. रक्ताच्या चिळकांड्या उडत होत्या. त्यात तलवारी, कुर्हाडी, भाले, बरच्या, बाण असे सगळे वापरले जात होते. माणसांचे मुडदे पडत होते. कोणाचे हात तर कोणाचे पाय तुटून पडलेले दिसत होते. मरणारे किंचाळत होते पण त्याची कोणाला पर्वा नव्हती. त्या बरोबर घोडे, हत्ती ह्यांचीसुद्धा कत्तल होत होती. त्यांचे प्रचंड धूड जमिनीवर कोसळतांना मोठा आवाज होत होता. रथांचासुद्धा चुराडा होत होता. योद्धे शेकड्याने मरून पडत होते. दोनही बाजूच्या सैनिकांची संख्या कमी होत होती. रणांगण पहिल्या सारखे भरलेले दिसत नव्हते. मरून पडणारे लढवय्ये त्यांच्या शस्त्रासकट जमिनीवर कोसळत होते. रथ रथावर आदळून पडत होते. चिडलेले हत्ती त्यांच्या पायाखाली अनेकांना चुरडत होते. कोण कोणाला मारत होता तें समजत नव्हते. मोठा संहार होत होता. पांडवातील अर्जुन व वृकोदर कौरवांवर जोराचा हल्ला करतात. त्यात हातातील शस्त्रांचा जास्त वापर होत होता. कारण युद्ध करणारे सैनिक संख्येने कमी झालेले होते. पांडवांपैकी धृष्टद्युम्न, शिखंडी, द्रौपदीची मुलं, सत्यकी, द्रविडांपैकी चेकीतन, पांड्या, चोला, केरली, ते सगळे लढत होते. सगळे योद्धे उंच धिप्पाड बांध्याचे होते. त्यांची शस्त्र वेगळ्या प्रकारची होती. त्यांचे कपडेसुद्धा भिन्न प्रकारचे होते. त्यात सत्यकीचे योद्धे उठून दिसत होते. त्यात आंध्रचे फारच भयंकर दिसत होते व त्यांच्या लढण्यात विशेष जोर होता. त्यांच्या बरोबर लढत होते पांडवांचे छेड्डी, पांचाल, कैकेया, कुरूष, कोसल, कांची, मगध येथील सैनिक होते. ते सगळे मरण्यासाठी मोठ्या उत्साहाने लढत होते. त्यांच्या चेहर्यावर दुःख दिसत नव्हते कारण ते जर मेले तर स्वर्गात जाणार होते.

ते होत असतांना वृकोदर हत्तीच्या मानेवर बसून तुमच्या हत्तीदलावर चाल करतो. ते सगळे हत्ती सर्व शस्त्रसज्ज होते. त्यांचे चिलखत लोखंडी होते. त्यावर मौल्यवान रत्न

जडवलेली होती. दोनही हात उंच करून तो पुढे जात होता. तुमचे क्षेमधूर्ती स्वतः हत्तीवर होता भिमाला सामोरी जातो. त्या दोन हत्तीत जुंपते. दोन मोठे डोंगर एकमेकांवर आपटत आहेत असे ते दिसत होते. त्या हत्तीवरून ते दोघे एकमेकांवर तलवारीने वार करण्याचा प्रयत्न करत होते. ते करत असतांना जोराने ओरडत होते. ते द्वंद्व इतर जण पहात होते. त्यांची करमणूक होत होती. त्यांचे हत्तीसुद्धा लढत होते. ते त्यानंतर बाणांने एकमेकांवर वार करू लागले. त्यानंतर ते शलाकाने मारा करू लागले. क्षेमधूर्ती भिमाच्या छातीत तलवारीचा वार करतो. त्याचा भिमाला फार राग येतो. भिम क्षेमधूर्तीवर तलवार फेकून मारतो. कुलुताचा राजा क्षेमधूर्ती त्याच्या दहा बाणाने ती तलवार तोडतो व नंतर भिमावर सहा बाण मारतो. भिम एक मोठा बाण शत्रूच्या हत्तीवर मारतो. क्षेमधूर्तीचा हत्ती त्या बाणाच्या जखमेमुळे पळू लागतो. भिमाचा हत्ती त्याचा पाठलाग करू लागतो. क्षेमधूर्ती आपल्या हत्तीला सावरतो व भिमाच्या हत्तीवर वर्मी तसाच मोठा बाण मारतो. त्यामुळे भिमाचा हत्ती कोसळून पडतो. त्यावरून भिम वेळीच उडा मारून उतरलेला असतो. त्यानंतर तो त्याच्या गदेने प्रतिस्पर्ध्याच्या हत्तीवर जोराचा फटका मारतो. त्यानंतर भिम क्षेमधूर्तीवर गदेने वार करतो. त्या फटक्याने क्षेमधूर्ती मरतो. कुलुताचा राजा क्षेमधूर्ती मेला हे पाहिल्यावर त्याचे सैन्य युद्धातून दूर होते.

कर्ण पर्व भाग बारावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग तेरावा

संजय पुढे सांगतो, त्यानंतर कर्ण पांडवांच्या सैन्याचा फडशा पाडण्यास सुरूवात करतो. त्याच्या बदल्यात पांडवांचे योद्धे कौरवाच्या सैन्याचा फडशा पाडू लागतात. कर्णाच्या समोर ते करत असतात. दोनही बाजूचे सैनिक मारले जात होते. कर्णाने एका हत्तीला मारलेल्या बाणामुळे चवताळलेला हत्ती अनेक सैनिकांना पायाखाली तुडवत सैरावैरा धावत रहातो. नकूल कर्णावर चालून जातो. भिम अश्वत्थामावर जातो. सत्यकी कैकेया राजे विंद व अनुविंदाना भिडतो. राजा चित्रसेन श्रृतवर्मनावर जातो. प्रतिर्विंध्य चित्रावर वार करत असतो. दुर्योधन युधिष्ठीरावर जातो आणि धनंजय संसप्तकांवर जातो. अशाप्रकारे ते युद्ध होत असते. मोठ्या प्रमाणात संहार होत असतो. धृष्टद्युम्न कृपांवर जातो. शिखंडी कृतवर्मनावर जातो. श्रृतकिर्ती सल्यावर आणि सहदेव दुःशासनावर जातो. दोन कैकेया राजे सत्यकीला घेरतात. त्यांचे युद्ध होत असते. सत्यकीला ते छातीत बाण मारून जखमी करतात. सत्यकी त्यामुळे घाबरला जात नाही व त्याना त्याच्या बाणाने हैराण करतो. ते दोघे बंधू सत्यकीला त्यांच्या बाणानी अडकवतात. ते पाहून अर्जुन त्या दोघा भावांना त्याच्या बाणानी आवरण्याचा प्रयत्न करतो. सत्यकी एका बाणांने अनुविंदचे डोके उडवतो. ते पाहून कैकेया सैनिक फार दुःखी होतात. आपला भाऊ मारला गेला आहे ते पाहून विंद मागे हटत नाही. तो त्याच्यावर जोरानें हल्ला करतो. तो अनेक बाण मारून सत्यकीला बाद करण्याचा प्रयत्न करतो. सत्यकीचे सगळे अंग जखमानी भरलेले होते. तरी त्याचा जोर जरासुद्धा कमी झाला नव्हता. सत्यकी विंदला पंचवीस बाण मारतो. ते एकमेकांची धनुष्य मोडून टाकतात. त्यांचे युद्ध जंभ व शक्राच्या युद्धासारखे वाटत होते, आकाशातील प्रेक्षकांना. त्यानंतर तो रथाच्या गोल फेर्या मारू लागतात. सत्यकी कैकेयाची ढाल तोडतो. कैकेयासुद्धा सत्यकीची ढाल मोडतो. ते होत असतांना सत्यकी विंदची हत्या करतो. तो रथातून खाली पडतो. त्यानंतर आपला बिघडलेला

रथ सोडून तो युधमन्यूच्या रथात चढतो. त्यांचा वध केल्यानंतर युयुधन कैकेया लोकांची कत्तल करू लागतो. कैकेया पळून जाऊ लागतात.

कर्ण पर्व भाग तेरावा संपला.

# कर्ण पर्व
## भाग चौदावा

संजय सांगत असतो, श्रृतकर्मन, चित्रसेनावर पन्नास बाण मारून हल्ला करतो. तो अभिसराचा राजा चित्रसेन त्याची परतफेड करतो. त्यामध्ये तो त्याचा सारथी घायाळ करतो. श्रृतकर्मन रागाने चित्रसेनाच्या वर्मी घाव मारतो. त्यामुळे चित्रसेनाला भोवळ येते. त्या अवस्थेत तो असतांना तरी श्रृतकर्मन त्याच्यावर बाणांचा मारा करत रहातो. चित्रसेन थोड्या वेळांनी सावध होतो. तो श्रृतकर्मनाचा तिरकमटा मोडून टाकतो, त्याला सात बाण मारतो. चित्रसेन श्रृतकर्मनाच्या छातीत मारतो. त्यांचे रक्त फार सांडले जाते. श्रृतकर्मन सुद्धा त्याच्या छातीत बाण मारतो. दोघे आव्हान चालू ठेवतात. दोघेही रक्ताने माखलेले होते. परंतु, कोणी मागे हटायला तयार नव्हते. श्रृतकर्मन चित्रसेनाचे धनुष्य पुन्हा मोडून टाकतो. त्यानंतर तो चित्रसेनावर बाणांचा वर्षाव करू लागतो. त्यात श्रृतकर्मन चित्रसेनाचे डोके उडवतो, ते खाली पडते. आपला राजा मेला हे पाहून त्याचे सैनिक श्रृतकर्मनाच्या सैन्यावर जोराचा हल्ला करतात. परंतु, त्यांचा संहार होतो व ते पळून जातात. दुसरीकडे प्रतिविंध्य चित्राच्या अंगावर पांच बाण मारतो. त्याचा ध्वजस्तंभ पाडतो. चित्रा पळून जातो. चित्रा प्रतिविंध्यावर शलाक फेकतो परंतु, त्याचे अनेक तुकडे प्रतिविंध्य करून टाकतो. तो प्रतिविंध्याकडे गदा फेकतो. त्यांमुळे त्याचे घोडे मरतात. तो रथातून उतरतो. प्रतिविंध्य एक शलाक फेकतो चित्रावर परंतु, चित्रा तोंच शलाक त्याच्या अंगावर उलट फेकतो. तो त्याच्या उजव्या हाताला इजा करतो. संतापलेला प्रतिविंध्य चित्रावर एक तलवार फेकतो. ती चित्राच्या छातीतून आरपार जाऊन खाली पडते. चित्रा खाली कोसळतो. तो मरतो. त्याला मेलेला पाहून त्याचे सैनिक प्रतिविंध्यावर चाल करतात. महाबली प्रतिविंध्य त्या सगळ्यांना पुरून उरतो. अशारितीने त्यांचा संहार होतो. कौरवांची सेना इतस्ततः पळून जाते. सगळ्या बाजूने तुमचे सैन्य हरत असतांना अश्वत्थामा व त्याचे सैन्य भिमाबरोबर लढत असते. त्यांच्यातील द्वंद्व इंद्र व वृत्राच्या द्वंद्वांसारखे होते.

कर्ण पर्व भाग चौदावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग पंधरावा

### [भिम अश्वत्थामा द्वंद्व]

संजय पुढे सांगतो, अश्वत्थामाची चपळाई पहाण्यासारखी होती. तो भिमावर बाणांचा वर्षाव करत असतो. भिमाचे सगळे अंग बाणाने भरलेले असते. तरी तो सूर्यासारखा तळपत होता. भिम द्रोणाच्या मुलावर थेट बाण मारतो व एक मोठी आरोळी ठोकतो. परंतु, भिमाचे ते बाण अश्वत्थामा उलटवतो व त्याच्याकजे पहात हसत रहातो. त्यानंतर तो भिमावर त्याच्या कपाळावर बाण मारतो. भिम ते रूबाबात धारण करतो. त्यानंतर हसत हसत भिम अश्वत्थामाच्या कपाळावर तसेंच तीन बाण मारतो. ते तीन बाण त्याच्या शिरस्त्राणात घट्ट बसलेले फारच सुंदर दिसतात. त्यानंतर तो त्याच्यावर बाणांचा वर्षाव करतो. अशारितीने ते दोघे एकमेकांवर बाणांचा वर्षाव करत असतात. एकमेकांचे डावपेंच उलथून पाडण्यासाठी ते प्रयत्न करत असतात. जसे दोन वाघ झूंजतात तसे ते होते. त्या दोघांनी सोडलेले बाण इतके असतात कीं, त्यांच्या मागे ते दोघे दिसेनासे होतात. अश्वत्थामा भिमाला त्याच्या उजवीकडे घेऊन त्यावर जोराने बाणांचा मारा सुरू करतो. त्यामुळें भिम चिडतो व त्याच्यावर बाणांचा मारा करू लागतो. त्यांचे रथ एकमेकांना गोल फेरे मारत असतात. प्रतिस्पर्ध्याला ठार मारण्याच्या इराद्याने ते दोघे लढत असतात. त्यानंतर द्रोणाचा मुलगा त्याची खास अस्त्र काढण्यास सुरूवात करतो. त्याबरोबर भिमसुद्धा तसेंच करतो. ते एक चांगले प्रदर्शन होते त्यांच्या शस्त्रांचे. त्यानी फेकलेली अस्त्र एकमेकावर आपटून पडत होती. त्या आघातांमुळें अशनि पडावेत असे वाटत होते. त्यांच्यामुळे रणांगणात आगी लागतात. अशी लढाई पुन्हा होणार नाही असें स्वर्गातील प्रेक्षक बोलत होते. ते सांगतात, हे दोघे, एक ब्राह्मण व दुसरा क्षत्रिय दोघांचे शस्त्राचे ज्ञान समसमान आहे, दोघाची हुशारी सारखीच आहे, परंतु, भिम जास्त भयानक वाटत होता. दोघे यमाचे रुप वाटत होते. दोन रुद्र समोरासमोर आले आहेत असे वाटत होते. ते द्वंद्व पहाण्यासाठी स्वर्गातील देव, ऋषी, सिद्ध, चरण गर्दी करून आले होते. आकाशातील ढगांवर

बसून ते त्या द्वंद्वांचा आनंद लुटत होते. भिम व अश्वत्थामा दोघे एकमेकांना जबर जखमा करत होते. पण कोणी माघार घेण्यास तयार नव्हते. त्यांचे डोळे लाल झाले होते व ओठ थरथरत होते. दातओठ चावत ते लढत होते. दोघे एकमेकांचे ध्वजस्तंभ घोडे असे सगळे मारत लढत होते. कोणी थांबायला तयार नव्हते. ते एक भीषण द्वंद्व होते. अखेरीस कोणीतरी एक थकणार त्याप्रमाणे अश्वत्थामा त्याच्या रथाच्या आगाशीत कोसळतो, थकव्यामुळें. त्याबरोबर त्याचा सारथी त्याचा रथ बाजूला घेतो. ते द्वंद्व संपते. कोणी हरलेला नव्हता. ते झाल्यावर भिमाचा साथीसुद्धा तेंच करतो. कारण भिमसुद्धा भोवळ आल्यासारखा झाला होता.

कर्ण पर्व भाग पंधरावा संपला.

# कर्ण पर्व
## भाग सोळावा
### [अर्जुन संसप्तक व अश्वत्थामा ह्यांच्या बरोबर लढतो]

धृतराष्ट्र बोलतात, "अरे संजया, मला सविस्तरपणे सांग संसप्तक व अर्जुन ह्यांच्यातील लढाईची माहीती. त्याशिवाय अश्वत्थामा व अर्जुन ह्यांच्यातील द्वंद्व व इतर राजांशी झालेले अर्जुनांची द्वंद्वं, हे सगळे मला तुझ्या कडून ऐकावयाचे आहे".

संजय सांगतो, "ऐका ते सगळे मी आता सांगतो. त्या युद्धांमुळें शरीरांचा, त्याबरोबर असलेल्या पापांचा नाश कसा झाला ते समजून घेऊ. शत्रूंचा नाश करणारा तो पार्थ संसप्तकांवर तुटून पडतो. त्याच्या धारदार बाणांने तो त्या संसप्तकांचे वीर मारत असतो. थोड्याच वेळांत त्या रणभूमीत मेलेल्या क्षत्रियांचे ढीग लागतात. अनेकांचे बलवत्तर असे हात तो छाटून टाकतो. पार्थ त्याच्या बाणांनी त्यांचे घोडे, सारथी व दुसरे सहाय्यक मारत असतो. त्यांचे झेंडे, त्याचे खांब, पाडत असतो. त्यांचे घोडे, हत्ती रथ सगळे तो बरबाद करत असतो. अनेक योद्धे मोठ्या जोमांने अर्जुनावर हल्ला करतात. तो मोठ्यानो ओरडत त्याच्यावर वार करत असतात. त्यांचे युद्ध फारच भीषण होते. अर्जुन ज्याला कांहीं वेळा जय म्हणून बोलतात, शत्रूंच्या रथाचा चुराडा करत होता त्याच्या दैवी अस्त्रांनी. ज्या प्रकारे अर्जुन त्यांचे पारिपत्य करत होता ते पाहून स्वर्गातील ऋषी, सिद्ध, साध्य, देव त्याचे कौतुक करत होते. त्यामुळे स्वर्गातील नगारे वाजू लागले. दैवी फुलांचा पाऊस पडू लागला अर्जुन व कृष्णावर. ब्रह्म व इशान जसे अजिंक्य असतात तसे ते दोघे अजिंक्य त्या रथावर होते. ती नर व नारायणाची जोडी शोभत होती. अर्जुनाचा प्रताप अश्वत्थामाला समजला. तो त्यांच्यावर धाव घेतो. हातात ताणलेले धनुष्य व त्याला लावलेला बाण असा तो अर्जुनासमोर जाते. त्याच्या पुढे उभा रहात तो हसत त्यांना बोलतो, "अरे मर्दा, मला तुझ्याकडून लढण्याची मेजवानी पाहिजे ती देणार कां"? असे अश्वत्थामा बोलल्यावर अर्जुनाला फार संतोष होतो. तो कृष्णाकडे पहात त्याला सांगतो, "संसप्तक मी मारणार आहेच परंतु, तूर्त

हा अश्वत्थामा आला आहे त्याला कांहीं द्यावे असेसुद्धा मला वाटते. मला सांग ह्यातील कोणती जास्त महत्वाची आहे"?
कृष्ण त्यांचा रथ अश्वत्थामाच्या रथाजवळ नेतो जसे युद्ध शास्त्रात दिले आहे. कृष्ण द्रोणाच्या मुलाला अभिवादन करत अश्वत्थामाला बोलतो, जरा सबूर करा, ही वेळ अशी आहे कीं, पहिला त्याला त्याचे कर्तव्य करावयाचे आहे. हळूच पार्थाच्या कानांत सांगतो, ब्राह्मणांतील वाद गुप्त असतात ते दिसत नाहीत परंतु, क्षत्रियांचे वाद फार उघड असतात. त्यांच्या वादात एक तर जिंकावयाचे नाहीतर हरावयाचे असते. अशा वेळी तू पार्थाला लढण्याचे आमंत्रण देत आहेस, हा तुझा मूर्खपणा आहे. ते ऐकल्यावर तो ब्राह्मण त्याला बोलतो, "तसे होऊ दे. असे बोलून तो कृष्णाला साठ बाण मारतो. अर्जुनाला तीन मारतो. अर्जुन त्याने चिडतो व त्याचे धनुष्य मोडून टाकतो. अश्वत्थामा नवीन धनुष्य घेतो. त्या दोघांवर बाण मारू लागतो. कृष्णावर जास्त बाण मारतो. त्याच्या सर्वांगावर तो बाण मारत असतो. त्याने समाधान झाले नाही म्हणून तो त्याच्या रथावर घोड्यांवर असे सगळीकडे बाण मारून त्यांना त्रस्त करून टाकतो. ते केल्यानंतर द्रोणाच्या मुलाला फार आनंद झालेला दिसतो. तो मोठी गर्जना करून त्याचा जय दाखवतो. त्याचा आनंद पाहून अर्जुन कृष्णाला बोलतो, "ते पहा माधवा, त्याचा माझ्याशी होत असलेला वात्रटपणा. त्याला वाटते कीं, त्याने आपल्याला मारले आहे. त्याच्या दाट बाणांच्या आवरणात आपण गेलो आहोत. मी आता माझ्या ताकदीनुसार त्याला धडा शिकवणार आहे. त्यानंतर अश्वत्थामाचा प्रत्येक बाणाचे तीन तुकडे करून त्याने दाखवले. त्यामुळे ते बाण तुटून खाली पडले. ते बाणांचे आवरण नष्ट झाले. त्यानंतर पंडुचा मुलगा संसप्तकांच्यावर चालून जातो. पहिल्या प्रमाणे त्यांचे माणसे, हत्ती, घोडे तो मारू लागतो. तेथे असलेले त्यांचे सगळे त्याने मारले होते. त्याने दोन मैल एवढ्या परिसरातील ते सगळे नष्ट केले. त्या मारामुळें संसप्तकांचा तो अफाट समुद्र जणू आटून गेला. एका क्षणाचाही अवधी न देता, तो अश्वत्थामाच्या छातीत बाण मारतो. ते आव्हान तो स्वीकारते व त्याचे बाण तो मारू लागतो. अर्जुन त्याने मारलेले सगळे बाण तोडून टाकतो. त्यानंतर अर्जुन संसप्तकांना सोडतो व अश्वत्थामाच्या मागे लागतो. कर्ण पर्व भाग सोळावा संपला.

# कर्ण पर्व
## भाग सतरावा
### [अश्वत्थामा युद्धभूमी सोडतो]

संजय पुढे सांगतो, त्यानंतर अर्जुन व अश्वत्थामा ह्यांच्यात द्वंद्व सुरू झाले. शुक्र व गुरू जसे दिसतात नभात तसे ते दोघे त्या रणांगणात वाटत होते. अर्जुन अश्वत्थामाला एक खोल जखम करतो. त्याच्या दोन डोळ्यांमध्ये तो बाण मारतो. अश्वत्थामाच्या बाणांने त्रस्त झालेले दोघे नर व नारायण दोन सूर्य असावेत असें वाटत होते. कृष्णाला भोवळ येते ते पाहून अर्जुन त्याच्या एका आयुधाने असंख्य बाण अश्वत्थामावर मारण्यास सुरूवात करतो. अश्वत्थामा कांही कमी नव्हता. तो कृष्ण आणि अर्जुनाला जोरदार बाण मारतो. त्या बाणाने निश्चित मृत्यू आला पाहिजे असें ते होते. अर्जुन त्याचे घोडे, रथ व सारथी अशा सगळ्यांना घेरून टाकणारे बाण मारत असतो. ते केल्यावर तो संसप्तकांच्यावर जातो. त्याच्या बाणबाजीने तो त्यांचे सगळे तोडून मोडून टाकत असतो. संसप्तकांतील योद्धे मरत असतात. त्यातील कलिंग, वंग आणि निशाद जे हत्तीवर स्वार होऊन लढत होते, ते अर्जुनावर चालून जातात त्याला ठार मारण्यासाठी. अर्जुन त्यांच्या हत्तीच्या सोंडी कापून काढतो त्यामुळे ते मरतात. डोंगर कोसळावा तसे ते मरून पडत होते. त्यांचा जोर ओसरल्यावर अर्जुन पुन्हा अश्वत्थामाकडे वळतो.

अश्वत्थामा त्याची जणू वाट पहात होता. तो मोठ्याने गर्जना करत त्यांच्यावर बाणांचा मारा सुरू करतो. त्या बाणामुळे अर्जुनाला त्रास होतो. अर्जुन अश्वत्थामा व त्याच्या सैनिकांवर नेम धरतो. तो अश्वत्थामाचे बाण उलटवतो. सव्यसाची ज्या वेगांने त्याचे बाण मारत होता ते विलक्षण होते. त्याच्या माराने कोसळणारे प्राणी मात्र दिसत होते. अश्वत्थामा त्याचे बाण असें मारते कीं ते एकच बाण आहेत असे वाटावे. त्यातील पांच बाण पार्थाला व पांच वासुदेवाला बाधतात. त्यांच्या अंगातून रक्ताच्या धारा लागतात. सगळ्यांना वाटते कीं, ते दोघे मेले. कृष्ण सव्यसाचीला बोलतो आता अश्वत्थामाचा वध करून टाक हा खेळ फार झाला. अशाला जास्त खेळवत राहीलास तर तो एक दुखणे होऊन आपल्याला त्रास देत राहील. ते ऐकल्यावर अर्जुन त्याला उत्तर देतो, तसेंच

करतो. त्यानंतर तो अश्वत्थामाच्या बाणांना उत्तर देऊ लागतो. अर्जुन त्याच्या हातावर व मांड्यावर बाण मारतो. त्या नंतर त्याचे घोडे तो मारतो. त्यामुळे अश्वत्थामा युद्धभूमी सोडून पळून जातो. त्या बाणांमुळे ज्या जखमा झाल्या त्यामुळे तो ठरवतो कीं, तो पुन्हा लढण्यासाठी जाणार नाही. त्याला समजले होते कीं, त्याच्या लढण्यात आता अर्थ नाही. कारण विजय पांडवांचाच झाला आहे हे स्पष्ट होते. अश्वत्थामा कर्णाच्या आश्रयाला जातो. अशारितीने तो गेल्यानंतर अर्जुन व कृष्ण संसप्तकांच्या मागे लागतात. कर्ण पर्व भाग सतरा संपला.

# कर्ण पर्व

## भाग अठरावा

### [अर्जुन मगधचा राजा दंडधराला मारतो]

संजय पुढे सांगतो, ते होत असतांना पांडवांच्या सैन्याच्या उत्तरेकडे असलेल्या भागात मोठा गदारोळ ऐकू येतो. मगधचा राजा दंडधर पांडवांच्या सैन्याचा संहार करत असतो. हत्ती घोडे व माणसे असें सगळे तो मारत असतो. ते ऐकल्यावर अर्जुन त्याच्या रथाचा मार्ग त्या दिशेने वळवण्यास सांगतो कृष्णाला. कृष्ण त्याला बोलतो, "मगधचा राजा व त्या हत्ती कोणालाही ऐकणारे नाहीत. त्यांचे हत्ती भागादत्ताच्या हत्तीसारखेच आहे. तो स्वतः सुद्धा दुसरा भागादत्तच आहे. म्हणून प्रथम ह्याचा बंदोबस्त कर व नंतर संसप्तकांकडे जाऊ. ते त्याचे सांगितल्यावर कृष्ण त्याला दंडधराची माहिती सांगतो. तो मगधचा राजा आहे. हत्ती तयार करण्यात निष्णात आहे. तो पांडवांचे सैन्य नष्ट करत आहे. जसे अशनि कोसळतात तसा तो पांडवांवर कोसळत आहे. त्याचे हत्ती दुसरे दानव आहेत हत्तीच्या रुपात असें समज. दंडधर त्याच्या बाणांनी आपले (पाडवांचे) सैन्य मारत आहे. त्याचे हत्ती पांडवांचे सैनिक, रथ पायाखाली तुडवत जात आहेत. त्याचे हत्ती माणसे मारण्याचे प्रशिक्षण दिलेले आहेत. ते साक्षात यमाचे दूत असल्यासारखे आहेत. ते समजल्यावर अर्जुन त्या ठिकाणी निघतो. त्या गर्दीतून त्याला रथ काढावयाचा असतो. अर्जुनाला येतांना पाहून दंडधर अर्जुनावर कांहीं बाण मारतो. जनार्दनावरसुद्धा कांहीं बाण मारतो. त्यांच्या घोड्यावर बाण मारतो. आणि मोठ्याने आव्हानात्मक गर्जना करतो. त्यानंतर तो तुच्छपणे हसू लागतो, अर्जुनाकडे पहात. त्यानंतर अर्जुन मोठ्या पात्याच्या बाणांने दंडदराचे धनुष्य तोडून टाकतो. त्याचे ध्वजस्तंभ पाडतो. त्याच्या हत्तीना संरक्षण देणारी चिलखतं तो काढून टाकतो. ते पाहून तो गिरीव्रज रागावतो. तो त्याच्या हत्तीला चिथवतो कीं, तो कृष्णाला दांत मारेल. तो हत्ती एकाद्या ढगासारखा मोठा होता. दंडधर अर्जुनाला तलवारीने वार करतो. अर्जुन त्याच्या बाणाने त्या तलवारी तोडून टाकतो. त्याच वेळी अर्जुन दंडधराचे दोन हात जे हत्तीच्या सोंडीसारखे मजबूत होते छाटून टाकतो. त्यानंतर त्याचे

डोके उडवले जाते. त्यानंतर अर्जुन त्याच्या हत्तीवर शेकडो बाण मारतो. तो हत्ती त्यामुळे जोराजोराने चित्कार करू लागतो. इकडे तिकडे तो धावू लागतो व त्यातच बेहोष होऊन खाली पडतो. त्याच्या खाली त्याचा दंडधारीचा भाऊ चुरडला जातो. ते पाहून दंडधारी अर्जुनावर चालून जातो. तो जनार्दनाला तीन बाण मारतो. अर्जुनावर सहा मारतो. त्याबरोबर अर्जुन दंडधारीचे दोनही हात छाटून टाकतो. ते दोनही हात त्याच्या हत्तीच्या पाठीवरून खाली पडतात. त्यानंतर धनंजय त्याच्या एका बाणांने दंडधारीचे मुंडके उडवतो. ते जमिनीवर पडते. पार्थ त्यानंतर असंख्य बाण मारून त्याच्या हत्तीला ठार मारतो. त्यानंतर इतर तसेंच हत्ती असतात त्यांना तो तेथून पळायला लावतो. ते झाल्यावर रणभूमीत एकच गोंधळ सुरू होतो. दंड आणि दंडधर मेल्यावर त्यांच्या फौजांचा नाश करण्यास सुरूवात होते. ते पांडवांचे सैनिक अर्जुनाच्या भोवती जमा होतात व त्याचे कौतुक करतात. तुम्ही जर नसता तर तो आम्हाला ठार मारूनच राहीला असता. ते ऐकल्यावर अर्जुन त्यांचे स्वागत करतो. ते झाल्यावर त्याचा रथ पुन्हा संसप्तकांच्या मागे लागतो.

कर्ण पर्व भाग अठरावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग एकोणीसावा

### [अर्जुन संसप्तकांचा नाश करतो]

संजय पुढे सांगतो, अर्जुन त्याचा रथ गोलाकार फिरवत संसप्तकांचा संहार करत होता. त्याच्या बाणांने जखमी झालेले सैनिक, हत्ती व घोडे सैरावैरा फिरून अखेरीस शुद्ध जाऊन खाली कोसळत होते. संसप्तकांचे शूरवीर योद्धे अर्जुनावर तुटून पडत होते. ते एक भीषण युद्ध होते. जसे प्राचीन काळी इंद्र व दैत्यांत तिनही जगाचे राज्य मिळवण्यासाठी होत असे. त्यात उग्रयुधाचा मुलगा पार्थाला तीन बाणांने भोसकतो. परंतु, त्याचे डोके पार्थ कापून टाकतो. त्यामुळे संतापलेले त्यांचे योद्धे अर्जुनाला चहूबाजूने घेरतात. विषारी बाणांचा उपयोग ते करत असतात. पार्थ ते प्रत्येक बाण वरच्या वर उडवून देत होता. त्यानंतर ते अर्जुनावर विविध आयुधानी हल्ला करतात. अर्जुन ती सगळी त्याच्या दैवी आयुधाने निकामी करत होता. तशात तो अनेक त्यांचे योद्धे मारत होता. त्यामध्ये अर्जुन त्रिवेणूचे घोडे मारतो. सारथी मारतो, अनेकांचे बाण, भाते असे बरेच कांही तो नष्ट करतो. त्यामुळे संसप्तकांचे भारी नुकसान होत होते. ते उध्वस्त झालेले सामान जळत होते. अनेक घोडे त्यांच्या स्वारासह खाली कोसळत होते त्याच त्यांची पोटं फाटत होती व त्यातून त्यांची आतडी बाहेर आलेली दिसत होती. ते फारच भंयकर दिसत होते. अर्जुनाच्या धारदार बाणाने जखमी झालेले योद्धे जोराजोराने किंचाळत होते. कांहीं वेदना सहन न झाल्यामुळें रडत होते. ते दृष्य फारच केविलवाणे होते. कांहीं त्यांचे रक्त फार वाहून गेल्यामुळे त्यांचे मृत देह पांढरे फिक्कट झालेले दिसत होते. जसे महेंद्र दानवांचा नाश करत होता तसे अर्जुन संसप्तकांचा विध्वंस करत होता. सर्व शस्त्र सज्ज सैनिक त्यांच्या प्राण्यासह तेथे रणभूमीवर मरून पडलेले दिसत होते. त्यांच्या अंगावरील दागिने सूर्याच्या प्रकाशात चमकत होते. विविध प्रकारची शस्त्रं तेथे विखरून पडलेली दिसत होती. ते सगळे पार्थान मारलेले होते. उत्तमगुणी, उच्च कुलीन, ज्ञानी व सूज्ञ असे क्षत्रिय त्यांच्या मृत्यूनंतर स्वर्गात जात होते. त्यांची कलेवरं मात्र तेथे जमिनीवर पडलेली होती. त्या मरणार्यांचे सेनापती रागात पार्थावर

चालून जातात. ते सगळे त्यांच्या वाहनावरून येत असतात. बाणांचा वर्षाव ते करत होते. त्यांचे हजारो बाण अर्जुनावर येत असतांना तो त्याच्या दैवी अस्त्रांच्या मदतीने ते निरुपयोगी करत होता. त्यांच्या गर्दीतून तो वाट काढत जात असतो, त्याच वेळी त्यांना मारत होता. त्याची शस्त्रं आक्रमण व संरक्षण अशी दोनही काम करत होती. वासुदेव पार्थाला बोलतो, "तू अशारितीने त्यांच्याशी खेळत बसू नकोस. त्यांचा वेळ न घालवता नाश करणे अगत्याचे आहे. त्यासाठी घाई कर आणि त्यांना नष्ट करून टाक". ते ऐकल्यावर अर्जुन "तसे करतो", असे बोलतो. त्यानंतर अर्जुन त्याची महाअस्त्र काढतो. त्यामुळें मोठ्या संख्येने त्याचा विध्वंस होऊ लागतो. ज्या वेगांनी व चपळाईने त्याचे बाण फेकले जात होत त्याचे कृष्णालासुद्धा कौतुक वाटत होते. मोठ्या संख्येने संसप्तकांचा संहार होऊ लागला. ते पहात कृष्ण पार्थाला बोलतो, "अरे पार्था, त्या दुर्योधनामुळे हा संहार होत आहे त्यामुळें त्याचे पाप त्याला लागत आहे. पहा ते राजे फुकटच मारले जात आहेत जे एरवी त्यांच्या राज्यात सुखाने राज्य करत असते. त्यांची शस्त्रं पहा, त्यांचे दागिने पहा, पहा किती विविध प्रकारची सामुग्री रणभूमीत पडलेले आहे. मरून पडलेल्यांच्या हातातील शस्त्र पहा. कितीतरी प्रकारच्या गदा, तलवारी, शलाक असे कितीतरी आता त्या रणभूमीत शांत होऊन पडले आहेत. त्या हात तोफा पहा. त्या भुशिंडी पहा, त्या कनपा पहा, सगळीकडे कुंन्ता कसे विखरून पडले आहेत ते पहा. कोणाचे ते आहेत ते आता कोणाला समजणार नाही. ते योद्धे त्यांची खास आयुध घेऊन आले पण तुझ्या पुढे ती कुचकामी झाली आहेत. पहा ते योद्धे त्यांची शरीर कशी चिन्हभिन्ह झाली आहेत. त्या गदा पहा कशा रक्ताने माखलेल्या आहेत. ते तुटलेले हात पहा. कोणाचे ते आता समजणार नाही. हत्तींच्या तुटलेल्या सोंडी पहा. तुडलेले पाय कोणाचे ते समजणार नाही ते पहा. ते मोडलेले रथ पहा, त्यावरील सुंदर नक्षीकाम पहा. पोट फाटून पडलेले घोडे पहा. त्यांची आतडी बाहेर आलेली आहेत. ते फाटलेले झेंडे पहा. कोणाचे त्याला आता कांहीं अर्थ उरला नव्हता. धनुष्य, भाते असे बरेच कांहीं तेथे इतस्ततः पडलेले दिसत होते. त्या पराण्या पहा, हत्तीला चालवण्यासाठी त्यांचा वापर होत होता. त्यांवरील रत्नजडीत काम पहा. त्यांचे श्रीमंती कपडे पहा. त्यावर लावलेले हिरे पहा कस चमकत आहेत. मेलेल्या हत्तीवरील घंटा वारा आला कीं नाजूक झण झण

आवाज करत होत्या. मेलेल्या योद्ध्यांचे असंख्य चेहरे दिसत होते. कांहीचे डोळे उघडे होते तर कांहींचे मिटलेले होते. रक्ताचा सडा सर्वत्र पडलेला होता. प्रत्येक कापड, दागिना, शस्त्र सगळे त्या रक्तांने माखलेले होते. कृष्ण ते पाहून बोलतो, "तू इंद्रा सारखा संहार केला आहेस. सगळे स्वर्गस्थ तुझे कौतुक करत असणार". त्यानंतर ते युद्धभूमीवरून त्यांच्या तंबूकडे जात असतांना त्यांना रणभूमीतून मोठा आवाज ऐकू येतो. दुर्योधनाचे सैन्य त्यांची रणवाद्ये वाजवत होती. त्यात घोड्यांचे खिंकाळणे भर घालत होते. हत्ती चित्कारत होते. त्यात शस्त्रांचा आवाज सुद्धा होत होता. त्या कौरवांच्या लष्करात पांड्या त्याचे योद्धे घालत होता. कृष्णाला ते पाहून मौज वाटली. तो पांड्या कौरवांचे सैनिक मारत होता. जसा दुसरा यम असावा असे वाटत होते. तो कौरवांचे माणसे, घोडे व हत्ती असे सगळे त्याच्या शस्त्रांनी ठार मारत होता. पांड्या दुसरा इंद्र असा झाला होता त्या रणांगणात.

कर्ण पर्व भाग एकोणीसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग विसावा

### [पंड्या ची कमाल]

धृतराष्ट्र बोलतात, अरे संजया तू मला पंड्याबद्दल बोलला आहेस परंतु, त्याचे शौर्याबद्दल कधी सांगितलेले नाहीस. मला त्याच्या कर्तृत्वाची सगळी माहीती करून घ्यावयाची आहे.
संजय बोलतो, भिष्म, द्रोण, कृप, अश्वत्थामा, कर्ण, अर्जुन आणि जनार्दन कोणालाही पांड्या भाव देत नव्हता. तो स्वताला त्यांच्या पेक्षा उच्च दर्जाचा योद्धा समजत होता. तरी त्याला युधिष्ठीराबद्दल असलेल्या आपुलकीमुळें तो पांडवाना मिळाला होता. त्यावेळी तो कर्णाशी लढत होता. पांड्याने हल्ला केल्यावर कर्णाचे सैन्य त्याच्या भोवती गोल फिरत होते. त्याच्या नेमबाजीपुढे कोणाचे कांहीं चालत नव्हते. पांड्या कौरवांच्या हत्तीना त्याच्यावर बसलेल्या योद्ध्यासकट खाली पाडत असे व त्यात ते मारले जात होते. त्याचप्रमाणे तो घोड्यांवर बसलेल्या स्वारांनासुद्धा घोड्यासकट मारत होता. भंयंकर संहार होत होता. कोणीही पांड्यापुढे टिकत नव्हता. पुलिंद, कलिंग, निशाध, अंधक, तंगन, दाक्षिणात्य, भोज, असे सगळे त्याच्या तडाख्यात मारले जात होते. ते पाहून अश्वत्थामा त्याच्यावर चाल करतो बेडरपणे. निर्धास्तपणे अश्वत्थामा त्याला हसत हसत बोलतो, "अहो महाराज, आपला जन्म थोर आहे, आपण भरपूर शिकला अहात, सन्माननीय अहात, आपण इंद्रासारखे दिसता, आपले बाहू मजबूत आहेत, त्या रुबाबात आपण शत्रूंवर बाणांचा वर्षाव करता. मला दिसत नाही कोणी आपल्याला विरोध करत आहे. आपण एकटेंच कित्येक रथ, हत्ती, घोडे मारत अहात. आपण निर्भिड अहात. असे तुम्ही फार देखणे दिसता. परंतु, आता तुम्हाला माझ्याशी लढावयाचे आहे. जसे अंधक असुर त्रिनेत्रीशी लढले". ते ऐकल्यावर पांड्या ते मान्य करतो. त्यानंतर त्यांच्यात द्वंद्व सुरू होते. त्यात सुरूवात अश्वत्थामा करतो व त्याबरोबर मलयध्वजाचा राजा पांड्या, त्याला प्रत्यूत्तर देतो. अश्वत्थामा पांड्याच्या वर्मी कांहीं बाण मारतो. ते द्रोणाच्या मुलाचे बाण उंच आकाशात जाऊन खाली येत असतांना पांड्या त्याच्या नऊ बाणांने ते सगळे तोडून टाकतो. आणखीन चार बाणांने तो अश्वत्थामाचे घोडे घायाळ करतो. त्या जखमांनी ते घोडे

नंतर मरतात. अश्वत्थामाचे बाण तोडल्यानंतर तो त्याच्या धनुष्याची दोर तोडतो. द्रोणाचा मुलगा नवीन दोर लावतो, त्याच्या सहायकांनी नवीन घोडेसुद्धा लावले होते. आता तो हजार बाण पांड्यावर मारू लागतो. त्या बाणांने तो ब्राह्मण सगळे आकाश भरून टाकतो. पंड्या ते सगळे बाण तोडत रहातो. त्यानंतर पंड्या अश्वत्थामाचे दोन साथीदार जे त्याच्या रथाच्या चाकांचे संरक्षण करत होते त्यांना ठार मारतो. त्याची चपळाई पाहून अश्वत्थामा गोल फिरत असंख्य बाण फेकत रहातो. ते अनेक गाडे भरतील इतके होते. अश्वत्थामा फार चिडलेला होता. ते वायव्य अस्त्रासारखे झाले होते. ते पाहून पांड्या अतिशय खूष झालेला दिसला. मोठ मोठ्याने गर्जना करू लागला. अश्वत्थामा मलय पर्वताचे चिन्ह असलेले ध्वज व त्याचा दांडा पाडतो. पांड्याचे घोडे मारतो. त्यानंतर तो पांड्याचा सारथी मारतो. त्यानंतर पांड्याचे धनुष्य तोडतो. त्यानंतर अश्वत्थामा पांड्याच्या रथाचा चुराडा करतो. त्यावेळी त्याला पांड्याला सहज मारता आले असते परतु, तो तसे करत नाही. कारण त्याला मारण्यापेक्षा त्याच्याशी खेळत रहाणे अश्वत्थामाला जास्त योग्य वाटत होते. त्या सुमारास कर्ण त्यात घूसतो पांड्यांचे मोठे हत्तीदल मारण्यासाठी. त्याच्या सैनिकांच्या मदतीने तो त्या पांड्याच्या सैन्यात शिरून ते नष्ट करू लागतो. त्यासुमारास एक बलाढ्य हत्ती माहूताशिवाय त्याच्यावरील सगळ्या युद्ध साहित्यानिशी पांड्याच्या दिशेने धावत येत असतांना अश्वत्थामा त्याला बाण मारतो. पांड्याला हत्तीवर कसे चढावयाचे ते चांगले माहीत होते. तो त्या हत्तीवर मोठ्या चपळाईने स्वार होतो. जसे सिंह हत्तीच्या पाठीवर चढतात. तो हत्ती पांड्या अश्वत्थामाकडे वळवतो व त्याच्या दिशेने एक धारदार तलवार फेकत म्हणतो, "आता तू मेलास". त्या तलवारीमुळे अश्वत्थामाचा मुकूट मोडून तोडून जातो. तो तुटलेला मुकूट जमिनीवर पडतो. तो अश्वत्थामाला अपमान वाटतो व तो भयंकर संतापतो. तो पंड्यावर पांच पन्नास जोरदार बाण फेकतो. त्यातील चार बाणांने तो त्या भल्यामोठ्या गजराजाचे पाय छाटून टाकतो. त्यानंतर त्यांची सोंड कापून टाकतो. त्यानंतर तो पांड्याचे दोन हात छाटतो. त्यानंतर त्याचे डोके तो छाटतो. पंड्यामागून येणारे त्याचे स्वार तो मारून टाकतो. पांड्या खाली पडतो. त्याची मरण्या आधीची धडपड सुरू होते. जसा साप वळवळतो तसा तो वळवळत होता. पांड्याने अनेक सैनिक मारले होते ज्यांना राक्षस नंतर खाणार होते तो स्वतः आता त्यात पडला होता. ते

पाहिल्यावर तुमचा मुलगा विष्णू जसा वलीच्या वधानंतर आनंद व्यक्त करतो तसा त्याच्या भावंडांबरोबर आनंद व्यक्त करण्यासाठी द्रोणाच्या मुलाला भेटतो. त्याने त्याचे काम चोख केले म्हणून त्याचे अभिनंदन करतो.

कर्ण पर्व भाग विसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग एकविसावा

धृतराष्ट्र बोलतात, अरे संजया, पांड्य मारला गेला आणि कर्ण इतर योद्ध्यांचा नाश करत होता, त्यावेळी अर्जुन काय करत होता ते मला सांग.

संजय पुढे सांगतो, पांड्याचा वध झाल्यावर कृष्ण ताबडतोब अर्जुनाला बोलतो, "मला युधिष्ठीर कोठे दिसत नाही, काय इतर पांडवसुद्धा गेले आहेत कां? जर पांडव लढत राहीले तर मोठ्या प्रमाणात शत्रूचा संहार करणे शक्य आहे. कर्ण श्रींजयांचा नाश करत आहे. त्यात असंख्य घोडे आणि हत्ती मारले जात आहेत". असे बोलून कृष्ण अर्जुनाला जे होत आहे त्याची कल्पना देतो. ते ऐकल्यावर थोडा चिंतीत होऊन तो कृष्णाला बोलतो. "आपले घोडे त्या दिशेने ने". हृषिकेश तसे करतो. त्यानंतर पुन्हा एक युद्ध सुरू होते ते फार भीषण होते. कौरव आणि पांडव एकमेकांत घुसून युद्ध करत होते. पांडवांचे नेतृत्व भिम करत होता. त्या लढाईने यमाच्या राज्यात आणखीन संख्या वाढत होती. त्यात सगळ्या युद्ध सामुग्रीचा वापर होत होता. ते एकमेकांचा जीव घेण्यासाठी लढत होते. सगळे आकाश व आसमंत त्यांच्या बाणानी भरलेले होते. धनुष्याचे टणत्काराचे आवाज, बाणांचे हवा कापत जाण्यामुळे होणारे आवाज. रथांच्या चाकांचे आवाज असे बरेच आवाज त्यात भर घालत होते. त्या आवाजामुळे उत्तेजित झालेले योद्धे त्यांच्या वैराला वाट देत होते. कांहीं योद्धे त्या आवाजामुळें बावचळून जात होते. कांहीं त्यामुळे बेहोष होत होते. कर्ण त्यातील अनेकांना त्याच्या बाणांनी मारून टाकत असतो. त्यांतील पांचालांचे योद्धे मारतांना त्यांचे घोडे पथ असे सगळे तो नष्ट करत असतो. ते पाहून पांडवांचे लढवय्ये कर्णाला घेरा घालतात. कर्ण त्यांच्यात घुसतो. त्यांच्याशी लढू लागतो. पांडवांतील योद्धे मारले जाऊ लागतात. धडाधड खाली कोसळत असतात. प्रेतांचा खच होतो. त्याच्या बाणांच्या क्षेत्रात जे आले ते सगळे त्यांनी मारलेले होते. ते पाहून पांचालांची मुलं, द्रौपदीची मुलं, युयुधन, नकूल व सहदेव एकत्रपणे कर्णावर हल्ला करतात. त्यांची आयुध घेऊन कर्णावर चालून जातात. दोनही बाजूचे योद्धे त्यांच्या संरक्षक कवचाने सुरक्षित असें एकमेकांवर हल्ला करत असतात. एकमेकांना मारत ते खाली पडत होते. त्यांचे रक्ताने

माखलेले चेहरे पहाण्यासारखे होते. रथांचे झेंडे, त्यांचे खांब, रथाची चाकं, छत्र्या असें सगळे चहूकडे पडलेले दिसत होते. हत्तींच्या सोंडी, दांत, माणसांचे अवयव, धारदार बाणांने कापलेले तेथे पडलेले होते. असंख्य असे चिरडलेले होते हत्तीच्या पायाखाली कीं, त्यांची ओळख होत नव्हती. कित्येक हत्तींच्या मृत शरीराखाली गाडलेले होते. ते दृष्य पहावत नव्हते.

कर्ण पर्व भाग एकविसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग बाविसावा

## [युद्धाला जोर येतो]

संजय पुढे सांगतो, तुमचे अनेक योद्धे त्यांच्या घोड्यावरून लढत असतांना, दुर्योधन त्यांना आदेश देतो कीं, ते धृष्टद्युम्नावर जातील. ते डोळ्यात खून असलेले क्षत्रिय त्याच्या मागे लागतात. पूर्वेकडील व दक्षिणेकडील योद्धे जे हत्तीबरोबर लढण्यात तयार होते, त्यांच्या बरोबर वंग, कलिंग, पुंड्र, अंग, मगधी, ताम्रलिपंतक, मेकल, कौशल, मद्र, दशर्न, निशाद त्यांना मिळाले होते. प्रिशताचे मुलगे त्यांच्यावर बाणांचा वर्षाव करतात. पांचालानीसुद्धा त्यांच्यावर हल्ला केला होता. परंतु, ते हत्ती त्यांना घेरा घालतात. ते पाहून पांडवांचे व पांचालांचे त्यांच्यावर चालून जातात. त्या हत्तींवर ते जोराचा मारा करतात व ते करत असतांना त्यांच्या रथात नाचत असतात. त्यांना साथ देण्यासाठी रणवाद्ये वाजवली जात होती. नकूल, सहदेव, द्रौपदीची मुलं, प्रभाद्रक, सत्यकी, शिखंडी, चेकीतन, त्यांच्या शस्त्रांनी त्या हत्तीची शरीरं त्यांच्या रक्ताने भरून काढतात. ते संतापलेले त्यांच्या म्लेच्छ माऊतांच्या आदेशानुसार माणसांना, रथांना फेकून देत होते. कांहींना पायाखाली चिरडत होते. सत्यकी त्याच्या लांब बाणाने हत्तीना असे वर्मी भोसकत होता कीं, ते खाली कोसळत होते. सहदेवाने पुंड्राच्या हत्तीला मारले तीन बाण जेव्हां तो हत्ती त्याच्यावर चालून गेला. त्यानंतर तो अंगच्या हत्तीवर गेला. त्याने शंभर बाणांने त्याला खाली पाडले. अंगच्या राजाने नकूलावर बाण मारले. त्यानंतर आठशे भाले फेकले. ते सगळे नकूल तोडत होता. त्यानंतर एका बाणांने तो त्याला ठार मारतो. त्यांचा राजा मेल्यानंतर त्याचे सैन्य नकूलावर स्वारी करते. त्यानंतर अनेक मेकल, उत्कल, कलिंग, निशाध, ताम्रलिपंतक, असे सगळे त्याच्यावर जातात. त्याला ठार मारण्यासाठी. त्यानंतर पांडव, पांचाल, सोमक, नकूलाला व सहदेवाला मदत करण्यासाठी धावतात. युद्धाला जोर आलेला होता. सहदेव त्याच्या अंगावर चालू येणारे आठ हत्ती मारतो. सत्यकी आणि द्रौपदीची मुलं व प्रभाद्रक, शिखंडी त्या हत्तीना ठार मारतात. अशारितीने ते कौरवांचे हत्ती

मोठ्या प्रमाणात मारत होते. हत्ती मारल्यानंतर पांडवांचे सैन्य आपल्या इतर सैनिकांकडे वळतात. त्यांचा मुख्य ओघ आता असतो कर्णाकडे.

कर्ण पर्व भाग बाविसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग तेविसावा

### [सहदेव दुःशासनाशी लढतो]

संजय पुढे सांगतो, सहदेव अशारितीने तुमच्या फौजांची वाट लावत होता तेव्हां दुःशासन तेथे त्याच्या पुढे येतो. दोन चुलत भाऊ समोरासमोर आले होते लढण्यासाठी. त्यांना समोरासमोर पाहून सगळे दोनही बाजूचे लढवय्ये हात हलवून व झेंडे फडकवून त्यांचे स्वागत करतात. दुःशासन लागलीच सहदेवाच्या छातीत तीन बाण मारतो. त्याबरोबर सहदेव लागलीच त्याला सत्तर बाण मारतो. त्याच्या सारथ्याला तीन बाण मारतो. त्यानंतर सहदेवाचे धनुष्य दुःशासन मोडून टाकतो. त्यामुळे सहदेव तलवार घेतो. ती दुःशासनावर फेकतो. दुःशासनाचे धनुष्य तोडून ती तलवार खाली पडते. सहदेव दुसरे धनुष्य घेतो. दुःशासनावर बाण मारतो. त्यानंतर दुःशासन सहदेवावर साठ बाण मारतो. सहदेव ते सगळे बाण तोडत असतो. त्यानंतर दुःशासन मोठी आरोळी मारतो, सहदेवाला जखमी करतो. त्याचे सगळे बाण सहदेव तोडत असतो. दुःशासन सहदेवाच्या सारथ्याला घायाळ करतो. सहदेव एक मोठा प्रभावी बाण काढतो व दुःशासनावर नेम धरतो. त्यामुळे तुमच्या मुलाचे चिलखत फाटते. त्यामुळें दुःशासन बेहोष होतो. ते पाहून त्याचा सारथी त्यांचा रथ युद्धातून बाहेर काढतो. ते केल्यावर सहदेव दुर्योधनाच्या पलटणीवर जातो. तेथे संहार करू लागतो.

कर्ण पर्व भाग तेविसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग चोविसावा

### [नकूल कर्णाबरोबर लढतो]

संजय पुढे सांगतो, नकूल कौरवांचे सैन्य उध्वस्त करण्यात गुंतला असतांना कर्ण रागांने त्याच्यावर चाल करतो. ते पाहून नकुलाला हसू येते. तो बोलतो, "देवाच्या कृपेमुळे तुझी नजर माझ्यावर पडली असे म्हणावेसे वाटते. तू एक नीच माणूस आहेस हे जे घडत आहे त्यामागे तुझी बुद्धी आहे. तुझ्यामुळे कौरवांचे शिरकांड होत आहे. तुझ्यामुळे आम्ही आमच्या भावांचा नाश करत आहोत. तुला मारून मी माझे उद्दिष्ट साध्य केले असे समजीन. माझ्या आत्म्याला शांति मिळेल. माझ्यावर वार कर, मला तुझे शौर्य अनुभवायचे आहे. खरा योद्धा लढून त्याचे शौर्य दाखवतो केवळ मोठ्या गप्पा मारून ते सिद्ध होत नाही. ते नकूल बोलत असतांनाच कर्ण त्याच्यावर ऐंशी बाण मारते झपाट्याने. त्यामुळें त्याला जखमा होतात. परंतु, नकूल सुद्धा त्याच्यावर बाण मारतो. कर्ण नकूलाचे धनुष्य मोडून टाकतो. नकूल नवीन धनुष्य घेतो. कर्णावर वार करू लागतो. तो कर्णाचे धनुष्य तोडतो. हसत हसत तो धनुष्य नसलेल्या असहाय कर्णावर वार करत रहातो. तेवढ्यात कर्ण दुसरे धनुष्य घेतो. नकूलावर वार करतो. त्याच्या खांद्यावर बाण मारतो. नकूल कर्णाच्या धनुष्याचे टोक तोडतो. कर्णाकडून येणारे सगळे बाण तो तोडत असतो. आकाशात पाहिले तर ते बाण टोळ धाडीसारखे दिसत होते. ते एक सुंदर दृष्य होते. कर्णाच्या धनुष्यातून निघणारे बाण सोमकांचे शिरकाण करत होते. त्याच प्रमाणे नकूलाच्या बाणाने तुमचे योद्धे मरत होते. बरेच सैनिक दोनही बाजूचे त्या बाणांच्या क्षेत्राबाहेर जाऊन ते युद्ध नुसते पहात होते. जसे दोघांचे सैनिक अशाप्रकारे लांब जाऊन उभे राहीले ते एकमेकांवर बाण मारू लागले. कर्णाला त्या द्वंद्वाचा कंटाळा आला असावा, तो नकूलाला त्याच्या बाणांने घेरतो. परंतु, त्याचा कांहींच परिणाम नकूलावर होत नाही. कर्णाने मारलेले बाण आकाशात असें पसरलेले असतात कीं, त्याची एक छत आकाशात घालावे अशी सावली पडते. कर्ण नकूलाचे धनुष्य मोडतो व त्याच्या सारथ्यालासुद्धा जखमी करतो. त्यानंतर त्याचे घोडे मारतो. नकूलाचे सर्वस्व तो काढून घेतो. तो आपल्या रथातून

उतरतो. हातात सोटा घेऊन रणांगणात उभा रहातो. कर्णावर तो उगारलेला असतो. परंतु, कर्ण तो तोडून देतो. त्यामुळे निराश झालेला नकूल रणांगण सोडून जातो. ते कर्ण पहातो व हसतो. कर्ण त्याला बोलतो, "अरे मुला, तू तुझ्या बरोबरीच्यांशी लढत जा. आता घरी जा माद्रीच्या मुला किंवा जेथे अर्जुन आणि कृष्ण आहेत तेथे जा". असे बोलून कर्ण त्याला सोडून देतो. कर्ण त्याला सहज मारू शकला असता. परंतु, कुंतीला दिलेल्या आश्वासनामुळे तो ते करत नाही. त्यानंतर नकूल सहदेवाच्या रथात बसून जातो.
कर्ण त्यानंतर पांचालांच्या सैन्याकडे कूच करतो. कर्ण पांचालांवर जात आहे ते पाहून पांडवांच्या सैन्यात मोठा गहजब होतो. त्यावेळी सूर्य मध्यान्हीला आला होता. त्या रणांगणात लढाईपेक्षा इतर गोष्टी जास्त दिसत होत्या. त्यात स्वार नसलेले घोडे व हत्ती नुसते भटकत होते. मोडलेले रथ पडलेले दिसत होते. कर्णाच्या बाणाने घाबरलेले हत्ती उलट त्याच्या अंगावर जात होते. युद्ध नितीप्रमाणे ज्या घोड्यावर स्वार नाही तसेंच ज्या हत्तीवर स्वार नाही त्याला मारावयाचे नसते. त्यामुळें अभय मिळाल्यासारखे ते प्राणी त्या युद्धभूमीवर फिरत होते. रिकामे रथ जिकडेतिकडे वेडेवाकडे होऊन पडलेले दिसत होते. कर्णाच्या बाणाने ते मेलेले योद्धे सगळीकडे मरून पडलेले दिसत होते. त्यामध्ये श्रींजयांचे सैनिक जास्त होते. कर्णाच्या तावडीतून सुटलेले पांचाल पळून जातांना दिसत होते. कर्ण मात्र त्यांचा पाठलाग करतांना दिसत होता.
कर्ण पर्व भाग चोविसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग पंचविसावा

### [उलूक युयुत्सीशी लढतो]

संजय पुढे सांगतो, ज्याने कौरवांचे मोठे सैन्य उध्वस्त केले होते त्या युयुत्सूशी लढण्यासाठी उलूक मोठ्या वेगांने निघाला. त्याला पाहून युयुत्सू त्याच्यावर तुटून पडतो. जसे इंद्र पर्वतावांर वज्र टाकतो. उलूक युयुत्सूचे धनुष्य तोडतो. तरी नवे घेऊन तो उलूकवर सहा बाण मारतो. त्यानंतर तो उलूकाच्या सारथ्याला मारतो. उलूक सुद्धा त्याच्यावर बाण मारत असतो. त्यानंतर युयुत्सूचा झेंडा तो खाली पाडतो. तो झेंडा त्याच्या रथासमोर पडतो. त्यानंतर त्याचे घोडे मारतो. त्यानंतर तो त्याच्या छातीत बार करतो. त्यानंतर उलूक युयुत्सूवर बाण मारत रहातो. त्यानंतर युयुत्सू दुसर्या रथात चढतो. अशारितीने त्याचा पराभव केल्यानंतर उलूक पांचालांच्या व श्रींजयांच्या सैन्यावर जातो. तुमचा मुलगा श्रृतकर्मन सतनिकाचा घोडा मारतो. महारथी सतनिक त्या घोडे नसलेल्या रथात उभा राहून श्रृतकर्मनावर गदा फेकतो. त्यामुळे तुमच्या मुलाच्या रथाचा चुराडा होतो. अशारितीने ते दोघे युद्धातून बाद होतात. त्यानंतर तुमचा मुलगा, घाबरलेला, विविंगसतीच्या रथात चढतो. सतनिक प्रतिविंध्याच्या रथात चढतो. शकूनी रागाच्या भरात श्रृतसोमाला भोसकतो. परंतु, त्याचा कांहीं खास प्रभाव त्याच्यावर होत नाही. आपल्या पित्याचा दुष्मन समोर पाहून त्याचा पारा चढतो. तो शकूनीवर हजारो बाण मारतो. शकूनी त्याच्यावर तीन बाण मारतो. त्याचे घोडे व झेंडा मारतो. त्याचा सारथीसुद्धा मारतो ते पाहून आकाशातील प्रेक्षक टाळ्या वाजवतात. श्रृतसोम जमिनीवर उभा रहातो. तेथून तो शकूनीच्या रथावर अनेक बाण मारून त्याला घेरतो. परंतु, शकूनी ते सगळे बाण त्याच्या बाणांनी उलटवतो. ते पाहून स्वर्गातील सिद्ध फार खूष होतात. त्यानंतर मात्र शकूनी त्याचे धनुष्य व भाते काढून टाकतो. निशस्त्र झालेला श्रृतसोम आता तलवार घेतो. जोराने ओरडत शकूनीवर फेकतो. ती तलवार घेऊन तो चक्राकार फिरू लागतो. त्यात तो चौदा डाव दाखवत असतो. शकूनी त्याच्यावर बाण मारत असतो तर तो त्याच्या तलवारीने ते तोडत असतो. रागावलेला शकूनी श्रृतसोमावर पुन्हा पुन्हा हल्ले करत असतो. श्रृतसोमाची

युद्ध कलेतील कसब कमालीची होती. अखेरीस शकूनी त्याचा तलवार तोडण्यात य़शस्वी होतो. ती जमिनीवर पडते. अर्धी त्याच्या हातात रहाते. सहा पावले तो मागे जातो व नेम धरून ती शकूनीवर फेकतो. त्यानंतर श्रृतसोम श्रृकिर्तीच्या रथात चढतो. शकूनी आणखीन चांगले धनुष्य घेतो. पांडवांवर चाल करतो. तेथे पांडवांचे अनेक योद्धे तो ठार मारतो.

कर्ण पर्व भाग पंचविसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग सव्विसावा

कृप धृष्टद्युम्नाला विरोध करत असतात, त्यावेळी शिखंडी कृतवर्मनाबरोबर लढत होता. संजय पुढे सांगतो, कृपाचा विरोध धृष्टद्युम्नाला तसा होता जसा सरभ सिंहाचा करतो. त्यांच्या विरोधापुढे त्याचे कांहीं चालत नाही. धृष्टद्युम्नाचा रथ कृपांच्या रथापुढे पाहून सगळे समजतात कीं, त्यांचा नाश निश्चित होणार. कृप द्रोणाच्या मृत्यूमुळें नाराज होते ते धृष्टद्युम्नाचा वध करणार असे सगळ्याना वाटते. सगळे विचार करत असतात कां, काय आता हा ब्राह्मण सगळ्या सैन्याचा नाश तर करणार नाही ना? सगळे समजतात कीं, कृप द्रोणाप्रमाणे वागतील. कृप नेहमीच युद्धात अजिंक्य राहीलेले होते. निरनिराळे आपापले विविध अंदाज मांडत होते. कृप त्याच्या सगळ्या शरीरावर बाण मारत होते परंतु, तो तसांच उभा होता. जसे त्याला कांही होत नव्हते. धृष्टद्युम्नाला समजत नव्हते काय करावे. कृप मारत असलेले बाण त्याला लागत नव्हते. असे कधी झालेले कोणी पाहिलेले नव्हते. तो त्याचा रथ पाठी वळवण्याचा विचार करतो. तो म्हणतो "माझे मन गोंधळलेले आहे हेंच खरे. माझ्या अंगातून घामाच्या धारा लागल्या आहेत. माझे शरीर कांपत आहे व माझ्या सबंध अगावर शहारे उठलेले आहे". म्हणून त्या ब्राह्मणाला सोडून आपण अर्जुन अथवा भिमाकडे जावे असे विचार त्याच्या मनात येत होते. असे ठरवून तो त्याचा रथ भिमाकडे नेतो. कृपाशी लढण्याचे टाळतो. परंतु, कृप त्याचा पाठलाग करतात व त्याच्यावर असंख्य बाण मारतात. जसे इंद्र दानवांचा पिच्छा पुरवत असे तसे ते होत होते. कृप पुन्हा पुन्हा त्यांचे शंखू वाजवून आपली सरशी शाबीत करत होते. भिष्मांच्या मृत्यूचे कारण असलेला शिखंडी तेथेच लढत होता. कृतवर्मनाबरोबर तो लढत होता. शिखंडी त्याच्या खांद्यावर वार करतो. कृतवर्मन शिखंडीवर सहा बाण मारतो. त्यामुळे शिखंडी फार चिडतो. कृतवर्मन त्याचे धनुष्य तोडतो. शिखंडी दुसरे घेतो. त्याच्यावर एकोणिस बाण मारतो. ते कृतवर्मनाच्या चिलखतावर आदळून उडतात. ते पाहून शिखंडी कृतवर्मनाचे धनुष्य तोडतो. कृतवर्मन निशस्त्र झाला होता. शिखंडीच्या मारामुळें तो रक्त ओकू लागतो. तो त्याच्या स्वताच्या रक्ताने भरला होता. त्यानंतर तो शिखंडीवर नवीन धनुष्य घेऊन बाण

मारतो. त्याच्या खांद्यावर वार करतो. ते दोघे रक्ताने भरलेले असतात. कृतवर्मन शिखंडीवर एक जोरदार बाण मारतो. शिखंडी बेहोष होतो. तो रथाचा दांडा पकडून उभा असतो. त्यानंतर त्याचा रथाचा सारथी त्याला रणांगणातून बाहेर नेतो. शिखंडी धापा टाकत असतो. ते झाल्यावर पांडवांचे सैन्य तेथून पळून गेले.

कर्ण पर्व भाग सव्विसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग सत्ताविसावा

### [अर्जुन त्रिगर्तांशी व इतरांशी लढतो]

संजय पुढे सांगतो, शूभ्र घोडे असलेला अर्जुन सुद्धा तुमच्या सैन्याचा नाश करत होता. त्याच्यावर त्रिगर्ताचे योद्धे धावून जातात. सिवी, कौरव, सल्वा, नारायण, सत्यसेना, चंद्रदेव, मित्रदेव, शत्रूंजय, शुश्रुताचा मुलगा, चित्रसेना, मित्रवर्मन हे त्रिगर्ताचे राजे अर्जुनाला घेरतात. एकट्या अर्जूनाबरोबर ते लढू लागतात. जसे ते त्याच्या जवळ जातात ते मारले जातात. ते त्यांचे बाण मारत असतात परंतु, त्याचा कांहीं परिणाम होत नसतो पार्थावर. सत्यसेना अर्जुनाला बाणाने जखमी करतो. मित्रदेवसुद्धा तसे करतो. चंद्रदेव तीन बाण मारतो. मित्रवर्मन सुद्धा तसेंच बाण मारत असतो. शत्रूंजय वीस बाण मारतो. शुशर्मन तीस मारतो. अर्जुनावर असे अनेक बाण येत असतांना तोसुद्धा त्यांना मारत असतोच. तो शुश्रृताच्या मुलाला तीन बाणाने जखमा करतो. त्यानंतर अर्जुन शत्रूंजयाचा वध करतो. ते केल्यानंतर अर्जुन त्या राजांबरोबर खेळणे बंद करतो व त्यांचे वध करण्यास सुरूवात करतो. तो चंद्रदेवाला यमाकडे धाडतो. ते होत असतांना सत्यसेना रागात एक भाला अर्जुनावर कृष्णावर फेकतो. मोठ्याने गर्जना करतो. तो भाला कृष्णाच्या डाव्या खांद्याला लागतो. त्यानंतर तो भाला मातीत घूसून रहातो. कृष्णाच्या हातातील चाबूक व लगाम खाली पडतात. ते पाहून धनंजयाचे पित्त खवळते. कृष्ण त्याचे खाली पडलले चाबूक व लगाम उचलतो व रथ सत्यसेनाकडे नेतो. तो सत्यसेनाचा वध करतो. त्याचे मुंडके तो उडवतो. त्याच प्रमाणे चित्रवर्मनाला यमाकडे पाठवतो. तरी अर्जुनाचा राग शमलेला नसतो. तो त्या क्रोधात तेथे असलेल्या संसप्तकांचा धुव्वा उडवतो. त्यानंतर मित्रसेनाला मारतो. शुशर्मनाला मारतो. त्यामुळे चिडलेले संसप्तक अर्जुनावर जोराचा हल्ला करतात. अखेरीस जेरीस आलेला जिश्नू ब्रह्मास्त्र काढतो व आकाशात फेकतो त्यातून असंख्य धारदार बाण खाली कौरवांच्या लष्करावर जाऊन पडू लागतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात संहार व नुकसान कौरवांचे होऊ लागते. त्याशिवाय गदा, काटेरी गदा, सोटे, तलवारी त्यांच्यावर येऊन त्यांचा नाश करू लागतात. अंगद व वंग, कौरव सैनिक मरून पडलेले दिसतात.

त्यांच्या अंगावरील सुदर वस्त्रं तेथे मातीत मळलेली दिसत होती. ते एक भयंकर दृष्य होते. तेथे माणसे, हत्ती आंणि घोडे एकाच प्रकारे मेलेल्या अवस्थेत पडलेले दिसत होते. मरून पडलेल्या प्राण्यांमुळे व रथांच्या मोडक्या भागांमुळे त्या रणांगणातून जाणे शक्य होत नव्हते. त्यामुळें पांडवांचे रथ गाड्या त्या भागातून जाऊ शकत नव्हत्या. अर्जुनाच्या त्या संहारामुळे जणू त्याचा रथ थांबला होता. तरी त्याचे घोडे त्यांच्या खास व्यवस्थेमुळें त्यातून मार्ग काढत होते. इतरांचे मात्र अडकून पडलेले होते. मोठ्या संख्येने संसप्तकांचा नाश केल्यानंतर तो जास्त तेजस्वी दिसत होता.

कर्ण पर्व भाग सत्ताविसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग अठ्ठाविसावा

### [दुर्योधन युधिष्ठाराशी लढतो]

संजय पुढे सांगतो, दुर्योधन युधिष्ठीराचा मुकाबला करण्यासाठी त्याला सामोरी जातो. युधिष्ठीर तुमच्या मुलाला बाणांनी भोसकतो. त्याच्या बदल्यात दुर्योधन सुद्धा त्याला भोसकतो. युधिष्ठाराच्या सारथ्याला सुद्धा भोसकतो. त्याच्या बदल्यात पांडव दुर्योधनाचे चारही घोडे बाद करतो. त्यानंतर त्याचा झेंडा तो खाली आणतो. त्यानंतर तो दुर्योधनाची तलवार उडवतो. तुमचा मुलगा बेसहारा होतो. त्या परिस्थितीत असलेल्या दुर्योधनाच्या छातीत तो बाण मारतो. ते पाहून कर्ण त्याच्या मदतीसाठी जातो. त्याच प्रमाणे कृप व अश्वत्थामासुद्धा त्याला वाचवण्यासाठी तेथे जातात. ते युधिष्ठाराला घेराव घालतात व त्यांचे युद्ध सुरू होते. ते सुरू झाल्यावर रणवाद्ये वाजू लागतात. दुसरीकडे पांचाल कौरवांशी लढत होते. माणसाला माणूस भिडला होता. हत्तीला हत्ती व घोड्याला घोडा भिडला होता. रथाला रथ भिडला होता. विविध प्रकारची शस्त्रं वापरली जात होती. कांहीं मंत्रावर कार्यरत होत होती तर कांहीं माणसाच्या कसबेवर काम करत होती. मंत्राच्या मदतीने जास्त मोठा संहार केला जात होता. युद्ध नितीचे पालन होत होते. कोणी मागून वार करत नव्हता. तरी ते एक भयंकर युद्ध होते कारण त्यात माणसे व इतर प्राणी सारखे मारले जात होते. मारणे व मरणे हेंच काय ते काम होते तेथे. त्यात दाया माया अशा गोष्टींना कांहीं थारा नव्हता. रथातील हत्तीला मारत होते व हत्ती रथ उलटवून टाकत होते. हत्ती घोड्याना फेकत होते. जनावरांच्या बरोबरीने माणसे ओरडत होती. चिडलेले हत्ती माणसांना हवेत उडवत होते. पायदलाचे लोक हत्तींना घेरून त्यांच्या पोटात भाले तलवारी भोसकत होते व त्यामुळे तो प्रचंड प्राणी मारला जात होता. हत्ती कोणालाही मारत होते. पांडवांचे पांडवांच्या सैनिकाला व कौरवांचे कौरवांच्या सैनिकाना मारत होते असा गोंधळ सर्वत्र दिसत होता. अनेक हत्ती जबरी जखमांमुळें विव्हळत इकडे तिकडे फिरत होते. तिच गत इतर जणांची होती. रागावलेले हत्ती कोणालाही उचलून जोराने खाली आपटत होते त्यात तो मरून जात होता. कांहीं योद्धे दुसर्या लढणार्या योद्ध्याला भोसकत होते. कोण

कोणाला भोसकेल त्याचा नेम नव्हता. माणसे एकमेकांना मारत होती. जमिनीवर अनेक कबंध पडलेले होते त्यांची शीर कोठे आहेत ते समजत नव्हते. मातीचा रक्तामुळे चिखल झाला होता. ते कां लढत होते ते त्यांनाच माहित नव्हते असे वाटत होते. वेड लागल्यासारखे ते होत होते. कोणासाठी कोण मरत होते तेसुद्धा समजत नव्हते. राजे सामान्याबरोबर लढत होते.

कर्ण पांचालांचा संहार करत होता. त्याप्रमाणे धनंजय त्रिग्रतांचा संहार करत होता. भिम कुरुना मारत होता. कौरव आणि पांडव जिंकण्यासाठी लढत होते. त्यावेळी सूर्य मावळतीकडे झुकला होता.

कर्ण पर्व भाग अठ्ठाविसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग एकोणतिसावा

### [दुर्योधन पुन्हा युधिष्ठीराला भिडतो]

धृतराष्ट्र बोलतात, "मला तुझ्याकडून माझ्या मुलांच्या अनेक दुःखदायक घटनांची माहीती मिळाली आहे. ज्या प्रकारे तू ते मला सांगत आहेस मला एकच समजते कीं, कौरवांचा नाश आधीच झाला आहे. मला पुन्हा एकदा ऐकावयाचे आहे युधिष्ठीर व माझ्या मुलांच्या युद्धाची माहिती, ती तू मला पुन्हा सांग.

संजय पुढे सांगतो, दुर्योधन युद्धाच्या नियमांनुसार म्हणजे राजा राजाबरोबर लढणार, त्याच्या सारथ्याला आज्ञा करतो कीं तो त्यांचा रथ युधिष्ठीराच्या रथाकडे नेईल. ती आज्ञा होताच सारथी त्यांचा रथ युधिष्ठीराकडे नेतो. तेथे त्यांचे द्वंद्व सुरू होते. ते एकमेकांचे बाण तोडू लागतात. युधिष्ठीराला ते आव्हान आवडत नाही. तो एक मजबूत धनुष्य घेतो. दुर्योधनाचा झेंडा पाडतो. त्यांच्यात जोरात द्वंद्व होत असते. कोणी माघार घेत नसतो. ते एकमेकांना जबर जखमी करत असतात. युद्धकलेतील दोष पाहून ते एकमेकांचे डाव पाडत असतात. ते दोघे त्यांच्या रक्ताने माखलेले असतात. अधून मधून ते शंखू वाजवून त्याचा विजय होत असल्याचे दाखवत असतात. युधिष्ठीर दुर्योधनाच्या छातीत बाण मारतो. दुर्योधन युधिष्ठीरावर एक मजबूत शलाक मारतो. युधिष्ठीर ते सगळे मोडून टाकतो. त्यानंतर पांच बाण मारून तो दुर्योधनाला आणखीन जखमी करतो. तरीसुद्धा तुमचा मुलगा युधिष्ठीराला पुन्हा शलाकांने मारतो. परंतु, तो शलाक धर्माचा मुलगा तोडून टाकतो. त्यानंतर तो दुर्योधनावर एक बाण मारतो ज्यामुळें तो बेहोष होतो. तरी त्यातून तो सावरतो व एक गदा घेऊन युधिष्ठीराच्या अंगावर चालून जातो. त्याच्या अंगावर युधिष्ठीर एक शलाक मारतो ते दुर्योधनाच्या अंगात घूसतो. त्यामुळे त्याला फार त्रास झाला असे दिसते. तो बेशुद्ध होऊन पडतो. तेवढ्यात तेथे भिम येतो. युधिष्ठीराला बोलतो, "त्याला तू मारावयाचे नाही कारण तो माझा बळी आहे". ते ऐकल्यावर युधिष्ठीर दुर्योधनाला ठार मारत नाही. हे होत असतांना तेथे कृतवर्मन येतो. भिम त्याला पाहून एक मोठी गदा घेऊन त्याच्यावर धावून जातो अशाप्रकारे युद्ध होत होते. कर्ण पर्व भाग एकोणतिसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग तिसावा

### [कर्ण कुरु सैन्याच्या पुढे लढतो]

संजय पुढे सांगतो, कर्णाला सरसेनापती करून तुमचे सैन्य लढत होते. अनेक प्रकारच्या शस्त्रांने ते त्वेषाने लढत होते. जिंकणे हा एकच उद्देश त्यांच्यात दिसत होता. मोठा गदारोळ होत होता. त्या लढाईत असंख्य हत्ती, घोडे व माणसे मारली गेली. त्यासाठी कुर्हाडी, भाले, सुरे, तलवारी ह्यांचा वापर झाला होता. रणभूमीवर सगळीकडे माणसांची मुंडकी पडलेली दिसत होती. त्यांचे देखणे चेहरे, त्याच्या वरील दागिने, त्यांचे मुकूट असे सगळे सुंदर दिसत होते. तरी ते सगळे दृष्य केविलवाणे होते. अनेक प्रकारची शस्त्रं तेथे विखूरलेली होती. जणूकाय युगांत झाला आहे. तुमचे मुलगे त्यांच्या सगळ्या सैन्यानिशी सत्यकीवर चालून जातात. त्यांच्या हालचालीमुळें समुद्रात लाटांचा जसा आवाज होतो तसा आवाज होत होता. त्यानंतर कर्ण सत्यकीवर प्रथम वार करतो. सत्यकी त्याच्या रथातून त्यावर प्रतिहल्ला करतो. सत्यकीच्या बाणामुळे जखमी झालेला कर्ण पाहून तुमचे सैनिक त्याच्या मदतीसाठी तेथे जातात. त्यांची संख्या फार मोठी होती. सत्यकीला मदत करण्यासाठी द्रुपदाचे मुलगे तेथे जातात त्यांच्या फौजफाट्यानिशी. पांडवांचे मुख्य अर्जुन व केशव त्यांच्या सकाळच्या प्रार्थना उरकून त्यात भवाची (शंकराची) प्रार्थना मुख्य असते. त्यानंतर ते युद्धात सामील होतात. त्यांना येतांना पाहून तुमचे वीर नाराज झालेले दिसतात. अर्जुनाचा रथ ढगांच्या गडगडाटासारखा आवाज करत येत होता. अर्जन त्याच्या रथात नाचत नाचत गांडीवातून असंख्य बाण आकाशात फेकतो. त्यामुळे सगळे आकाश भरले जाते. त्या बाणांमुळे कौरवांचे असंख्य वीर मारले जात होते. त्यांच्या गाड्या, रथ, घोडे हत्ती बाद होत होते. सारथी मेल्यामुळे रथ वेडेवाकडे फिरत होते. यमाच्या घरी पुन्हा गर्दी झाला होती नव्याने मेलेल्यांची. तुमचा मुलगा दुर्योधन एकटा त्याच्यावर चाल करतो. अर्जन त्वरित त्याचे धनुष्य मोडून टाकतो. त्यानंतर त्याचा झेंडा पाडतो. त्याचे घोडे मारतो. त्यानंतर दुर्योधनावर एक बाण मारतो. परंतु, अश्वत्थामा तो बाण तोडतो व

दुर्योधनाला संरक्षण देतो. त्यानंतर अर्जुन कृपांचे धनुष्य मोडतो. कृतवर्मनाचे धनुष्य मोडतो. दुःशासनाचे सुद्धा मोडतो. त्यानंतर अर्जुन कर्णाकडे जातो. ते पाहून कर्ण सत्यकीला सोडतो व अर्जुनाकडे जातो. अर्जुनावर तीन आणि कृष्णावर वीस बाण मारतो. ते करून त्याचे समाधान झाले नव्हते असे त्याच्याकडे पाहून वाटत होते. तेव्हढ्यात सत्यकी कर्णावर बाण मारू लागतो. ते शेकड्याने असतात. त्यानंतर पांडवांचे सगळे वीर कर्णावर तुटून पडतात. त्यात युधमन्यू, शिखंडी, द्रौपदीची मुलं, प्रभाद्रक, उत्तमौज, युयुत्सू, नकूल, सहदेव, धृष्टद्युम्न, छेड्डी, करूष, कैकेय, चेकीतन, मत्स्य, युधिष्ठीर, असे होते. त्यासुमारास सत्यकी कर्णावर शंभर जोरदार बाण फेकतो. पांडवांच्या फौजा कर्णाला घेरतात. परंतु, कर्ण त्याच्या अस्त्रांनी त्यांचे हल्ले परतवत असतो. कर्ण फार रागावलेला असतो. तो त्याच्या अस्त्रांनी अनेक हत्ती, घोडे व माणसे यमाकडे धाडतो. पांडवांच्या सैना माघार घेतात. ते पाहून अर्जुन हसत हसत कर्णाकडे पाहातो व त्याच्या अस्त्रानी तो कर्णाचे डाव उलटवू लागतो. त्याचे शस्त्रं आकाशातून थेट कौरवांच्या सैन्यावर पडू लागतात. त्यामध्ये मोठे सोटे, शत्रूघ्नी असे बरेच होते. कौरवांचा संहार होऊ लागतो. त्यांच्यात मोठ्याने किंकाळ्या ऐकू येत होत्या. कांहीं घाबरून पळू लागतात. ते होत असतांना सूर्य अस्ताच्या कडे सरकत असलेला दिसत होता. त्यामुळे आकाशात काळोखी सावकाशपणे पसरत होती. त्यामुळें रणभूमीवर काय होत आहे ते नीटपणे दिसत नव्हते. त्यांनंतर तुमचे सैन्य युद्ध थांबवण्याचे ठरवतात. आपापल्या तळावर जाऊ लागतात. पार्थाचे लोक त्यांची सरशी होत आहे ते पाहिल्यावर फार खूष झालेले दिसत होते. ते कौरवांची चेष्टा करतांना दिसत होते. विविध रणवाद्ये वाजू लागतात. त्यात अर्जुन व केशवांची स्तुती कवन होती. त्यावेळी पांडवांचे सैन्य त्यांच्यासाठी एकत्रपणे प्रार्थना करत असलेले दिसत होते.

रात्रीची विश्रांती घेण्यासाठी ते त्यांच्या तंबूंकडे जात असलेले दिसत होते. त्यावेळी मांसभक्षक राक्षस, पिशाच्च रणभूमीत प्रेते खाण्यासाठी येऊ लागतात. त्यांच्याबरोबर इतर मांसाहारी हिंस्र प्राणीसुद्धा येऊ लागतात.

कर्ण पर्व भाग तिसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग एकतिसावा

### [कर्णाला यशाची खात्री वाटते]

धृतराष्ट्र बोलतात, "मला असं वाटते कीं, अर्जुन सगळ्यांना ठार मारणार आहे. साक्षात यमसुद्धा त्याच्यापुढे उभा राहू शकत नाही. एका हाती त्याने शंकराला जेरीस आणले होते. तो अग्नीला भारी गेला होता, एका हाती तो सगळी पृथ्वी ताब्यात घेऊ शकतो. त्याला सगळे राजे खंडणी देत असतात. एका हाती त्याने निवटकवचांचा पराभव केला होता. एकाहाती तो सगळ्यांचे संरक्षण करू शकतो. अशा स्थितीत कौरव हरले तर त्यात काय नवल वाटावे. उलट मी त्यांचे कौतूक करून कीं, ते त्याच्याशी लढण्याची हिम्मत राखून होते. मला सांग संजया पुढे त्याने काय केले? मला सांग, माझ्या दुर्योधनाने पुढे काय केले"?

संजय सांगतो, जखमांनी भरलेले, ज्यांचा शस्त्रं हरवलेली होती, प्राणी मेलेले होते, असे हरलेले कौरव रडकुंड्या परिस्थितीत त्यांच्या तळावर जातात विश्रांती घेण्यासाठी. तेथे त्यांची खलबत सुरू होतात. तेथे कर्ण तुमच्या मुलाकडे पहात, रागावलेला, हाताच्या मुठी आवळत चिडलेल्या सापासारखा फणकार्यात बोलतो, तो अर्जुन फार सावधपणे लढत आहे. त्याशिवाय त्याच्याकडे कसब आहे, त्याला वासुदेवाची साथ आहे, त्याच्या जोरदार बाणांच्या मारा मुळे आपले सैनिक घाबरले परंतु, ते फार काळ चालणार नाही. उद्या मी त्याचा खेळ संपवणार आहे. असे बोलून झाल्यावर दुर्योधन त्याला बोलतो, "तथास्तू". त्यानंतर ते सगळे निजण्यासाठी जातात. रात्र मजेत गेल्यानंतर ते दुसर्या दिवशी पुन्हा लढण्यासाठी सज्ज होतात. तेथे ते पहातात कीं, युधिष्ठीराने एक खतरनाक व्युह रचला आहे. बृहस्पती व उशना ह्यांच्या शिक्षणात तयार झालेले दुर्योधन व त्याची भावंडं कर्णाला सावध करतात. त्याला प्रतिविरोधी व्युह करण्याचे सांगतात. जसा इंद्र करत असे दानवांशी लढतांना. मरुतासारखे शक्तिमान व कार्तवीर्यासारखे शूर ते कर्णाकडे मोठ्या अपेक्षेने पाहातात.

धृतराष्ट्र विचारतात, "दुर्योधन नंतर काय करतो"? युद्ध पुन्हा सुरू झाले तेव्हां, कर्ण युद्धात खेळला कां? पांडव त्याच्याशी लढले कां"? "कर्णाचे सामर्थ्य इंद्रासारखे होते. त्याची अस्त्रं व शस्त्रं तेजस्वी होती. कर्णावर विसंबून माझा मुलगा पुनः युद्धासाठी सज्ज होतो. खच्ची झालेला दुर्योधन व दुसरीकडे उत्तेजित असलेले पांडव पाहून कर्णाने काय केले? माझा मूर्ख मुलगा कर्णावर अवलंबून पांडवांचा पराजय करण्याची स्वप्न पहात आहे. मला दुःख होते कीं, कर्ण पांडवांचा पराभव करू शकणार नाही. त्या कल्पनेचे बाण मला रुतत आहेत".

ते त्यांचे उद्‌गार ऐकून संजय त्यांना बोलतो, अहो महाराज, शकूनी दुर्योधनासाठी मोठा मुत्सद्दी होता. तसांच कर्ण त्याच्यासाठी मोठा योद्धा होता.

धृतराष्ट्र बोलतात, मला सतत त्यांच्या पराजयाच्या गोष्टी ऐकाव्या लागत आहेत. पांडवांचा पाडाव करणारा कोणीही नाही. त्यांचे सैनिक आमच्या फौजांमध्ये सहजपणे घुसतात. जसे कांहीं आमचे सैन्य बायकांचे आहे. खरोखर दैव बलवत्तर आहे. त्याच्यापुढे कोणाचे कांहींच चालत नाही. जर हेंच खरे आहे तर मग मी सतत माझ्या मुलांचे वध व पराजयाच्या कथा कां ऐकत आहे"?

संजय बोलतो, "अहो महाराज, तुम्ही तुमच्या चुकीच्या विचारांचा व त्यानुसार केलेले काम ह्याचा विचार करा. हे जे होत आहे ते त्याचा परिणाम आहे. आपण चांगले सूज्ञ असूनही काय योग्य व काय अयोग्य ह्याचा त्यावेळी विचार केला नाही. खर्या हितचिंतकांच्या मतांचा अव्हेर करत गेलात, त्याचा हा परिणाम आहे. आता त्यावर बोलून काय उपयोग"? आपण मूर्खांचा सल्ला का घेत होता ते सांगा. पंडुच्या मुलांवर आपण घोर अन्याय करत होता त्याचा निचार करा. ते जर केले नसते तर आज जे असंख्य चांगल्या राजांने संहारचक्र चालू आहे ते झाले नसते. आता रडून उपयोग नाही. पुढे जे वाढले आहे त्याचा विचार करा. आता सांगतो पुढे कसे हत्याकांड होत होते.

दुसर्या दिवशी पहाटे कर्ण दुर्योधनाच्या तंबूत जातो. सांगतो कीं, तो त्या दिवशी अर्जुनाशी लढणार आहे. एकतर मी मरेन अथवा तो मरेल असे तो त्याला सांगतो. त्यात आम्हाला अनेक गोष्टींचा निवाडा करावयाचा आहे. तो सांगतो, आजवर आम्हा दोघात द्वंद्व कधीही झालेले नाही. म्हणून आता माझे ऐक, मी पार्थाचा वध केल्याशिवाय परत येणार नाही.

आपल्या सैन्याचे थोर लढवय्ये मारले गेले आहेत, जसा मी लढण्यासाठी उभा राहीन पार्थ माझ्यावर येणार. त्याला माहित आहे कीं, आता माझ्याकडे तो इंद्राने दिलेला शलाक नाही. म्हणून, अहो राजा, जे सांगतो ते तुमच्या भल्याचे आहे म्हणून नीटपणे ऐक. माझ्या दैवी शस्त्रांची कुवत पार्थाच्या इतकीच आहे. आमचे कौशल्यसुद्धा तुल्यबळ आहे. चपळाई सारखी आहे, आमच्या बाणांची क्षमता सुद्धा समसमान आहे. तरी तो माझ्या बरोबरीचा कधीच नव्हता. शरीराच्या क्षमतेत, धाडस, शस्त्रांचे ज्ञान, हिम्मत ह्यात मी त्याच्यापेक्षा जास्त मोठा आहे. माझा तिरकमटा ज्याला विजय म्हणतात, तो अर्जुनाच्या गांडीवा इतकांच सामर्थ्यवान आहे. ते मला इंद्राने दिले आहे, त्याची घडवण विश्वकर्माने केली आहे. त्याच्या मदताने त्यांने दानवांचा पराभव केला होता. तो इंद्राने भृगूंच्या मुलाला दिला. त्याने तो मला दिला. त्या धनुष्याने मी अर्जुनाशी द्वंद्व करणार आहे. भार्गवाने दिलेला विजय गांडीवापेक्षा चांगला आहे. भार्गवाने पृथ्वी तिनदा जिंकली आहे. त्याच्या मदतीने मी अर्जुनाशी लढणार आहे व तुला खूष करणार आहे. अर्जुनाला मारल्यानंतर हि पृथ्वी तिच्यावरील पर्वत, नद्या, समुद्र व पठार ह्याने भरलेली तुझी होणार आहे. त्यावर तुझे मुलगे व त्यांचे मुलगे राज्य करतील. जसे एक झाड आगीत जळते तसा अर्जुन माझ्या आगीत जळून जाणार आहे. अर्जुनाकडे दैवी दोर आहे त्याच्या गांडीवाला लावला आहे, तसेंच त्याच्याकडे कधीही न संपणारे भाते आहेत, तसे कांहीं माझ्याकडे नाही. आता सांगतो तो माझ्यापेक्षा कोणत्या बाबतीत श्रेष्ठ आहे. त्याचा सारथी श्रेष्ठ आहे. त्याचा रथ दैवी आहे, जो त्याला अग्नीने दिला आहे. त्याचे घोडे ज्या वेगाने जाऊ शकतात त्या वेगांने जाणारे घोडे माझ्याकडे नाहीत. त्याच्या रथावर कपी आहे जो त्याला त्याच्या दैवी शक्तीने मदत करत असतो तसे माझ्याकडे नाही. त्याच्याकडे तो विश्वनाथ केशव आहे जो माझ्याकडे नाही. ह्यागोष्टींमुळें मी कमी ठरत असलो तरी मी त्याच्याशी लढणार आहे. तुझ्याकडे सल्य आहे, तो जर माझा सारथी झाला तर मी खात्रीने जय मिळवीन देईन. त्याला माझा सारथी म्हणून जर तू देऊ शकलास तर बरे होईल. मोठे बाण घेऊन अनेक गाडे माझ्या रथाबरोबर असू देत. कारण मी ते बाण वापरणार आहे. त्यांचे घोडे मजबूत असले पाहिजेत. एवढे जर तू केलेस तर मी अर्जुनाला लोळवीन. सल्य कृष्णापेक्षा जास्त चांगला सारथी आहे. त्यामुळे मला द्वंद्व करणे सोपे होईल. त्यांचे घोड्यांचे ज्ञान उत्तम

आहे. जसे कृष्णाचे आहे. सल्याच्या बरोबरीचा कोणीही नाही. एवढी व्यवस्था केली कीं, मला अर्जुनाला मारणे सोपे होईल. तरी ह्या सगळ्या सोयी तू मला पुरव म्हणजे मला लढणे सोपे होईल. जसे तो माझ्याकडे येईल मी त्याचा नाश करून टाकीन. जसे इंद्राने असुरांचा केला होता.

संजय पुढे सांगतो, ते ऐकल्यावर तुमचा मुलगा त्याला बोलतो, "तू जे बोलतोस तसेंच होईल. तुला जसे पाहिजे तसेंच होईल. तुला जे करून पाहिजे ते तसें करून दिले जाईल. त्याशिवाय आपले सगळे राजे तुझ्या मागून येत असतील.

ते ऐकल्यावर तुमचा मुलगा सल्यला भेटतो, त्याला सांगतो.

कर्ण पर्व भाग एकतिसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग बत्तिसावा

दुर्योधन सल्याला भेटतो. त्याला सांगतो कीं, अर्जुनाशी लढण्यासाठी कर्णाला कृष्णाच्या योग्यतेचा सारथी हवा आहे. त्यासाठी तो कर्णाच्या रथाचे सारथ्य करील असें सुचवतो. दुर्योधन हात जोडून सल्याला विनती करतो कीं, त्याने कर्णाच्या रथाचे सारथ्य करावे. त्यासाठी तो त्याची मान खाली घालून पुन्हा पुन्हा विनंती करत असतो. सल्य त्याला बोलतो कीं, त्यांच्या मैत्री खातर तो तसे करण्यास राजी होत आहे. दुर्योधन सल्याला बोलतो कीं, त्यापुढे कर्णाचे संरक्षण करण्याची सुद्धा त्याच्यावर तो जबाबदारी टाकत आहे. जसें ब्रह्माचे संरक्षण महेश्वर करतात तसे त्याने कर्णाचे करावे. जसे वासुदेव पांडवांचे करतो तसे त्याने कर्णाचे संरक्षण करावे. भिष्म, द्रोण, कृप आणि तू व भोजांचा राजा, शकूनी, अश्वत्थामा व मी स्वतः असें कौरवांच्या पक्षाचे आधार स्तंभ आहोत. आपले सैन्य त्यांत विभागलेले आहे. भिष्माचे सैन्य आता राहीलेले नाही. द्रोणांच्या सैन्याचे सुद्धा तसेंच झाले आहे. त्या दोघांनी त्यांच्या वाट्याचे शत्रू सैन्य नष्ट केले व त्यापेक्षा जास्त शत्रूच्या सैन्याचा विध्वंस केला आहे. आपले अनेक शूरवीर योद्धे लढत स्वर्गात गेले आहेत. आता आपण जे उरलो आहोत त्यांना पांडवांच्या बाकीच्या सैन्याचा नाश करावयाचा आहे. पार्थाने आपल्या मोठ्या सैन्याचा पुरता नाश केला आहे व पुढे आणखीन तो करणार आहे असें दिसते. त्या आधी त्याचा काटा काढावयाचा आहे. आता एक कर्ण आहे जो मोठ्या प्रमाणात पांडवांच्या फौजांचा नाश करू शकतो. म्हणून त्याला आपल्याला सांभाळावयाचे आहे. आज कर्ण अर्जुनाशी भिडणार आहे तेव्हां त्याला योग्य साथ देऊन यशस्वी करण्याचा जबाबदारी तुझी असणार आहे. अरे सल्या, माझी हे युद्ध जिंकण्याची इच्छा तीव्र आहे. आता दुसरा कोणी नाही जो ती पूर्ण करण्यात मला मदत करू शकेल. त्यासाठी मी तुला कर्णाच्या रथाचे सारथ्य देत आहे. म्हणजे कर्णाच्या यशात तुझासुद्धा वाटा असेल. ह्या आधी अर्जुनाने इतक्या मोठ्या संख्येनी कोणा सैन्याचा विध्वंस केल्याचे मला माहीत नाही. धृतराष्ट्राच्या सैन्याचा ज्या प्रकारे नाश होत आहे कीं असे होऊ शकते ते मला वाटत नव्हते. त्याचे कारण त्याला कृष्णाची भक्कम साथ आहे. जसे सूर्य अरुणाच्या

(सूर्याच्या रथाचा सारथी अरुण असतो) मदतीने अंधाराचा नाश करतो तसे तुम्ही दोघे करील असा माझी विश्वास आहे. जसा अंधार सूर्याला पहाताच नाहीसा होतो तसे पांचाल, श्रींजय व पांडव सेना तुम्हा दोघांना पाहून नष्ट होतील असे व्हावे असे मला वाटते. तुझ्या समर्थ सारथ्यामुळे ते शक्य होईल असें मी समजतो. केवळ तुझ्या सहाय्याने कर्ण ह्या युद्धात कामयाब होणार आहे हे मी समजतो.

संजय पुढे सांगतो, दुर्योधनाचे असे स्तुतीपर बोलणे ऐकल्यावर सल्य उत्तेजित होतो. त्याला वाटते कीं दुर्योधन त्याच्या क्षात्र तेजाचा अपमान करत आहे. तो त्याचे धनुष्य सरसावत दुर्योधनाला बोलतो, "तू माझ्या मैत्रीचा गैर फायदा घेत आहेस. माझ्या सारख्या बलाढ्य राजाला त्या सुताच्या रथाचे सारथ्य करावयाला सांगून तू मला गौण स्थान देत आहेस. कर्णाला माझ्यापेक्षा उच्च दाखवण्याचा हा तुझा डाव मला अजिबात पसंत नाही. मला त्यापेक्षा जास्त मोठे काम सांग पण कर्णाचे सारथ्य करण्यास सांगू नकोस. ते काम करून मी माझ्या देशाला परत जाऊ इच्छितो. मला लढण्याचे काम सांग ते मी मोठ्या खूषीने करीन पण कर्णाचे सारथ्य करावयाला सांगू नकोस. माझ्या हिम्मतीबद्दल तुला शंका आली आहे कां? अशारितीने तू माझा उपमर्द करणे मला मान्य नाही. तुला माहित आहे कीं, मी एक उच्चकुलीन क्षत्रिय आहे एक वंशजात राजा आहे अशा मला त्या सुताच्या मुलाच्या रथाचे सारथ्य देण्यात काय मतलब आहे तुझा ते मला समजत नाही. असे करणे तुला शोभत नाही. आपल्या स्नेहाचा तू अपमान करत आहेस. माझे मन ते सारथ्य करण्यास तयार नाही. तरी केवळ शिस्तीचा भाग म्हणून मी तुझ्या आक्षेचे पालन करणार आहे पण माझा विषेध नोंदवूनच ते मी करणार आहे हे लक्षात घे. ब्रह्माने वर्ण उत्पन्न केले आहेत त्यात ब्राह्मण सर्वश्रेष्ठ त्यानंतर क्षत्रिय त्यानंतर वैश्य व अखेरीस शुद्र तयार झाले त्या क्रमाचा तू अपमान करत आहेस मला ते सारथ्य करण्यास सांगून. त्या प्रमाणे हे सुत वर्णाचे लोक क्षत्रियांचा उपवर्ग मानला गेला आहे त्याप्रमाणे कर्ण माझ्यापेक्षा हलक्या दर्जाचा ठरतो, त्याच्या रथाचे सारथ्य करणे म्हणजे वर्णव्यवस्थेला तोडण्या सारखे आहे. मी विषेश करून राजर्षीच्या कुळातील आहे हे तू जाणत आहेस तरी त्याचे सारथ्य करण्यास सांगत आहेस ह्याचा मी काय अर्थ समजावा? अरे मित्रा दुर्योधना, मी ते काम करणार नाही. मला दुसरे काही अधिक महत्वाचे काम सांग. माझा तू अपमान करत

आहेस तेव्हां मी माझ्या सैन्यासह ह्या युद्धातून बाहेर पडणे जास्त श्रेयस्कर समजतो. अरे धृतराष्ट्रा मला घरी जाण्याची परवानगी दे. असे बोलून तो रागावलेला सल्य तेथून उठतो व जाण्याच्या तयारीला लागतो. ते पाहून तुमचा मुलगा सल्याचे खांदे प्रेमांने धरतो व त्याचा विनवणीच्या सुरात बोलतो, "अरे मित्रा, तू श्रेष्ठ आहेस कर्णापेक्षा हे मला मान्य आहे परंतु, माझ्या मनात एक उद्देश आहे तो समजून घे. तो ऐक, कर्ण तुझ्यापेक्षा जास्त श्रेष्ठ निश्चितच नाही. कांहीं झाले तरी तो एक सुत आहे. हे मी जाणतो. परंतु, तू जरी अर्तयानी (सत्यवादी लोकांचा एक वर्ण) असलास तरी मी जाणतो कीं, त्या तुझ्या वंशामुळे मी व कर्ण तुझ्या बरोबरीचे कधीच होत नाही तरी, "अडला हरी गाढवाचे पाय धरी", ह्या न्यायाने आपल्याला ते करावे लागते जे एरव्ही आपण करणार नाही. असे पहा सल्या, कर्ण धनंजयापेक्षा श्रेष्ठ आहे ते सिद्ध करण्यासाठी हे करावे लागत आहे. अर्जुनाच्या रथाचे सारथ्य कृष्ण करत आहे म्हणून कृष्णाच्या बरोबरीचा कोणी सारथी मला पाहिजे त्याकरतां तुला मी कृष्णाच्या बरोबरीने म्हणून निवडले आहे, त्यात कर्णाच्या वर्णाचा कांहीं संबंध येत नाही. तुझी तुलना ह्या नेमणूकीमुळे कृष्णाशी होणार आहे जे केव्हाही तुझ्यासाठी भूषणावह आहे हे तू मान्य करशिल".

ते ऐकल्यावर सल्य बोलतो, "तू माझी तुलना साक्षात देवकीच्या मुलाशी करत आहेस हे माझे मोठे भाग्य आहे. ते तू ह्या जमलेल्या सगळ्या योद्ध्यांपुढे करत आहेस हा माझा मोठा सन्मान होत आहे. असे आहे तर मी कर्णाच्या रथाचे सारथ्य करण्यास तयार आहे. जर तो अर्जुनाशी लढणार असेल तर. पण मला एक करण्याची मुभा असली पाहिजे कीं, मी जे बोलेन ते कर्ण विनातक्रार ऐकून घेईल".

संजय पुढे सांगतो, अहो राजे, तुमचा मुलगा त्या अटीला मान्य करतो. म्हणतो "चालेल, तू कांहींही त्याला बोलू शकतोस, त्याला माझी परवानगी आहे".

कर्णपर्व भाग बत्तीसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग तेहतिसावा

### (तारकासुराचा वध)

दुर्योधन पुढे बोलतो, सल्या पुन्हा माझे थोडे ऐक, मी तुला सांगतो देव आणि असुरांच्या प्राचीन काळी झालेल्या युद्धात काय झाले. महान ऋषी मारकंडेय ह्यांनी मला ते सांगितले आहे. ते मी तुला जसे त्यांनी सांगितले तसेंच सांगणार आहे. ते ऐक व त्याचा विचार कर. देव आणि असुर दोघे एकमेकांना पराजित करण्याच्या एकमेव उद्देशाने लढत होते. त्यांच्यात जी एक मोठी लढाई झाली त्याचे कारण होते तारक. असे सांगतात, कीं, दैत्यांच्या पराजयानंतर तारकाचे तीन मुलगे ज्यांचा नांव होती अनुक्रमे तारकाक्ष, कमलाक्ष, विद्युन्मलीन. ते सगळे मोठे घोर तप करत होते. त्या घोर तपामुळे ते फार क्षीण झाले होते. अखेरीस त्यांच्या त्या व्रतस्थ राहून केल्या जाणार्या तपामुळें ब्रह्मदेव त्यांच्यावर संतुष्ट झाले होते. ते त्यांना वर देण्यासाठी तयार झाले होते. ते तिघे एकत्रपणे ब्रह्मदेवाला बोलतात, कीं, त्यांना कोणत्याही प्राण्यापासून कधीही मृत्यू येणार नाही. ब्रह्मदेव सांगतात कीं, असा वर देता येत नाही व म्हणून त्या तिघानी त्यांची तपस्या थांबवावी. पुढे तो देव त्यांना सांगतो की, असा वर मांगा जो मी तुम्हाला देऊ शकेन. त्यावर ते तिघे फार विचार करतात व शेवटी ठरवतात कीं, अहो ब्रह्मदेवा, आम्ही आमच्या तीन नगरात रहात असतांना सगळ्या पृथ्वीवर भटकू शकू, तसे एक हजार वर्षे झाल्यानंतर तुमच्या कृपेने आमच्या तीन नगरात आल्यानंतर पुन्हा एकरुप होऊ. त्यानंतर जो देव त्याच्या एका भाल्याने त्या तीन नगरांचा भेद करील तो आम्हाला ठार मारू शकेल. ते ऐकल्यावर ब्रह्मदेव तो वर देतात व बोलतात, तथास्तु. ते ऐकल्यावर ते तीन असुर फार खूष होतात. त्यानंतर ते एक नगरी बनवण्याच्या तयारीला लागतात. त्यासाठी ते मायासुराची नेमणूक करतात. त्याची ख्याती सगळ्या दैत्य व दानवांत होती. मायासुर त्याच्या वैराग्यपूर्ण तपस्येने ती नगरी उभी करतो. त्यात सोने, चांदी आणि लोखंडाचा उपयोग तो करतो. त्यातील सोन्याची नगरी स्वर्गात असते, चांदीची आकाशात असते व लोखंडाची पृथ्वीवर असते. त्या तीन नगरी एक शंभर योजनं लांब व

रुंद होत्या. त्यात अनेक प्रशस्थ वाडे होते. मोठ्या उंच भिंती व कमानी होत्या. त्यातील रस्ते रुंद व मोठे होते. त्या रस्त्यांच्या दोनही बाजूस मोठे महाल होते. त्या प्रत्येक नगरासाठी वेगळा राजा (प्रशासक) होता. सोन्याची नगरी तारकाक्षाची होती. चांदीची कमलाक्षाची व लोखंडाची विद्युन्मलीनाची होती. ते तीन दैत्य सगळ्या पृथ्वीवर राज्य करू लागतात. त्यांचा अहंकार फार जास्त झाला व ते बोलू लागले कीं, "प्रजापती कोण आहे"? त्यांना विरोध करणारा कोणा नव्हता. त्यांच्याकडे रहाण्यासाठी निरनिराळ्या भागातून दानव येऊ लागले ज्यांना देवांनी पूर्वी हरवलेले होते व जे लपून रहात होते. त्यांचा त्या तीन नगराच उत्कर्ष होऊ लागला. त्यांच्या जबरदस्त एकी झाली होती. त्याच्या सगळ्या गरजा मायासूर पुरवत असें. ते बेडरपणे तेथे मनमुराद रहात होते. तेथे रहाणार्या दैत्याने कांहीं इच्छा केली कीं, ती त्वरित पुरी होत असें. तारकाक्षाला एक शूरवीर मुलगा असतो त्याचे नांव असते हरी. तो मोठे कठोर तप करत असतो. त्यामुळें ब्रह्मदेव त्याच्यावर प्रसन्न होतात. तो असा वर मांगतो कीं, त्याच्या नगरीत एक तलाव असावा ज्यात मेलेला टाकला कीं तो पुन्हा जीवंत झाला पाहिजे. त्या पुनर्जीविताची ताकद पूर्वीपेक्षा जास्त असली पाहिजे. त्या प्रमाणे तो एक तलाव तयार करतो व त्यात टाकलेले पुनः जीवंत होऊ लागले होते. पुनः जीवंत झालेले पहिल्यापेक्षा जास्त बलवान होत होते. त्यामुळें मरणाची भिती त्या असुरामना राहिली नाही. त्यांना देवांची भिती उरली नाही. ते तिनही जगाला सतावू लागले. त्यांच्यापुढे कोणी उभा राहू शकत नव्हता. ते दैत्य देवांना आव्हानं देऊ लागले. त्या सामर्थ्याने माजलेले ते सगळी इतर नगरं जाळून टाकू लागले होते. त्याना विरोध करणारा कोणी राहिला नव्हता. त्यांचा अहंकार वाढत होता. जो सगळ्या पापाचे एकमेव कारण असते. त्यांना कशाची भिती उरलेली नव्हती. ते स्वर्गात देवांच्या बागांमध्ये जाऊन गंमत म्हणून घाण करत व देवांची गंमत करत असतं. ऋषींचे आश्रम खराब करत होते. तेथील लोकांना सतावत होते त्याचा असुरी आनंद ते उपभोगत होते. त्याचा फार त्रास होऊ लागतो तेव्हां त्याची तक्रार इंद्राकडे जाते. इंद्र त्याच्या मरुत साथ्यांबरोबर त्या तिघांचा बिमोड करण्यासाठी निघतो. परंतु, इंद्राला त्या अभेद्य नगरांचा पराभव करता येत नाही. ते समजल्यावर देवांना भय वाटू लागते. ते सगळे ब्रह्मदेवाकडे जातात. तेथे ते त्यांचे गार्हाणे सांगतात. असुरांचे अन्यायपूर्वक वागण्याची सगळी वार्ता ते

ब्रह्मदेवाला सांगतात. देव सांगतात कीं, त्या तीन नगरी नष्ट झाल्या पाहिजेत. ब्रह्मदेव देवांना सांगतात कीं, जे इद्राला त्रास  देतात, ते मला त्रास देत आहेत असेंच समजावे. ते सगळे असुर त्यांच्या अहंकारामुळे फारच त्रासदायक झाले आहेत. ते असुर देवांचा द्वेष करतात ते त्याला माहित असल्याचे सुद्धा तो देव त्यांना सांगतो. तरी मी शक्यतर सगळ्यांना न्यायाने वागवण्याचा प्रयत्न करत असतो. परंतु, ज्यांचा अहंकार फाजिल झाला आहे व म्हणून ज्यांचे वागणे दुष्ट झाले आहे ते नष्ट झाले पाहिजेत हेसुद्धा आवश्यक आहे. असे माझे वचन आहे. परंतु, मी दिलेल्या वरा मुळें त्यातून नगरांचा एकाच भाल्याने भोसकणारे कांहीं असले पाहिजे तरच ते नष्ट होतील एरवी नाही. ते करणे केवळ एकालाच शक्य आहे व तो आहे स्थानू. अहो आदित्यानो स्थानूला भेटा व त्याला तयार करा. ज्याला कांही ईशान किंवा जिश्नू सुद्धा म्हणतात. त्याला कधी थकवा येत नाही. म्हणून तो कधी हरत नाही. तो त्या उन्मत्त झालेल्या असुरांचा नाश करील. ते ऐकल्यावर सगळे ब्रह्मासह महादेवाला भेटण्यासाठी निघतात. ज्याचे चिन्ह आहे वृषभ. ते सगळे वेदाचे स्मरण करत भवाकडे निघतात. तो महादेव ते भेटतात. त्यासाठी त्यांना त्यांचे अहंकार सोडावे लागतात व तपस्या करावी लागते ज्यांमुळे त्यांच्या सगळ्या वासना संपुष्टात येतात. ज्यांची इंद्रीय त्यांच्या संयमात आहेत व ज्यांच्या सगळ्या वासना संपल्या आहेत व जे पूर्णतया निरिश्च झाले आहेत अशांनाच भव म्हणजे इशान देव दर्शन देतो. तो उमेचा म्हणजे शक्तीचा पुरस्कर्ता त्यांचे सगळे गार्हाणे ऐकतो. त्या महादेवाची ते असंख्य रुप ते पहातात. ते पाहून सगळे देव प्रसन्न होतात. ते सगळे देव ब्रह्मासह त्याच्यापुढे नतमस्तक होतात. त्यांना पाहून जे त्यांचा अहंकार नियंत्रित करून आलेले असतात, शंकरदेव प्रसन्न स्मित करतात. महादेव त्यांना विचारतो कीं, त्यांच्या येण्याचे कारण काय? ती आज्ञा ऐकल्यावर देवांना हायसे वाटते. ते स्वस्थ होतात. ते पुनः पुनः त्याला नमन करत रहातात. देव बोलतात, दक्षाच्या यज्ञाचा नाश करणार्या भवा, जो मृत्यूचा देव आहे व जो सगळी सृष्टी प्रसवतो त्या देवा आमचे अनेक प्रणाम. असें ते बोलतात. अहो त्रिशूळ धारी देवा, त्रिनेत्रा, ज्याची आयुध अलौकीक असतात, जो स्वतः ब्रह्म आहे, तुझी काय आम्ही स्तुती करणार? तुला कांहीं ईशान म्हणून बोलतात. कांहीं शंकर म्हणून बोलतात, जो सगळ्या अहंकाराचा नाश करतो, जो ब्रह्मचर्य आचरण करतो, अशा अलौकीक सामर्थ्य

असलेल्या प्रभूस आमचा प्रणाम असो. आपण सदेव तपस्येत असता, ज्यांचे वस्त्र प्राण्याचे कातडे आहे, ज्याच्या कडे तिसरा अक्ष आहे ज्याने सगळे नष्ट होत असते, जो त्याच्या कडे आश्रय मागणार्यांना आश्रय देतो, अशा देवा, जो ब्राह्मणांचा (ज्ञानी लोकांचा) त्राता आहे. जो सगळ्या भूतांचा देव आहे, त्याला आमचे वंदन असो. ज्याच्या सामर्थ्याला मर्यादा नाहीत, जो प्रेमळ आहे व स्तुती केली कीं प्रसन्न होतो, त्याला आम्ही वंदन करतो. ते ऐकल्यावर शंकर देवांना सांगतो कीं, तो त्याना काय पाहिजे ते समजून घेऊ इच्छित आहे.

कर्ण पर्व भाग तेहतिसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग चौतिसावा

### (तारकाक्षाचा वध, पुढे चालू)

दुर्योधन पुढे सांगत असतो, स्थानूच्या आश्वासनाने देव, ऋषी ह्यांचे समाधान झाले होते. ब्रह्मण शंकराची पुजा करतात. त्यावेळी ते (महादेव) जगाच्या भल्यासाठी बोलतात कीं, "माझ्या कृपेने अहो ब्राह्मण, मी त्या दानवांना आशिर्वाद दिले आहेत. परंतु, त्यांचे वागणे जगाच्या हिताचे नसल्याने त्यांचा नाश होणे सगळ्यांच्या भल्याचेच ठरते. ब्राह्मण त्यावर बोलतात महादेवाला, "आम्ही आपले संरक्षण मागत आहोत. त्याप्रमाणे सगळे जग तुमच्या कृपेने सुरक्षित होऊ द्या", स्थानू बोलतात, "तुमचे सगळे शत्रू मारले जातील. कारण तुम्ही निरहंकारी अहात. मी निरहंकारींचे संरक्षण करण्यासाठी बांधलेला आहे. म्हणून तुम्ही संघटीत रहा व तुमच्या शत्रूचा पराभव करा. तर मी तुम्हाला मदत करीन. संघटीत रहाणे नेहमी चांगले असते. फुटीरांचा नेहमी पराभव होतो.

देव त्यावर बोलतात, "ते दानव आमच्यापेक्षा दुप्पट शक्तीमान आहेत हे आम्ही अनुभवलेले आहे. स्थानू त्यावर बोलतात, "ते पापी आहेत व म्हणून त्यांचे पारिपत्य झाले पाहिजे. माझी अर्धी उर्जा मी तुम्हाला देतो त्यानी तुम्ही त्या दानवांचा पराभव करा". ते ऐकल्यावर देव महादेवाला सांगतात कीं, "अहो महादेव आम्ही तुमची अर्धी उर्जासुद्धा सांभाळू शकणार नाही. त्यापेक्षा आमच्या अर्ध्या उर्जेने व तुमच्या उर्जेने असे आपणच त्यांचा नाश करावा".

स्थानू म्हणतात, "जर तुम्ही माझी अर्धी उर्जा सांभाळू शकणार नसाल तर मी तुमच्या अर्ध्या व माझ्या उर्जेने त्यांचा नाश करीन".

एवढे सांगितल्यावर दुर्योधन पुढे सांगत असतो, ते दैवी लोक महादेवाला ते मान्य असल्याचे सांगतात. महादेव त्या सगळ्या देवांची अर्धी उर्जा घेतो व स्वतः जास्त बलवान होतो. त्याच प्रमाणे ते देवसुद्धा शक्तीमान होतात. त्या वेळेपासून स्थानूला महादेव अशी संज्ञा प्राप्त झाली. महादेव त्याचे पिनाक आणि त्रिशूळ घेऊन दानवांचा नाश करण्यासाठी

निघतो. ते पाहून देव बोलतात, सगळ्या जगातील प्राण्यांच्या उर्जेचा उपयोग करून आपण एक रथ तयार करावा म्हणजे त्या दिव्य रथाने महादेव आपल्या शत्रूंचा नाश करण्यासाठी जाऊ शकतील. त्यासाठी ते विश्वकर्माला बोलावतात. त्याला सांगतात कीं, तो एक दिव्य रथ तयार करील महादेवासाठी. त्या रथाच्या बांधणीला सुरूवात होते. सगळे देव त्या कामात मदत करतात. त्यात विष्णू, सोम व हुताशनि महादेवाचे बाण बनतात. अग्नी बाणाचा दांडा बनतो. सोम बाणाचे टोक व विष्णू त्या टोकाची धार बनतात. पृथ्वीवरील सगळी नगरं, पहाड, नद्या, बेटे ह्यांच्यापासून रथाचा गाडा बनतो. मंदार त्याचा आंस बनतो, गंगा लगाम बनते, दहा दिशा त्या रथाची सजावट बनतात. नक्षत्रं त्या रथाचे छप्पर बनते, कृतयुगाने ते सगळे एकत्र बांधलेले होते. वासुकी चाबूक बनतो. हिमालय, विंध्य पर्वत वरचे व खालचे भाग बनतात. उदय व अस्त त्या रथाची दोन चाकं बनतात. सात ऋषी त्या रथाचे संरक्षक बनतात. सगळ्या नद्या व समुद्र त्या रथाचे बंध बनतात. रात्र व दिवस, काळ व कश्थ, मोसम, त्या रथाचे भाग होतात. धर्म, हित आणि सुख त्यांचे त्रिशूळ बनतात. वनस्पती त्यांच्या फळं व फुलांनी रथाच्या घंटा बनतात. सगळे शक्तीमान सर्प रथाची शोभा वाढवत असतात. सगळे तारे व आकाश त्या रथाचे बाह्य अंग बनतात. ते सहा देव जे लोकपाल आहेत ते सहा घोडे बनतात. कालप्रस्थ, नहुष, करकोरक, धनंजय रथाचे बंध बनतात. दिशा व उपदिशा इतर बंध बनातात. वेदीक ध्वनी दांडा बनतो, पितर त्या रथाचे खिळे व आकडे बनतात. सत्य, कर्म, हित आणि तपस्या ह्यांनी तो रथ बांधलेला होता. मन त्याचे आधार होते. शब्द व वाणी त्याचा मार्ग होते. त्याच्यावर विविध रगाचे झेंडे फडकत होते विविध प्रवृत्तींचे निदर्शक होते. इंद्राच्या वज्राने त्या रथाला तेज दिले होते त्यात तो चमकू लागला होता. ईशानचे तप त्याचे धनुष्य होते. देवी सावित्री त्या धनुष्याचा आवाज होत्या. मेरू पर्वत त्याचा ध्वजस्तंभ होता. विजेच्या चमचमाटासह ढगं त्या रथाच्या पताका झाल्या होत्या. अशी गाडी देवांनी स्थानूसाठी तयार केली होती. तो रथ पाहून सगळे देव नवल करत होते. त्या एका रथात सगळ्या सृष्टीची उर्जा एकवटलेली होती. ते समजतात कीं आता तो रथ तयार झाला आहे. त्या विलक्षण रथात शंकर महादेव आपली अस्त्र, आयुध घेऊन सज्ज होतात. त्यांत ब्राह्मणांचा दांडा, यमाचा दांडा व रुद्राचा दांडा होते. अथर्व आणि अंगिरस त्या रथाच्या चाकांचे संरक्षक झाले. ऋग्वेद, पुराणं, त्या

रथाच्या पुढे सज्ज होते. यजुर्वेद रथाच्या मागून संरक्षण देत होता. सगळी पवित्र वाणी आणि यज्ञ शास्त्र, अक्षर ओम त्याच्या झेंड्यावर होते. तो रथ फारच सुदर दिसत होता. दिव्य रुद्र साक्षात मृत्यूच्या रुपात उभा होता. विष्णू, अग्नी बाणाच्या रुपात तयार होते. विष्णू भवाचे सार आहे ते सगळे जाणतात. त्याचा स्पर्श असुरांना सहन होणारा नव्हता. महादेव त्यांचा क्रोध त्या बाणात भरतात. तो भृगू व अंगिरसांचा बनलेला होता. त्यानंतर महादेव नील देवतेला आवाहन करतात. तिच्या तेजाने सगळे उजळून निघते. सगळ्या चांगल्याचे संरक्षण करणारा व वाईटाचा नाश करणारा अर्थात स्थानू तयार झाला होता. त्याला मदत करण्यासाठी भयंकर दिसणारे प्राणी त्याच्या भोवती फिरत होते. ते सगळे विलक्षण व सुंदर होते. सगळी चराचर सृष्टी तेथे हजर होती. त्याच्या हातात सोम, अग्नी आणि विष्णू ह्यांचे बाण होते. महादेव वायूदेवाला सुगंध पसरवण्यास सांगतात. त्यानंतर महादेव त्या रथात चढतात तेव्हां सगळी पृथ्वी हादरते. गंधर्व, अप्सरा, स्थानूचे गुणगान सुरू करतात. अप्सरा सुंदर नृत्य करतात. शंकर देवांना विचारतात, "माझ्या रथाचा सारथी कोण होणार"? देव एका आवाजात बोलतात, "तुम्ही ज्याला सांगाल तो होईल". महादेव बोलतात, जो माझ्यापेक्षा जास्त श्रेष्ठ आहे तोंच माझा सारथी होईल". ते ऐकल्यावर सगळे देव ब्रह्मदेवाला विनंती करतात. आता सगळी तयारी झाली आहे आता तुम्ही त्या रथाचे सारथी व्हावे अशी दे देव ब्रह्माला विनंती करतात. देव ब्रह्माला सांगतात कीं, महादेव तयार आहेत पण त्यांना त्यांच्या पेक्षा श्रेष्ठ असा सारथी पाहिजे तेव्हां आपणच ते करू शकाल. त्यावर ब्रह्मदेव बोलतात, "आपण जे बोलता ते बरोबर आहे. मी सारथी होण्यास तयार आहे. अशाप्रकारे ब्रह्मा ईशाचे सारथी होतात. विष्णू, सोम व अग्नी असलेले बाण घेऊन ईशान त्या वैश्विक रथात चढतात. तेव्हां असुर, दानव आणि दैत्य घाबरतात. तो वरदाई देव त्याच्या शस्त्रासह त्या विलक्षण रथात उभा होता. त्याचे तेज सगळीकडे पसरलेले होते. स्थानू इंद्राला बोलतात, "अरे पुरंदरा, तू कधी दुःख करू नकोस. लक्षात असू दे कीं ते असुर आधीच मेले आहेत ह्या शरांच्या माध्यमाने. ते ऐकल्यावर सगळे देव बोलतात, "आपण जे सांगता ते खरे आहे. असुर आधीच मेल्यात जमा आहेत. देव त्याने समाधानी होतात. ते झाल्यानंतर महादेव इतर देवांच्या बरोबर त्या रथातून पुढे जातात. महादेवाचे सगळे सहाय्यक त्यांच्या बरोबर होते ज्यात मांसाहारी

जास्त होते. जे अजिंक्य होते. ते त्या प्रसंगी आपला आनद व्यक्त करण्यासाठी नांचत गांत ओरडत होते. ऋषीवर्ग सुद्धा त्यांच्या तपस्येच्या उर्जेने तेजस्वा झालेले महादेवास शुभेच्छा देत असतात. जसे तो वरदाई परमेश्वर पुढे जात होता सगळ्या चराचरांना अभयत्वाचे आश्वासन देत होता तसे सगळे जग त्याचे ऋणी झालेले दिसत होते. ऋषी महादेवाची स्तुती करणारी गाणी, साम गाऊ लागले होते. त्यामुळें स्थानूची ताकद वाढत होती. सगळे त्याला उत्तेजन देत होते व सांगत होते ते दैत्य कोठे आहेत. तो त्याच्या गणांबरोबर त्रिपुराकडे निघाला होता जेथे ते असुर रहात होते. त्यांना दैत्य व दानवांचे संरक्षण होते. तो चटकन स्वर्गाकडे जातो. जेव्हां महादेव त्रिपुराकडे जात होता त्याच्या रथाचे घोडे उत्तेजित होऊन मोठ्या मोठ्याने खिंकाळू लागतात. त्याचे वृभष चिन्ह भयंकर आवाजात हंबरू लागते. ते तारकाचे अनेक साथीदार पहातात. त्यांना समजते आता युद्धाचा प्रसंग आला आहे. सगळे प्राणी घाबरून जातात. जेव्हां हर त्याच्या बाणाचा नेम लावतो ते आणखीन घाबरतात. परंतु, त्या बाणातील सोम, अग्नी व विष्णू ह्यांच्या भारामुळे तसेंच ब्रह्म व रुद्राच्या वजनामुळे तो रथ खाली रुतून जाऊ लागला त्याचे पुढे जाणे मंद झाले होते. त्यावेळी नारायण त्याच्या बाणातून बाहेर आले, एका अजस्त्र बैलाचे रुप धारण करून ते त्या रथाला वर उचलून काढतात. ते सगळे दैत्य पहात होते व मोठ्या मोठ्याने ओरडून गोंधळ करत होते. त्या बैलाच्या डोक्यावर सुद्धा नाचत होते. त्यावेळी रुद्र दानवांची नगरी पहात होता. महादेव त्याचे दिव्य धनुष्य सज्ज करून त्या तीन नगरींवर नेम धरत असतो. ते होत असतांना त्या तीन नगरी त्यांचे भिन्न अस्तित्व हरवतात व त्या एकत्र होतात. ते पाहून महात्म्यांना खूप आनंद झाला होता. ते पाहून ते ज्ञानी शिवाची स्तुती करण्यासाठी जय असें बोलतात. ती नगरी महादेवापुढे येऊन उभी होते. तिचे रुप भयंकर होते. महादेव त्यांच्या धनुष्यातून एक बाण तिच्यावर मारतात. तेव्हां त्या नगरातून किंकाळ्या ऐकू येतात. ते असुर जळून जात होते. तो त्या जळणार्या असुरांना पश्चिम समुद्रात फेकून देतो. परंतु, जगाचे नेहमी भले करणारा स्थानू समजतो कीं, त्याना नष्ट करणे उचित नाही. त्यानंतर सगळे पूर्ववत होते. तेवढ्याने समाधानी झालेले देव आपापल्या घरी जातात. अशारितीने महादेव असुरांना, दैत्याना व दानवांना चांगला धडा देतात. कारण स्थानू त्यांच्या भल्यासाठी सुद्धा असतो. एवढे सांगून पुढे दुर्योधन सल्याला सांगतो कीं, जसे

ब्रह्माने रुद्राला आवरून दानवांचे संरक्षण केले तसें तुला कर्णाला आवरून युद्धाचे चांगले करू शकशिल. ज्याप्रमाणे ईशान पेक्षा ब्रह्म श्रेष्ठ होते तसेंच तू कर्णापेक्षा श्रेष्ठ आहेस म्हणून त्याचे सारथ्य केले पाहिजेस. तुम्ही एकत्र येऊन माझ्या शत्रूचा नाश करू शकाल. जे असुरासारखे आहेत माझ्यासाठी. तुझ्या चलाखीने कर्ण कुंतीच्या मुलाचा वध करील तर ते उत्तम होईल. ह्या संदर्भात आणखीन एक उदाहरण मी तुला सांगणार आहे ते ऐक. ती कथा ब्राह्मणाने सांगितली आहे माझ्या वडलांना. त्यातील शहाणपण जर तू समजलास तर बरे होईल. भृगुच्या वंशात जमदाग्नी जन्मला होता. जो मोठा तपस्वी होता. त्याला एक पुत्र होता. त्याला राम म्हणून सगळे ओळखत होते. घोर तपस्या व व्रतस्थ जीवन जगून तो भवाला प्रसन्न करून घेतो. त्याला शिवाची शस्त्र पाहिजे होती. महादेव त्याच्या तपस्येवर व व्रतस्थ जीवनावर संतुष्ट होतात. ते त्या रामाला दर्शन देतात. त्याला बोलतात कीं, ते त्याच्यावर प्रसन्न झाले आहेत. तुला काय पाहिजे ते मांग. पुढे शंकर त्याला बोलतात कीं, त्याना रामाची काय इच्छा आहे ते ठाऊक आहे. परंतु, तुझा आत्मा अजून निरहंकारी झाला नाही, ते तुला करावा लागेल. ते झाले कीं मी तुला सगळी शस्त्र विद्या प्रदान करीन. असे सांगून शंकर अंतर्धान पावतात. पुढे दुर्योधन सांगतो, त्या रामाने त्याचे तप तसेंच चालू ठेवले. अशारितीने अनेक वर्षे चालले होते. शेवटी महादेव त्यांने संतुष्ठ होतात. शंकर पार्वतीसमोर रामाला ती शस्त्रविद्या देतात. त्या काळी दैत्य फार प्रबळ झाले होते. ते त्यांच्या अहंकाराने बिघडलेले होते. सगळ्यांना त्रास देऊ लागले होते. देव ते न आवडून त्यांचा नाश करण्याचे ठरवतात. त्यासाठी ते महादेवाकडे जातात. महादेव सांगतात कीं त्यांची शस्त्रविद्या आता रामाकडे आहे तेव्हां ते रामाला सांगतील मदत करण्यासाठी. राम देवाला म्हणतात, "अहो महादेव, माझ्याकडे काहींच नाही, अशाने मी त्या बलाढ्य दानवांना कसा हरवणार"? महेश्वर त्याला आज्ञा करतात किं, माझ्या आज्ञेने तू त्या दानवांचा परामर्श करशिल तेव्हां त्यासाठी निघून जा. राम ती आज्ञा प्रमाण मानून दानवांचा नाश करण्यासाठी निघतो. त्या दानवांना तो सज्ज पहातो त्यांना बोलतो, "मला महादेवांनी तुमचा पराभव करण्यासाठी पाठवले आहे. तेवढे बोलून राम शिवांची पुजा करू लागतो. त्यानंतर तो दैत्यांशी लढू लागतो. त्याचे फटके इंद्राच्या वज्रासारखे झाले होते. दैत्य मरून पडत होते. ते केल्यावर राम शंकरानां भेटण्यासाठी जातो. त्याच्या अंगावर

खूप जखमा होत्या. परंतु, स्थानूच्या स्पर्शाने त्या चटकन बर्या होतात. त्यानंतर शिव रामावर संतुष्ट होऊन त्याला कितीतरी आशिर्वाद देतात.

दुर्योधन पुढे सांगतो, अशारितीने राम शिवाची सगळी शस्त्रं प्राप्त करतो. त्यानंतर राम शिवाची रजा घेतो. अशी कथा त्या ब्राह्मणाने रामाबद्दलची आम्हाला सांगितली होती. दुर्योधन पुढे सल्याला सांगतो कीं, राम ते ज्ञान कर्णाला देतात. जर कर्णात काहीं दोष असतां तर रामाने त्याला ती विद्या दिली नसती. मला नाही वाटत कर्ण सुताच्या पोटी जन्मला आहे. तो देवांचा पुत्र आहे. म्हणून क्षत्रिय आहे. त्याला त्याच्या मातेने त्याच्या लहानपणी नदीत सोडले व ते बाळ त्या सुताला नदीत तरंगत असतांना मिळाले असे मी ऐकतो. त्याच्या कानातील कुंडलं व छातीचे कवच सामान्य माणसाना असतं नाही . तो सुर्यासारखा आहे. कर्णाला वैकर्तन असे बोलतात, त्याच्या छातीवर एकेकाळी एक कवच होते ते त्यांने काढून कोणा ब्राह्मणाला दिले तेव्हापासून त्याचे वैकर्तन नांव झाले. रामाचा शिष्य असलेला कर्ण मामुली समजू नकोस.

कर्ण पर्व भाग चौतिसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग पस्तिसावा

### (सल्य कर्णाचे सारथ्य स्वीकारतो)

दुर्योधन पुढे बोलतो, "प्राचीन काळी तसेंच झाले व ब्रह्म सारथी झाला व शंकर योद्धा झाला व त्यांना यश प्राप्त झाले. आता वेळ न दवडता त्याच्या रथाकडे निघ". सल्य बोलतो, मला त्या दोन गोष्टी सांगितल्यास ते मी आधीसुद्धा ऐकल्या आहेत. कृष्णाला सगळे समजते जसे ब्रह्माला समजते. ज्याचा अर्थ असा होतो कीं जर कर्णाने अर्जुनाला मारले तर कृष्ण त्याची जागा घेईल व लढेल नेमके तसेंच तू माझ्याबाबत सुचवत आहेस असे मला वाटते. येथे असा कोणी राजा नाही कीं, तो कृष्णाशी बरोबरी करू शकेल तू फालतु तुलना करू नकोस.

संजय पुढे सांगतो, सल्य तसे बोलत असताना दुर्योधन त्याला सांगतो, कर्णाचे सारथ्य करण्यात आपल्या सगळ्यांचे भले आहे. म्हणून ताबडतोब त्याच्या रथाकडे चल. त्याच्या धनुष्याचा आवाज ऐकून पांडवांचे सैन्य पळून जाते. त्याला कांहीं कमी समजू नकोस. ते तू स्वताच्या डोळ्याने पाहिले आहेस. कसे घटोत्कचाचा त्याच्या असंख्य मायावी कृत्यांसह कर्णाने अखेरीस बळी घेतला ते तू पाहिले आहेस. तो विभत्सू कर्णाला भिऊन त्याच्यापुढे येत नाही. म्हणून आजवर त्यांचे द्वंद्व झालेले नाही. कर्णाच्या भयाने महाबली भिमसुद्धा पळून जातो ते तुला माहीत आहे. माद्रीचे शूरवीर मुलगेसुद्धा त्यांने हरवले आहेत. परंतु कांही कारणाने तो त्या पांडवांना मारत नाही. ते कारण मला सुद्धा ठाऊक नाही. सत्यकी वृश्नी कर्णाने पराजित केला आहे. श्रींजयांचे थोर नेते त्यांना यमाकडे पाठवले आहेत. धृष्टद्युम्नाला सुद्धा त्याने अनेक वेळी हरवले आहे. तो रागावला तर इंद्रासारखा लढतो. तुझे वेदाचे ज्ञान पूर्ण आहे. तुझ्याशी दोन हात करू शकेल असा कोणी ह्या जगांत नाही. म्हणून तुला सल्य किताब मिळाला आहे. कृष्ण तुझ्यापेक्षा श्रेष्ठ आहे कां"? जसा कृष्ण पांडवांसाठी आहे तसा तू आमच्यासाठी आहेस.

सल्य त्याला बोलतो, अरे गांधारीच्या मुला, आम्हाला मोठेपणा देणार्या कौरवा, तू तुझ्या सैन्याला माझ्यापुढे सांग कीं मी कृष्णापेक्षा श्रेष्ठ आहे. तसे केलेस तर मी फार खूष होईन

व कर्णाचे सारथ्य मनापासून करण्यास तयार होईन. परंतु, मला एक अट त्याच्या कडून मान्यकरून घ्यावयाची आहे कीं, मी जे माझ्या मनाला येईल ते त्याच्यापुढे बोलणार आहे व त्याला त्यांनी आडकाठी करता कामा नये. एकदा कां त्याने माझी हि अट मान्य केली कीं मी त्याचे सारथ्य राजी खूषीने करणार आहे.

पुढे संजय सांगत असतो, तुमचा मुलगा सल्याला बोलतो, "चालेल, तसे होईल". सगळ्या जमलेल्या क्षत्रियांपुढे तो ते मान्य करतो. सल्य तयार झाला त्यामुळें दुर्योधनाला फार आनंद होतो. तो भाटांना बोलावतो व सल्याचे कौतुक करणारे गाणे त्यांच्या कडून गाऊन घेतो. त्यामध्ये सल्य व कर्ण सगळ्या पांडवांचा कसा नाश करणार आहेत ते गाईले जाते. कर्णाची तुलना इंद्राशी व सल्याची ब्रह्माशी त्यात केली जाते. त्यामुळे सल्य फार खूष झालेला होता. कर्णाला ते समजल्यावर तो सुद्धा फार खूष होतो कारण त्यालाच सल्य त्याचा सारथी व्हावा असे पाहिजे होते. कारण त्यामुळे तो सल्याचा वेळोवेळी पाणउतारा करू शकणार होता. मोठ्या युक्तीने ते दुर्योधनाने साध्य केले होते. त्यानंतर सल्य त्या रणांगणात मोठ्या आवाजाने सगळ्यांना सांगतो कीं, त्याची इच्छा आहे कीं, कर्ण अर्जुनाशी लढेल. केवळ त्यासाठी त्याने त्याचे सारथ्य घेतले आहे असेसुद्धा तो त्या ठिकणी जाहिर करतो.

सल्य पुढे सांगतो, तुमच्या मुलाला तो मिठी मारतो व बोलतो, जर तुझी तीच इच्छा आहे तर ते खरे करण्यासाठी मी वाट्टेल ते करणार आहे. परंतु मी जे कांहीं त्या सुमारास बोलेन त्याबद्दल तुम्ही दोघे मला माफ करणार अहात असे मी समजतो. त्यावर कर्ण म्हणतो, अरे मद्रच्या राजा, तू आमचे भले करण्यात रहा जसे कृष्ण पांडवांचे व ब्रह्म रुद्राचे करत असतात. ते ऐकून सल्य त्याला सांगतो, स्वताचा अपमान करणे, स्वताची स्तुती करणे, दुसर्याला वाईट बोलणे, कुचेष्टा करणे असे चांगल्या वर्तणूकीत अयोग्य समजले जाते. परंतु कांहीं स्वताची स्तुती करत रहातात. जसे मताली इंद्राला मदत करतो तसे मी कर्णाला मदत करणार आहे. त्यामुळें कर्ण अर्जुनाला पराभूत करू शकेल किंवा कसे, ते सांगता येत नाही. त्यासाठी मी तुझ्या रथाचे सारथ्य घेतले आहे. तू सुताच्या मुला निर्धास्त रहा व अर्जुनाशी लढ.

कर्ण पर्व भाग पस्तिसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग छत्तिसावा

दुर्योधन बोलतो, अरे कर्ण हा तुझा सारथी राहील. हा मद्रचा राजा आहे. जसे मताली इंद्राच्या रथाचे सारथ्य करतो तसं हा तुझ्या रथाचे करणार आहे. तू योद्धा म्हणून असशिल व हा तुझा सारथी असेल. ह्या व्यवस्थेतून मी पांडवांचे पारिपत्य करणार आहे.

संजय पुढे सांगतो, दुसर्या दिवशी दुर्योधन पुन्हा सल्याला बोलतो कीं, तुला कर्णाचे सारथ्य करावयाचे आहे. तू जर त्याला संरक्षण दिलेस तरच तो पार्थाचा वध करू शकेल. ते ऐकल्यावर सल्य त्याला आश्वासन देतो, कीं तो तेंच करणार आहे. सल्य सारथी होण्यास तयार आहे ते समजल्यामुळें कर्णाची कळी खुललेली असते. तो जरा जास्त उत्तेजित झालेला दिसत होता. त्यानंतर त्यांचा रथ सज्ज केला जातो व सल्य कर्णाला तो रथ दाखवत त्याला बोलतो, "ह्या रथाने तुझा विजय होणार आहे". त्यानंतर कर्ण त्या रथाची पुजा करतो. ब्राह्मण त्याला शुभेच्छा देतात. त्यानंतर कर्ण सूर्याला नमस्कार करतो. त्यानंतर तो रथाला प्रदक्षिणा करतो. त्यानंतर विधीपूर्वक सल्य त्याला रथात चढण्याचे सांगतो. ते दोघे त्या रथात चढतात. भाटांनी त्यांचे कौतुक करण्यास सुरूवात केली. त्यात यज्ञाचे साम गाईले जात होते. सूर्य मंदार पर्वताच्या माथ्यावर जसा दिसतो तसा कर्ण त्या रथात दिसत होता. त्यांना तसे पाहून दुर्योधन बोलतो, "अरे अधिरथाच्या मुला, तू ते काम करणार आहेस जे सहसा कोणी करू शकणार नाही. जे द्रोण व भिष्म ह्यांना सुद्धा करता आलेले नाही ते अर्जुन व भिमसेन ह्यांना अडवावयाचे काम तुला करावयाचे आहे. एकतर युधिष्ठीराला कैद करून अथवा त्या दोघांना ठार मारून तुला ते करावे लागणार आहे. त्याशिवाय माद्रीच्या मुलांनासुद्धा तुला मारावयाचे आहे". ते बोलल्या नंतर कौरवांची रणवाद्ये जोरांनी वाजू लागतात. कर्ण सल्यला आज्ञा करतो कीं, त्यांचा रथ पांडवांच्या दिशेने न्यावा. कर्ण त्याला सांगतो कीं, तो आज शेकडो सैनिक पांडवांचे धारातीर्थी पाडणार आहे. ते ऐकल्यावर सल्य त्याला बोलतो कीं, तो (कर्ण) पांडवांना कमी समजतो परंतु, ते चुकीचे ठरेल. शत्रूला कमी

समजण्याने तो कमी होत नाही. उलट आपण बेसावध होतो व त्यात मोठा धोका असतो. तू जेव्हां गांडीवाचा टणत्कार ऐकशिल तेव्हां तुला समजेल पार्थ काय आहे. जेव्हां तू (कर्ण) युधिष्ठीराला व नकूल व सहदेवांना त्यांचे बाण मारतांना पहाशिल तेव्हां समजेल तुला ते कोण आहेत. त्यानंतर त्यांचा रथ पांडवांच्या दिशेने जात असतो.

संजय पुढे सांगतो, सल्याचे बोलणे दुर्लक्षून कर्ण त्याला आज्ञा करतो कीं तो त्याचे सारथ्य बरोबर करील.

कर्ण पर्व भाग छत्तीसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग सदोतिसावा

### (कर्णाचे गर्वाने बोलणे व सल्याचे त्याला समज देणे)

संजय पुढे सांगतो, कर्णाचे तेथे येणे पाहून कौरवांच्या सैन्याचा उत्साह द्विगुणीत होतो. ते मोठ्या मोठ्याने गर्जना करत त्याचे स्वागत करतात. विविध रणवाद्ये वाजू लागतात. त्यानंतर त्यांचे लष्कर रणभूमीकडे जाऊ लागते. विजय किंवा मृत्यू हे दोनच त्यांच्या समोर होते. त्यांच्या रथांच्या जाण्याने पृथ्वी हादरत होती. मोठे संकट पुढे ठेवले आहे आपली वाट पहात आहे हे त्यांना जाणवत होते. अनेक अशुभ लक्षणं दिसू लागली होती. कौरवांना ते दिसत होते म्हणजे कौरवांच्या भाग्यात काळे लिहिलेले होते असे दिसत होते. कर्णाचा रथ युद्ध भूमीतून जात असतांना त्यांचे दोस्त राजे त्याला अभिवादन करत असतात. असे त्यांना वाटत होते कीं, पांडवांचा आधीच नाश झाला आहे. कर्णाला भिष्माची व द्रोणांची आठवण येत असते. त्याला पार्थाच्या पराक्रमाच्या गोष्टी सुद्धा आठवत असतात. आपण कोणाला भिडणार आहोत त्याचा तो अंदाज घेत असतो. त्या जोरात कर्ण सल्याला सांगतो कीं, "तो एकदा हातात धनुष्य घेऊन उभा राहिला कीं इंद्राला सुद्धा भिणारा नाही मग पांडवांचे काय? ह्या आधी अनेक महारथी भिष्माच्या व द्रोणाच्या मार्गाने गेले ते मी पाहिलं आहे तरी मला त्याचे कांहीं वाटत नाही. जे कधी मरणार नाहीत असें वाटत होते ते मेले आहेत. तरी मला भय वाटत नाही. द्रोण सगळ्या उत्तम शस्त्रांचे जाणकार असतांना व स्वतः ब्राह्मण असतांना मृत्यू टाळू शकले नाहीत. कारण ती एक स्वाभाविक गोष्ट आहे, त्याचा विचार न करता आपल्याला आपले क्षत्रिय कर्तव्य करावयाचे असते. द्रोणांचे उदाहरण पहाता मला कांहीं गोष्टी सुचतात त्या मी तुला सांगतो. कुरु लोकांत माझ्याशिवाय कोणीही, तू धरून, नाही जो अर्जुनाला आव्हान देऊ शकेल. अर्जुन म्हणजे त्याच्या शत्रूचा यम असतो. मृत्यूपुढे सगळे कमजोर असतात. केल्या कर्माचे फळ आपल्याला भोगावेच लागते व तो यमाचा कायदा आहे म्हणून त्याला न्यायदेवता म्हणतात. कोण कधी मरेल ते सांगता येत नाही अशा युद्धात. कोणाच्या हाती आपला मृत्यू आहे तेसुद्धा आपण सांगू शकत नाही. मोठी आयुधं असलेले शूरवीर सामान्य

सैनिकांच्या हातून मेल्याची कित्येक उदाहरण आहेत. द्रोण किती मोठे होते पण त्यांचा मरण काळ आला तसे ते गेलेच. हे सत्य आपण क्षत्रिय समजून असलो पाहिजे. आपण येथे लढत असतांना तेथे आपल्या घरात आपली मुल बायका आपल्या करता रडत असतात. जसे धृतराष्ट्राचे हरत आहेत मी माझी सगळी ताकद लावून लढणार आहे. माझ्या शिवाय कोण त्या पांडवांच्या सैन्याला आवरणार आहे? तो भिम, तो सत्यकी, पार्थ अशांना कोण आवरणार आपल्यात तसा योद्धा आता उरलेला नाही. म्हणून आपल्याला त्वरा केली पाहिजे पांडवांचे सैन्य नष्ट करण्यासाठी. आपल्याला पांचाल, श्रींजय, आणि पांडव ह्यांच्या योद्ध्याना ठार मारावयाचे आहे. एक तर ते मरतील अथवा आपण मरू पण ते होणार हे निश्चित. मला माहित नाही मी कशाप्रकारे मरणार आहे. कदाचित द्रोणासारखा मरणार असेन! आपला काळ आला कीं आपल्याला जावे लागतेच, त्याबद्दल विचार करावयाचा नसतो. विचित्रवीर्याचा मुलगा माझे सदैव भले करत आला आहे, त्यासाठी त्या ऋणातून मला बाहेर येण्यासाठी युद्धात लढत राहिले पाहिजे. त्यासाठी मला मरावे लागले तरी चालेल. भार्गवाने मला सगळी आयुध, अस्त्रं आणि शस्त्रं दिली ती तू पहा. हे धनुष्य, हे भाते, हे मंतरलेले बाण, त्या तलवारी, भाले, ते गदा असें सगळे रामाची देन आहेत. हा शंखूसुद्धा त्यांचा आहे. जो त्यांनी मला दिला. ह्या रथाच्या चाकांचा आवाज मोठा होतो त्याने मी अर्जुनापर्यंत जाणार आहे व त्याचा वध करणार आहे. जरी मृत्यू त्यांचे संरक्षण करत असला तरी मी त्याला मारणार आहे हा माझा निश्चय आहे. अरे सल्या, मी सांगतो कीं जरी यम, वरुण, कुबेर किंवा साक्षात इंद्र ह्या लोकपाल देवतां त्याला वाचवण्यासाठी आल्या तरी मी त्याला मारणार आहे दुर्योधनांसाठी व त्याच्या ऋणातून मुक्त होणार आहे".
संजय पुढे सांगतो, कर्णाची ती गर्वोक्ती ऐकून सल्य चिडतो. तो त्याला मनातल्या मनात हसत असतो. त्यानंतर न राहून तो मोठ्याने हंसू लागतो. शेवटी न राहून सल्य त्याला बोलतो, "थांब, थांब अशी गर्वोक्ती करू नकोस. मला त्याचे हसू येते. तू तूर्त खूषीत आहेस हे मी समजू शकतो. परंतु त्याला मर्यादा असावी. अरे कोठे तो धनंजय आणि कोठे तू! अर्जुनापुढे तू एक सामान्य धनुर्धारी आहेस हे तुझ्या कधी लक्षात येणार? अरे तो स्वर्गात जाऊन आला आहे ह्याची देही ह्यावरून त्याचे सामर्थ्य तुला समजावयाला पाहिजे. तो इंद्राचा लहान भाऊ असा आहे. त्याने यदूंची राजकन्या पळवली त्याला कोणी अडवू

शकला नाही. तो भवाशी लढू शकला, त्याच्याशी लढण्याच्या गोष्टी तू करत आहेस, कोठे आहेस तू? त्याने कितीतरी असुर, राक्षस मारले आहेत तू एका तरी असुराशी लढला आहेस कां? त्याच्यावर अग्नीची कृपा आहे, इंद्राची कृपा आहे, त्याचा साथी साक्षात कृष्ण आहे, जेव्हां तुम्ही विराटाचे गोधन चोरण्यास गेला होता तेव्हां अर्जुनाने स्त्रीवेषात पराजित केले होते व तुला आणि द्रोणांना विवस्त्र केले होते, तेव्हा तुझे सामर्थ्य कठे गेले होते? गंधर्वाने पकडून ठेवले होते तेव्हां तुझ्यासकट दुर्योधनाला त्यांने सोडले होते ते तू कसा विसरतोस? मी सांगतो कीं, जर तू आता पळून गेला नाहीस तर ह्या युद्धात अर्जुन तुझा वध करणार हे निश्चित. तर मी सांगतो कीं, तू तुझ्या बायका मुलासाठी आत्ताच येथून पळून जा. म्हणजे तुझ्या मृत्यूमुळें त्यांना रडावे लागणार नाही".

संजय पुढे सांगतो, सल्य अशारितीने मोठ्या चवीने कर्णाची खिल्ली उडवत होता, ज्यात अर्जुनाचे कौतुक होते, कर्णाला फार राग आला. तो बोलतो, "जे आधीच्या काळी झाले ते झाले, परंतु, तू त्याची एवढी स्तुती कां करतो आहेस? जर तो मला हरवतो तरच तुझे हे बोलणे खरे ठरेल नाही तर नाही".

संजय पुढे सांगतो, सल्य मद्र देशाचा राजा, बोलतो "ठीक आहे तसे पाहू"!

त्यानंतर ते दोघे कांहीं न बोलता रणांगणाकडे निघतात. सल्य त्याच्या घोड्याना वेगांने जेथे अर्जुन आहे तेथे नेऊ लागतो. ते पांडवांच्या फौजा पहातात तेथे अर्जुन कोठे आहे ते तो पाहू लागतो.

कर्ण पर्व भाग सदोतिसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग अडतिसावा

### (कर्णाला अर्जुनाशी लढण्याची उत्सुकता)

संजय पुढे सांगत असतो, कर्ण त्या रणांगणात ज्या पांडव योद्ध्यास भेटत होता त्याला अर्जुनाबद्दल विचारत होता. तो त्या सैनिकांना आमिष दाखवतो कीं जर कोणी त्याला अर्जुनाचा ठावठिकाणा सांगेल तर त्याला पाहिजे तितकी संपत्ती, गाई, दास्या असे जे त्याला पाहिजे ते तो त्याला देईल. परंतु, त्याला अर्जुनाचा ठिकाणी त्यानी सांगितला पाहिजे. थोडक्यात जे त्याला पाहिजे ते त्याला कर्ण देण्याचे आश्वासन करत असतो. थोडक्यात असें कीं जो कोणी अर्जुन व कृष्णाचा ठावठिकाणी सांगेल त्याला तो मालामल करणार असतो. त्या दोघाना ठार मारल्यावर आणखीन संपत्ती तो त्यांना देण्याचे आश्वासन देत असतो. परंतु, त्याला कोणी कांहीं सांगू शकत नाही. सल्य तो प्रकार पाहून स्वताची करमणूक करत होता. जणू कर्णाला वेड लागलं होतं. त्यानंतर कर्ण त्याचे शंखू जोराने वाजवतो. ते ऐकल्यावर कौरवांच्या सैन्याला हुरूप येतो.

त्याच वेळी रणवाद्ये वाजू लागतात. हत्तींचे चित्कार व घोड्यांचे खिंकाळणे त्यात भर घालत असतात. युद्धाला पुन्हा प्रारंभ होणार असे दिसत होते. ते पाहून सल्य कर्णाला कुत्सितपणे बोलतो, "अरे राधासुता, तू युद्धासाठी जरा जास्तच उतावीळ आहेस नाही कां"?

कर्ण पर्व भाग अडतिसावा संपला.

# कर्ण पर्व
## भाग एकोणचाळीसावा
### (सल्य कर्णाला सल्ला देतो)

सल्य कर्णाला बोलतो, "अरे राधासुता कोणालाही कांहीं आमिष दाखवू नकोस, तुला तो झेंडा अगदी लांबून दिसू शकतो. ज्यावर कपीमुद्रा विराजमान आहे. तुझ्या मूर्खपणाचे अशाप्रकारे तू प्रदर्शन करू नकोस. असे कोणी तुला सांगणारसुद्धा नाही हे तुझ्या कसे लक्षात येत नाही? तू तुझी संपत्ती अशारितीने चुकीच्या माणसांना कां देण्याचे बोलत आहेस? असे देणे शास्त्राच्या नियमाप्रमाणे अयोग्य असते ते तुला माहीत नाहीं कां? कधी सिंहांचा पत्ता कोल्ह्याला विचारावयाचा नसतो. तुझ्या ह्या वागण्याचा अर्थ तुला काय करावे व काय करू नये त्याचा अंदाज करता येत नाही. तुझ्या ह्या वागण्याचा अर्थ तू घाबरलेला आहेस परंतु, ते तू दाखवू इच्छित नाहीस. जर तुला अर्जुनाला मारावयाचे असेल तर तू तुझ्या संरक्षित पलटणीच्या मध्ये राहून त्याला आव्हान द्यावयाला पाहिजेस, जे आपण युद्धशस्त्रात शिकलो आहोत. त्याचा तुला कां विसर पडला आहे? मी तुला हे सांगतो कारण धृतराष्ट्राला त्याचा खंदा वीर ह्या परिस्थितीत मूर्खासारखा मेलेला परवडणार नाही. जर तुला खरेखरच अर्जुनाला मारावयाचे असेल तर माझे ऐकत जा. करण माझी मति तुझ्यासारखी अस्वस्थ झालेली नाही"?. ते ऐकून कर्णाला राग येतो व तो बोलतो, "मी माझ्या हिम्मतीवर लढणार आहे. एकटा त्याच्यापुढे जाऊन त्याला आव्हान देणार आहे. ते तुला नाही समजणार. माझा हा निश्चय अढळ आहे. त्यावर मला कोणी अक्कल देण्याचा प्रयत्न करू नये. परंतु, तू मला घाबरवण्याचा प्रयत्न करत आहेस हे मी समजतो. तू मित्राच्या सोंगात माझा शत्रू आहेस असें मला वाटत आहे. माझ्या निर्णयापासून मी हलणार नाही अगदी जरी इंद्र त्याचे वज्र घेऊन आला तरी".

संजयपुढे सांगतो, सल्याला समजते कीं कर्णाला चिडवण्याची ही नामी संधी आहे म्हणून तो पुढे बोलतो, "अरे कर्णा, जेव्हां अर्जुनाचे धारदार बाण तुझ्या अंगात घुसतील तेव्हां तुला समजेल कीं, तुझी हिम्मत किती आहे. तेव्हां तुला पश्चात्ताप होणार आहे. अरे कर्णा, त्याला सव्यसाची म्हणतात ते लक्षात असू दे जरा. तुझे असे होत आहे जसे एकादा लहान

मुलगा आकाशातील चंद्र पकडण्याचा प्रयत्न करतो तसे तुझे झाले आहे". सल्याचा उद्देश कर्णाला भडकवण्याचा होता, तो साध्य होत होता असें दिसत होते. तुझे हे अर्जुनाला दिलेले आव्हान मला एकाद्या कोकराने सिंहाला आव्हान देण्यासारखे वाटते. अरे कर्णा त्या सिंहाला आव्हान देण्याचे बंद कर. ते तुझे काम नाही. विषारी सापाची परीक्षा घेण्यासारखे हे तुझे धाष्ट्र्य आहे. अरे नासमज कर्णा, तुझे आव्हान मला कोल्ह्याने वाघाला देण्यासारखे मूर्खपणाचे वाटते. सापाने गरुडाला आव्हान देण्यासारखे तुझे आव्हान मला वाटते. तुझे आव्हान बेडकाच्या डरकावण्यासारखे आहे. एकाद्या वासराने मोठ्या माजलेल्या बैलाला आव्हान द्यावे असे मला वाटते. सशांची शिकार करणार्या कोल्ह्याला वाटते कीं तो मोठा वीर आहे पण जेव्हां त्याला सिंह दिसतो तेव्हां त्याची गाळण उडते तसे तुझे होणार आहे हे मी समजू शकतो. अरे राधासुता, जोपर्यंत तू त्याच्या गांडीवाचा आवाज ऐकला नाहीस तोवर तुझ्या ह्या गमजा चालतील. एकदा तो ऐकला, कीं, तुझी जी गत होणार आहे ती मला पहावी लागणार आहे. तुझ्या मागील (पाप) कर्माची ज्याना माहिती आहे त्यांना माहीत आहे तू आणि अर्जुनामधील फरक.

कर्ण पर्व भाग एकोणचाळीसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग चाळीसावा

### (सल्याचा सल्ला पुढे चालू)

संजय पुढे सांगतो, सल्याचे ते टोमणे कर्णाला सहन होत नाहीत. त्याला समजते कीं, सल्य त्याचा राग काढत आहे. त्यामुळे तो त्याला खिजवण्यासाठी त्याच्या उद्धट स्वभावाप्रमाणे बोलू लागतो. कर्ण बोलतो, "जे समर्थ असतात त्यांनाच दुसर्या समर्थाची किंमत समजते. इतर फक्त कुत्सितपणा दाखवतात. तुझ्यात कांहीं हिम्मत नाही, म्हणून तुझ्यावर त्या अर्जुनाचा प्रभाव आहे हे मी समजू शकतो. अर्जुनाचे सामर्थ्य मी चांगलाच जाणून आहे. तुला माझ्या हिम्मतीची कल्पना नाही त्यामुळे तू असा मूर्खासारखा मला सांगत आहेस. मी त्याला आव्हान देत आहे. त्याला किटकाने अग्नीला आव्हान देण्यासारखे समजू नकोस. तुला माहित नाही माझ्या भात्यात काय आहे. ते मंतरलेले बाण ज्यामुळें मोठे प्राणी मरतील ते तुला माहित नाही. ते विषारी बाण जे मी खास अर्जुनासाठी वापरणार आहे ते तुला माहित नाहीत, तसे तुला माझ्या कुवतीची अजिबात कल्पना नाही म्हणून तू तसे बोलत आहेस हे मी समजू शकतो. कांहीं अस्त्रं व शस्त्रं मी अर्जूनावरच वापरणार आहे. जेव्हां ते मी वापरीन तेव्हां तुला समजले मी काय आहे. हे सगळे खरे आहे. केवळ वल्गना त्यांना समजू नकोस. मला त्वेष आला कीं, मी कृष्ण व धनंजयांशी लढणार आहे. ते तू पहाशिलच. कृष्ण उत्कर्षाचे केंद्र आहे वृश्नींमध्ये. सगळ्या पंडुपुत्रात धनंजय विजयाचा केंद्र बिंदू आहे, तुला माझ्या जन्माची माहीती नाही म्हणून तू असे बोलत आहेस. ते दोघे मावस भाऊ कृष्ण आणि अर्जुन माझ्या हातून मरतील तेव्हां माझ्या एका बाणात ते ओवल्यासारखे सापडणार आहेत. अर्जुनाचे गांडीव आणि त्याच्या ध्वजावरील कपीमुद्रा व कृष्णाचे सुदर्शन चक्र व गदा भ्याडाना घाबरवू शकतात, माझ्या सारख्यांना नाही. मला त्यांची आव्हान घ्यावयाला आवडते. त्याची गंमत तुला नाही समजणार तू विकृत मनाचा आहेस म्हणून तुला खर्या युद्धाचा अनुभव नाही. म्हणून तू अशा फालतु गोष्टी करत असतोस. भिती पोटी तुझ्यासारखे अशाप्रकारे बरळत असतात. प्रथम मी त्या दोघा मावस भांवाना ठार मारणार त्यानंतर उरलेले पांडव मारणार आहे.

तुला ते समजणार नाही कारण तू एका भ्रष्ट देशातून आला आहेस. ज्याचे नांव मद्र आहे. तुमच्या देशातील क्षत्रिय भ्रष्ट असतात, ते कुलीन नसतात आमच्यासारखे. परंतु, तू माझा मित्र आहेस तरी वैर्यासारखा बोलत आहेस. त्या दोन कृष्णांची कौतुकं मला सांगू नकोस. आज ते मला मारतील अथवा मी त्यांना मारीन. त्यापैकी एक कांहीतरी होणार आहे. हजार कृष्ण आणि हजार पार्थ आले तरी मी त्यांना भित नाही. मी ह्या एका हातांनी त्यांचा नाश करणार आहे. ह्यापुढे तोंड सांभाळून बोलत जा. त्या भ्रष्ट देशाच्या राजाला मी भाव देणार नाही. तुझी लायकी काय आहे ते मला चांगले ठाऊक आहे. देशाटन करणारे जे सांगतात ते सगळे मानतात व त्यातून निरनिराळ्या देशाबद्दल माहीती मिळते. तुझ्या मद्र देशाची काय ख्याती आहे ते मी तुला सांगतो. मद्र देशाचे लोक पक्के नीच असतात असे समजले जाते. ते सगळे ब्राह्मणांनी सांगितलेले असल्याने त्याला कोणी उलट प्रश्न करत नाहीत. आपल्या सभेत आलेले ब्राह्मण काय सांगतात मद्र देशाबद्दल ते सांगतो ते निमुटपणे ऐक, असं समजतात कीं, मद्र देशाचे लोक नीच असतात. ते मित्राचा घात करतात. ते कधी कोणाचे मित्र हितचिंतक नसतात. त्यांची वाणी हलक्या प्रकारची असते. मद्र लोक मरेपर्यंत बदमाषगिरी करतात. त्यांच्यात उच्च नीच असे नसते सगळे सारखेच वागतात. त्यांच्या बायका फार बिनधास्त असतात कोणाशी ही मिसळतात. मनुष्य ओळखीचा आहे नाही त्याचा कांहीं विचार नसतो. त्याच्यात अनेक दुर्गण असतात. त्यांना पाप पुण्य ह्याचा विचार नसतो असें तो ब्राह्मण सांगत होता. ते भाजलेले धान्य खातात. त्याबरोबर मांसे खातात. मक्याच्या पिठाच्या भाकर्या करतात. दारू पितात. घरात बाहेर त्यांच्या बायका हसत खिदळत वावरत असतात. त्यांना मर्यादा नसते. तेंच पुरूषांच्या बाबत असते. ते सहजपणे खोटे बोलतात. मानपान त्यांना समजत नाहीत. शिष्टाचार नसतात. त्यांच्या सारखे असतात, गांधारचे लोक. लुच्चेगिरी हा त्यांचा मुख्य वागण्याचा प्रकार आहे. तेथील ब्राह्मण शुद्राच्या घरी जाऊन पुजा करतात. त्या भागातील ब्राह्मण सुद्धा नीच असतात. त्यासाठी जो मद्रकांशी हात मिळवतो त्याचे पुढे काय होईल ते सांगता येणार नाही. अथर्व वेदातील मंत्रांचा वापर फार होतो. म्हणजे जादूटोणा मद्रकांत विशेष असतो वैदीक धर्म नसतो. तेथील बायका दारू प्याल्यानंतर कपडे काढून नाचतात. त्याबद्दल त्यांच्या पुरुषाना कांहीं वाटत नाही. लैंगिक संबंध सरसकट होत असतात. त्या

बायकांना दारू फार प्रिय असते. त्या त्यांच्या मुलाला सोडतील पण दारू सोडणार नाहीत. त्यांच्या बायकांना लाज शरम ह्यांचे भान नसते. तसेच असतात सिंधू व सौवीर लोक. त्यांच्यात बरेच साम्य असते. त्यांच्या रीतीरिवाजात म्लेच्छपणा असतो.
कर्ण पुढे सांगतो सल्याला, क्षत्रियाचे एक कर्तव्य असते कीं, तो युद्धात मेला तर त्याचे शव तेथेच ठेवावयाचे असते. म्हणून मी मेल्यावर माझे शव तसेंच रणभूमीत ठेवले जाईल. तसे ठेवले कीं त्या क्षत्रियाला स्वर्गप्राप्ती होते जेव्हां पक्षी जे स्वर्गाजवळ जातात ते माझे शव खातील. तू तसा नाहीस. तू पांडवांच्या बाजूला कधीही होशिल कारण तुला तत्त्व नाही मद्रक असल्यामुळे तुझ्या व माझ्या विचारात फरक असणारच. वैदीक धर्म पाळणारा कधी विश्वासघात करणार नाही. तसे तुमचे नसते. तुम्ही सोय पाहून वागणारे असता. मला कोणीही कौरवांचा घात करण्यास सांगू शकणार नाही. मी कौरवांच्या शत्रूंचा नाश करण्यासाठी कटीबद्ध आहे. तसे तुझे नाही. जास्त बोललास तर मी तुझा वध करून तुझे शव त्या प्राण्याना खाण्यास देईन. आपल्या दोस्तीसाठी व धृतराष्टाच्या मुलासाठी व पाप हेऊ नये अशा तीन उद्देशाने मी तुला मारत नाही. जर असे कांहीं तू पुन्हा बरळलास तर मी तुझे डोके ह्या गदेने फोडून टाकीन. लोक ऐकतील कीं त्या दोन कृष्णांना कर्णाने मारले किंवा, कर्णाला त्यांनी मारले. एवढी बडबड केल्यानंतर कर्ण सल्याला आज्ञा करतो कीं, तो रथ घेउन रणांगणात जाईल.
कर्ण पर्व भाग चाळीसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग एकेचाळीसावा

### (सल्य कर्णाला पुन्हा समजावतो)

संजय पुढे सांगतो, कर्णाचे ते बोलणे ऐकल्यावर सल्य त्याला पुनः कांहीं शहाणपण देण्याचा प्रयत्न करतो. तो कर्णाला सुनवतो, "मी अशा घराण्यातून आहे ज्यातील पुरूषांनी मोठे यज्ञ केले आहेत. जे कधी युद्धातून हरलेले नाहीत. ते अभिषिक्त राजे होते ज्यांच्या शीखा पवित्र जलाने धुतलेल्या होत्या. मी स्वतः पवित्र जीवन जगण्यासाठी व्रतस्थ आहे. त्या उलट तू अरे वृषा, असे बगळत होतास कीं, मला वाटते तू दारू झोकून बोलत आहेस. तरीसुद्धा केवळ आपल्या दोस्तीखातर तुला दुरूस्त करण्याचा मी प्रयत्न करणार आहे. तर जे मी सांगतो ते तू शांतपणे ऐकत रहा. ते ऐकल्यानंतर तुला जे समजावयाचे ते समजत रहा, मला त्याची पर्वा नाही. अरे निर्बुद्ध माणसा, नीच प्रवृत्तीच्या माणसा, तू जे दोष सांगितले ते माझ्यामध्ये नाहीत. त्यासाठी जरी तू माझा जीव घेतलास तरी चालेल. मी तुला तेंच सांगणार आहे जे खरे आहे. कारण, मी आता तुझा सारथी म्हणजे हितचिंतक आहे व दुर्योधनाचा मित्रसुद्धा आहे. मी जो रथ हाकणार आहे त्याच्या सगळ्या मर्यादा लक्षात घेऊन. त्याच्या घोड्याच्या, त्यावरील योद्ध्याच्या, त्याच्या बाणांच्या अशा सगळ्यांची शप्पथ घेऊन मी तुला एक कथा सांगणार आहे ती तुझ्या भल्याची आहे. ती निमूटपणे ऐक, एके काळी समुद्राच्या पैलतीरी एक वैश्य रहात होता जे खूप श्रीमंत होता. तो यज्ञ करत असें. त्यात तो भरपूर दानं करत असें. तो शांत प्रवृत्तीचा व त्याच्या कार्यात प्रामाणिकपणे असा होता. त्याला अनेक पुत्र होते. ज्यांवर तो प्रेम करत होता. तो अशा राजाच्या राज्यात रहात होता जो स्वतः फार गुणी होता. त्या राज्यात एक कावळासुद्धा रहात होता जो त्या वैश्याच्या मुलांनी उष्टवलेले खाद्य खाऊन रहात असे. ती मुलं त्या कावळ्याला नेहमी चांगले चुंगले मांस, दुध, मध वगैरे खाण्यासाठी देत असतं. तसे खावयाला मिळाल्यामुळे तो कावळा माजला व इतर पक्षांचा अपमान करू लागला जे त्याच्या इतकेच व काहीं त्याच्यापेक्षा उच्च होते. एकदा एक तेजस्वी हंस पक्षी भटकत भटकत त्या ठिकाणी पोहोचतो. त्याला ती वैश्याची मुलं पहातात. ती त्या कावळ्याला

बोलतात, "अरे कावळ्या, तू सगळ्या पक्षात श्रेष्ठ आहेस. तो कावळा त्या स्तुतीने खूष होतो. त्या मुलांचे खरे समजून रहातो. त्याला गर्व होतो. तो त्या जोशात त्या हंस पक्षाच्या जवळ जातो. तो मूर्ख कावळा त्या हंस पक्षास उडण्याच्या शर्यतीचे आव्हान देतो. तो हंस ते आव्हान स्वीकारतो. ते त्या कावळ्याचे आव्हान ऐकून हसू लागतात. त्यानंतर तो हंस पक्षा त्या कावळ्यास समज देण्यासाठी सांगतो, "आम्ही हंस पक्षा आहोत. आमचे ठिकाण मानस सरोवर आहे. आम्ही सगळ्या पृथ्वीवर फिरत असतो. आमच्या पंखांचे सगळे कौतुक करतात. कारण ते कधी उडतांना थकत नाहीत. त्यामुळे आम्ही कोठेही उडत जाऊ शकतो. परंतु, तू एक कावळा आहेस. जे नेहमी स्थानिक असतात. ते कधी दुसर्या ठिकाणी जात नाहीत. म्हणून आम्हाला उडण्याचे आव्हान तू देतोस त्याचे आम्हाला आश्चर्य वाटते. आता मला सांग काय तू आमच्या सारखा देश विदेश फिरू शकशिल"?

तो उद्धट कावळा त्याच्या मूर्खपणामुळें ज्याला दुसर्यात नेहमी खोट पहाण्याची सवय होती, बोलतो, "मी तुमच्या पेक्षा जास्त चांगले उडू शकतो. मी तुमच्यापेक्षा जास्त अंतर जाऊ शकतो. मी विविध प्रकारच्या उडण्याच्या तर्हा दाखवू शकतो. अनेक योजने मी सतत उडत राहू शकतो. त्या अनेक योजने अंतरात मी विविध प्रकारच्या उडण्याच्या तर्हा दाखवू शकतो. उंच भरारी मारणे, खाली खोल झोकून देणे, त्याशिवाय नुसते फडफडणे असे आणि कित्येक प्रकार मी करू शकतो. त्याशिवाय संथपणे तरंगत रहाणे, पंख न हलवता उडणे, जागच्याजागी उडत रहाणे असें कित्येक प्रकार त्यात मी करू शकतो. त्यांची प्रात्यक्षिकं मी तुम्हाला दाखवू शकतो. आता मला सांगा अहो हंस त्यातील कोणत्या प्रकारात मी तुम्हाला उडून दाखवावे ते सांगा. माझ्या बरोबर तुम्हालासुद्धा उडावे लागेल".

हंस त्याला बोलतो, ते ऐक कर्णा, "एक कावळा अनेक प्रकाराने उडू शकतो ते आम्हाला माहित आहे. त्यातील ज्या प्रकाराने तुला उडावयाचे आहे त्या प्रकाराने तू उडून दाखव. कारण आम्ही हंसपक्षांना एकच प्रकार माहीत आहे व त्यानेच आम्ही सदैव उडत असतो. ते ऐकून तेथे जमलेले इतर कावळे त्या हंसपक्षाला हसू लागतात. ते बोलतात एकाच प्रकारे उडून तो त्या अनेक प्रकारे उडणार्या कावळ्याची बरोबरी कशी करणार"?

ते उडू लागतात. हंसपक्षा एका संथ चालीने उडत असतो तर इतर कावळे वार्याच्या जोरामुळें वेडेवाकडे झोकत झोकत उडत असतात. त्यांची पंख थकतात. ते मध्येच

उतरतात. त्या उलट हंस त्याच्या एकाच गतीने परंतु, वार्याचा उपयोग करत फार लांब निघून जात होता. त्याच्या उडण्यातील रुबाब पहाण्यासारखा होता. त्या उलट कावळ्याच्या विचित्रप्रकारे उडण्याची धडपड पाहून हसू येत होते. त्यामुळे कावळ्याची तो हंसपक्षी चेष्टा करू लागतो. थोडे उडल्यानंतर कावळा त्याला बोलतो, तू माझ्या सारखा गिरक्या घेत उडू शकत नाहीस. ते ऐकल्यावर हंसपक्षी उंच भरारी मारून पश्चिमेकडे उडून जातो. त्याच्या मागून कावळा उडतो परंतु, थोड्याच वेळांत समुद्र येतो व कावळ्याला समजत नाही तेथे कसे उडावयाचे. खाली पाणीच पाणी होते. त्या पाण्यातील अजस्त्र मासे पाण्यात उड्या मारत होते ते तो पहातो व तो घाबरला. अरे सुतापुत्रा, कावळा मागे परतला पण हंस पुढे त्या अथांग सागरावरून निघून गेला. मागे वळून तो हंसपक्षी त्या कावळ्याकडे पहातो. त्यानंतर तो हंसपक्षी त्याची वाट पहात तेथे आकाशात थांबतो. बर्याच वेळांनी तो कावळा त्याच्या पर्यंत पोहोचतो. हंस त्याला बोलतो, "तुझी गती इतकी कमी आहे त्याचे मला नवल वाटते. हंस पक्षी कावळ्याला खिजवण्यासाठी बोलतो ह्या उडण्याला काय म्हणतात? तू उडता उडता पाण्याला कां स्पर्श करत असतोस ते समजत नाही. मला वाटते तुला उडता येत नाही". नंतर तो बोलतो "चल पुढे जाऊ". कावळा मात्र पुढे न जाता मागे वळतो खजिल होऊन. तो कावळा हंसपक्षाला बोलतो, "मी पुरता थकलो आहे. आम्ही कावळे आमच्या स्थानिक भागातच उडतो. त्या पलिकडे जात नाही. मला माफ कर अरे हंसपक्षा. मला तुझ्या पंखांवर घेऊन माझ्या गावी ने. अरे मला ते अन्न फुकट मिळत होते त्यामुळे मला माज आला होता. मला माझी चूक समजली आहे. मी स्वताला मोठा समजू लागलो होतो. कृपया मला तू पुन्हा माझ्या गावाकडे घेऊन जा. ह्यापुढे अशी चूक मी कधी करणार नाही". हंस मोठ्या मनाचा त्याला त्याच्या पाठीवर घेतो व भरकन पुन्हा त्याच्या ठिकाणी आणून ठेवतो. त्यानंतर तो हंसपक्षी त्याच्या पुढच्या प्रवासास जातो. अशी होती गोष्ट त्या फुकटच्या खाद्यावर पोसलेल्या कावळ्याची. त्या नंतर तो कावळा नम्र झाला व शांतपणे राहू लागला.
त्यानंतर सल्य कर्णाला बोलतो, "जे त्या कावळ्याचे झाले तेच तुझे झाले आहे कर्णा. तुला धृतराष्ट्राच्या मुलांनी त्यांचे खरकटे खाण्यास दिले त्याने तू स्वताला मोठा समजू लागला आहे, त्या मोठेपणात तुझे कर्तृत्व कोठे आहे? त्यासाठीच तू त्यांच्या बद्दलच्या

इमानदारीच्या गोष्टी सतत करत असतोस. तुझ्या कर्तृत्वाचे काय आहे तुझ्याकडे? जेव्हां विराटाच्या गाई पळवण्यासाठी तुम्ही गेला होता तेव्हां स्त्रीरुपातील अर्जुनाचा तू कां पराभव करू शकला नाहीस? भिष्म, द्रोणां व कृपां ह्यांच्या संरक्षणाखाली तू सगळ्या गमजा करत असतोस हे न समजण्या इतके आम्ही दुधखुळे नाही. त्या युद्धात एकट्या अर्जुनाने तुम्हा सगळ्यांना हरवले व विवस्त्र केले हे सगळे जग जाणते. गंधर्वाने दुर्योधनाला पकडले तेव्हां तू कोठे पळून गेला होतास ते सांग. दैत्य सरोवराच्या जागी कौरवांची कत्तल होत असतांना तू कोठे गायब झाला होतास ते सांग. गंधर्वांच्या कैदेतून दुर्योधन व त्याची बायको अर्जुनानी सोडवली त्यावेळी तू कोठे होतास? त्या राजसभेत स्वता भार्गवाने अर्जुनाच्या सामर्थ्याचे कौतुक केले होते तेव्हां तुझा साधा उल्लेखसुद्धा त्याने केला नव्हता ते कां? तू ऐकले असशील कीं, भिष्म, द्रोण व कृप नेहमी बोलतांना सांगत कीं, अर्जुन व कृष्ण हे अजिक्य आहेत. त्यांना कोणी पराभूत करू शकणार नाही. तेव्हां तुझा उल्लेख कां होत नव्हता? लवकरच तू त्या दोघांना त्यांच्या अद्वितीय रथात येतांना पहाणार आहेस. जसे मी सांगितलेल्या कथेत कावळ्याने अखेरीस दिलदार हंसपक्ष्याचा आधार घेतला तसा तू सुद्धा घेणार आहेस असें वाटते. नाहीतर सगळ्यांच्या पुढे तो पंडुचा मुलगा तुझा अहंकार तोडून टाकणार आहे. तेव्हां तुला धनंजय व तू ह्यातील भेद समजणार आहे. ते दोघे देव, असुर आणि माणसांचे आदर्श आहेत त्यांच्या बरोबर तू तुझी तुलना करतोस ते मला हास्यास्पद वाटते. कोणी कोणाला आव्हान द्यावे त्याची मर्यादा तू समजत नाहीस. त्या तेजस्वी सूर्यांच्यापुढे तू काजव्यासारखा आहेस हे तुला कधी समजणार"? अरे कर्णा, त्यांच्या बद्दल अनादराने बोलू नकोस, ती तुझी योग्यता नाही. असें घमेंड करणे तुझ्या हिताचे नाही.

## – कर्ण पर्व भाग एक संपले -

–

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

# ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

**विशेष सुचना** - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा. तुमच्या मित्रांनासुद्धा ती द्या.

http://www.esahity.com/2309234323812351236623402381235‌0.html

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.
esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद